CMYK

सोलापूर
# तरुण भारत
न मे कर्मफले स्पृहा
SOLAPUR TARUN BHARAT
सोलापूर, धाराशिव, लातूर, छत्रपती संभाजीनगर, नांदेड, परभणी, हिंगोली, जालना, बीड, अहिल्यानगर व सातारा येथून वितरित

आजचा सामना
गुजरात वि. कोलकाता
वेळ : सायं.७.३० वाजता
ठिकाण : अहमदाबाद

सोलापूर | शुक्रवार, १७ एप्रिल २०२६ | युगाब्द ५१२८ | वर्ष ४२ वे अंक १३९ | पाने १२ | किंमत रु. ८/-
| RNI Regd. No. 46878/87 | Postal Regd No.. SLP/32/2024-2026. Posted daily at Medical college, Solapur.P.O. |
ही आमची ई-पेपर आवृत्ती असून ती 'तरुण भारत'च्या छापील आवृत्तीची प्रतिकृती नाही
dainiktarunbharat.com
epaper.dainiktarunbharat.com

## विचारपुष्प



धर्म मनुष्याच्या भाव-भावनांच्या वेगळेपणामुळे उद्‌भवणाऱ्या विविध कृती-कृत्यांना आणि अधिकार कर्तव्यांना पारस्परिकतेमध्ये गुंफून समाजाचा सांभाळ करणारे विधि-विधान आहे. धर्म मानव समूहाला वेदांच्या अधिष्ठानावर अभ्युदय आणि नि:श्रेयसकडे नेणारे जीवन-विधान आहे.

**- रंगा हरी**
रा. स्व. संघाचे पूर्व अ. भा. बौद्धिक प्रमुख

## महत्त्वाचे

### दिल्ली विमानतळावर दोन विमानांची धडक

**नवी दिल्ली** : इंदिरा गांधी आंतरराष्ट्रीय विमानतळावर बुधवारी टॅक्सींग करताना दोन विमानांची धडक झाली. या घटनेत स्पाईसजेटच्या बोईंग बी७३७-७०० विमानाचे उजवे विंगलेट खराब झाले, तर दुसऱ्या एअरलाइन आकाशाच्या विमानाचे डावे हॉरिझॉन्टल स्टेबिलायझर खराब झाले. सुदैवाने, यात कोणताही प्रवासी किंवा कर्मचारी जखमी झाला नाही. ही घटना टर्मिनल १ जवळ घडली, जेव्हा आकाशा एअरचे विमान पुशबॅकनंतर पार्क केले होते आणि त्याच परिसरात लेहहून आलेले स्पाईसजेटचे विमानही होते. स्पाईसजेटने यासंदर्भात एक निवेदन जारी केले.

# परिसीमनात राज्यांसोबत भेदभाव होऊ देणार नाही

## पंतप्रधान मोदींचे विरोधकांना आश्वासन

**◆ नवी दिल्ली, १६ एप्रिल**

लोकसभा तसेच राज्य विधानसभात महिलांना ३३ टक्के आरक्षण देतांना मतदारसंघांच्या परिसीमनाच्या मुद्यावर कोणत्याही राज्यांसोबत भेदभाव होऊ दिला जाणार नाही, असे आश्वासन पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी विरोधकांना दिले आहे. महिलांना ३३ टक्के आरक्षण आणि मतदारसंघाच्या परिसिमन,

या मुद्यांवर राजकीय श्रेय घेण्याचा आमचा कोणताही प्रयत्न नाही, असे त्यांनी स्पष्ट केले.

महिलांना त्यांचा हक्क मिळाला पाहिजे, एवढीच माझी भूमिका आहे, याचे कोणतेही श्रेय मला नको आहे, याकडे लक्ष वेधत मोदी म्हणाले की, हवी असल्यास मी तुम्हाला हमी देण्यास तयार आहे. वादा हवा असेल तर वादा करायलाही तयार आहे. तामीळ भाषेत यासाठी एखादा शब्द असेल तर त्याचा वापर करायचीही माझी तयारी आहे. या मुद्यावर आमची नियत साफ असल्यामुळे शब्दांचा खेळ करण्याची आम्हाला गरज नाही. देशातील महिलांना आम्ही काही देत आहोत, असा अहंकार आमच्यात नाही, तर आतापर्यंत रोखण्यात आलेला त्यांचा हक्क आम्ही त्यांना देत आहोत. ज्यांनी



महिलांना त्यांचा अधिकार देण्यास विरोध केला, महिलांनी त्यांना माफ केले नाही, असे मोदी म्हणाले.

मतदारसंघाच्या परिसीमनाची प्रक्रिया राबवतांना राज्यांसोबत कोणताही भेदभाव केला जाणार नाही, त्यांच्यावर अन्याय होऊ दिला जाणार नाही. भूतकाळापासून मतदारसंघाच्या परिसिमनाबाबत ज्या अनुपाताचे पालन केले जाते, त्यात यावेळीही कोणताही बदल केला जाणार नाही, असे मोदी म्हणाले.

**त्यांना बोलू द्या सभागृहात...,**

मोदी बोलत असताना त्यांच्या भाषणात अडथळा आणण्याचा प्रयत्न विरोधी सदस्य करत होते. मोदी यांचे भाषण सुरु असतांना तृणमूल काँग्रेसचे कल्याण बॅनर्जी यांनी त्यांच्या भाषणात अडथळा आणण्याचा प्रयत्न केला, यावर भाजपा सदस्यांनी आक्षेप घेतला. त्यावर मोदी भाजपा सदस्यांना उद्देशून म्हणाले की, त्यांना बोलू द्या, तेथे त्यांच्या तोंडाला कुलुप लावले जाते. बंगालमध्ये त्यांना बोलायची संधीच मिळत नाही. मोदी यांच्या या विधानावर सभागृहात हास्याचा स्फोट झाला, स्वत: मोदी यांनाही हसू आवरले नाही.

**सांगड घालू नका : गोगोई**

महिला आरक्षण आणि मतदारसंघाचे परिसिमन यांची सांगड घालू नये, असे आवाहन काँग्रेसचे गौरव गोगोई यांनी केले. आज सभागृहात घटनादुरुस्ती विधेयक मांडतांना अर्जुनराम मेघवाल आणि तीन वर्षापूर्वी गृहमंत्री अमित शाह यांनी केलेले भाषण यात कोणताही फरक नाही, असा आरोप गोगोई यांनी केला. ◂(तभा वृत्तसेवा)

### महत्त्वाचे मुद्दे

- **मी मागास समाजातून येतो, पण समाजातील सर्व वर्गाला सोबत घेऊन चालण्याची माझी भूमिका आहे**
- **संविधानाने मला हा मार्ग दाखवला आहे आणि माझ्यासाठी संविधान सर्वतोपरी आहे.**
- **२५ ते ३० वर्षापूर्वी ज्यांनी महिला आरक्षणाला विरोध केला, ते राजकीयदृष्ट्या मागे पडले.**
- **या निर्णयाकडे राजकीय भूमिकेतून पाहू नका.**
- **ज्यांच्या नियतीत खोट आहे, त्यांना देशातील नारीशक्ती कधीच माफ करणार नाही.**

### मेघवाल यांनी मांडले घटनादुरुस्ती विधेयक



**» महिला आरक्षणासंदर्भातील तिन्ही घटनादुरुस्ती विधेयक विधि आणि न्याय मंत्री अर्जुनराम मेघवाल यानी लोकसभेत सादर केले. या घटनादुरुस्ती विधेयकाच्या बाजूने २५१ मते पडल्यानंतर चर्चेला प्रारंभ झाला. मेघवाल यांनी चर्चेला प्रारंभ केला.**

## वाशीममध्ये रुक्मिणी ज्वेलर्सवर छापा

**◆ वाशीम, १६ एप्रिल**

अवैध सावकारी व्यवहारांबाबत प्राप्त तक्रारींच्या अनुषंगाने सहकार विभागाने कारवाई करीत येथील सुशील बेदरकर यांच्या रुक्मिणी ज्वेलर्सवर छापा टाकला.

गुरुवारी सहकार व पोलिस विभागाच्या संयुक्त पथकाने ही कारवाई पार पाडली. झडतीत महत्त्वाचे दस्तऐवज ताब्यात घेण्यात आले असून, सखोल चौकशी सुरू आहे.

ही कारवाई जिल्हाधिकारी योगेश कुंभेजकर, पोलिस अधीक्षक अनुज तारे तसेच विभागीय सहनिबंधक गौतम वर्धन यांच्या मार्गदर्शनात पार पडली. या मोहिमेत सहायक निबंधक एम. डी. कच्छवे, आर. वाडेकर, एस. जी. गादेकर, ए. बी. सावंत तसेच सहायक सहकार अधिकारी आर. एन. शेख यांच्यासह पोलिस विभागातील कर्मचाऱ्यांनी सक्रिय सहभाग घेतला. नागरिकांनी अवैध सावकारी व्यवहारांविरोधात पुढे येऊन तक्रारी नोंदवाव्या, असे सहकार विभागाने म्हटले आहे. ◂(तभा वृत्तसेवा)

# करार नाकारल्यास इराणविरुद्ध पुन्हा युद्ध

## अमेरिकेचा इशारा, पायाभूत सुविधा, ऊर्जा केंद्र लक्ष्य

**◆ वॉशिंग्टन, १६ एप्रिल**

शांतता करार नाकारल्यास इराणविरुद्ध पुन्हा युद्ध सुरू केले जाईल. त्यांनी चुकीचा निर्णय घेतल्यास पायाभूत सुविधा, वीज आणि ऊर्जा केंद्रांना लक्ष्य केले जाईल, असा इशारा अमेरिकेचे संरक्षण मंत्री पीट हेगसेथ यांनी दिला.

हेगसेथ म्हणाले, युद्ध पुन्हा करण्यासाठी अमेरिकेचे सैन्य सज्ज आहेत. अमेरिकेने इराणच्या सरकारला पर्याय निवडण्याचा आग्रह केला आहे, जर इराणने चुकीचा निर्णय घेतला आणि कोणत्याही तोडग्यावर सहमत झाला नाही, तर अमेरिकेकडे हल्ले करण्याशिवाय पर्याय राहणार नाही. आम्ही इराणच्या हालचालींवर नजर ठेवून आहोत. अमेरिका आणि इराणची यांच्यातील युद्ध बरोबरीची नाही. इराण त्यांचे शिल्लक राहिलेले लॉन्चर आणि क्षेपणास्त्र गमावत आहे. अमेरिकेचे सैन्य आता कित्येकपट जास्त ताकदीनिशी सज्ज आहे. आम्ही राष्ट्रध्यक्ष ट्रम्प यांच्या आदेशाची वाट पाहत आहे. त्यांचा आदेश येताच कारवाई सुरू केली जाईल. ◂(वृत्तसंस्था)

### इस्रायल-लेबनॉनमध्ये संघर्षविराम : ट्रम्प

**» इस्रायल आणि लेबनॉन १० दिवसांच्या संघर्षविरामासाठी सहमत झाल्याची माहिती राष्ट्राध्यक्ष ट्रम्प यांनी समाज माध्यमावरील पोस्टमधून दिली. लेबनॉनचे राष्ट्राध्यक्ष जोसेफ औन आणि इस्रायलचे पंतप्रधान नेतान्याहू यांच्यात वॉशिंग्टन येथे चर्चा झाली.**

## काँग्रेसचे पाच आमदार निलंबित

**◆ चंदीगड, १६ एप्रिल**

संघटनात्मक शिस्तीच्या उल्लंघनाची गंभीर दखल घेत, काँग्रेसने हरियाणातील पाच आमदारांना पक्षाच्या प्राथमिक सदस्यत्वातून तात्काळ प्रभावाने निलंबित केले आहे. हरियाणा प्रदेश काँग्रेस समितीचे अध्यक्ष राव नरेंद्र सिंह यांनी सांगितले की, आमदार शैला चौधरी, रेणू बाला, सरदार जरनैल सिंग, मोहम्मद इलियास आणि आमदार मोहम्मद इस्राएल यांना पक्षविरोधी कारवाया केल्याबद्दल निलंबित करण्यात आले आहे. त्यांनी स्पष्ट केले की, ही कारवाई राज्य शिस्तपालन समितीच्या शिफारशीनुसार आणि अखिल भारतीय काँग्रेस समितीचे अध्यक्ष मल्लिकार्जुन खर्गे यांच्या मंजुरीनंतर करण्यात आली आहे.

नुकत्याच पार पडलेल्या राज्यसभा निवडणुकीत पक्षाच्या अधिकृत उमेदवाराच्या विरोधात मतदान करून निलंबित आमदारांची बेशिस्त नियमांच्या विरुद्ध आहे, असे प्रदेश काँग्रेस अध्यक्ष राव नरेंद्र सिंग म्हणाले. ◂(वृत्तसंस्था)

# कुंकू-टिळ्याला नकार, हिजाबला होकार

## लेन्सकार्ट कंपनीतील नियमावरून वाद

**◆ नवी दिल्ली, १६ एप्रिल**

टीसीएसच्या नाशिक कार्यालयातील धर्मांतर प्रकरणावरून संताप व्यक्त केला जात असताना आता लेन्सकार्ट कंपनीतील ड्रोस कोडवरून वाद सुरू झाला आहे. कंपनीतील ड्रेस कोड धोरणाशी संबंधित एक दस्तऐवज उघड झाला आहे. यात महिलांना कुंकू, टिकली आणि पुरुष कर्मचाऱ्यांना टीळा लावण्यावर बंदी आहे, तर हिजाबला परवानगी देण्यात आल्याची माहिती समोर आली.

स्टार्टअप कंपनी लेन्सकार्ट कंपनीतील कर्मचाऱ्यांना कामाच्या ठिकाणी हिजाब घालण्याची परवानगी देते, परंतु कुंकू, टिकली, टीळा लावण्यास मनाई करते. लेन्सकार्टच्या ड्रेस कोड मार्गदर्शक तत्त्वांशी संबंधित दस्तऐवज समाज माध्यमावर प्रसारित झाला असून, त्यातून ही माहिती समोर आली. कंपनीतील एका कर्मचाऱ्याने ड्रेस कोडशी संबंधित माहिती समाज माध्यमांवर प्रसारित केली. त्यात म्हटले की, कार्यालयात कामाच्या ठिकाणी कुंकू, टिकली आणि टीळा लावण्यास बंदी आहे, तर हिजाबला परवानगी आहे. यावर, लेन्सकार्टचे संस्थापक आणि सीईओ पियुष बन्सल यांनी स्पष्ट केले की, कंपनीची धोरणे बदलली आहेत आणि हा दस्तऐवज त्यांच्या सध्याच्या मार्गदर्शक तत्त्वांशी सुसंगत नाही. कंपनी नियमितपणे आपल्या मार्गदर्शक तत्त्वांचा आढावा घेते. संपूर्ण भारतात आमचे हजारो कर्मचारी आहेत जे दररोज आमच्या स्टोअरमध्ये आपला धर्म आणि संस्कृतीनुसार पेहराव घालतात, त्यांच्यावर कुठलेही बंधन नाही. ◂(वृत्तसंस्था)

### समाज माध्यमांवर संताप

**» या प्रकरणाची सुरुवात एका संदेशाच्या छायाचित्रामुळे झाली, जो सामाजिक माध्यमांवर मोठ्या प्रमाणात पसरला. त्या संदेशात काही नियम नमूद करण्यात आले होते, ज्यामध्ये महिला, पुरुष कर्मचाऱ्यांना काही बंधने घालण्यात आली होती. तसेच काही धार्मिक पेहरान परिधान करण्याबाबतही निर्बंध असल्याचे सांगितले गेले. या माहितीमुळे नागरिकांमध्ये संताप व्यक्त होत असून कंपनीवर टीका केली जात आहे.**




CMYK
सोलापूर तरुण भारत, सोलापूर येथून प्रकाशित केले. विभागीय आवृत्ती : धाराशिव, लातूर, सातारा, छत्रपती संभाजीनगर, नांदेड, परभणी, हिंगोली, जालना व बीड, तसेच विजयपूर, कलबुर्गी, बीदर (कर्नाटक) येथून प्रकाशित केले.



# डॉ. आंबेडकर जयंती मिरवणूक मार्ग वाहतुकीस बंद

## बंद करण्यात आलेले मार्ग व पर्यायी मार्गाबाबत पोलिस प्रशासनाने केले आवाहन

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि.१६ एप्रिल-**
डॉ. बाबासाहेब आंबेडकर जयंतीची सांगता मिरवणूक सोलापूर शहरात दि. १९ एप्रिल रोजी काढण्यात येणार आहे. मिरवणूक मार्गावर लोकांची मोठ्या प्रमाणात गर्दी होणार आहे. यादरम्यान येणाऱ्या वाहनांचा अडथळा निर्माण होऊन वाहतुकीची कोंडी होऊन कायदा व सुव्यवस्था प्रश्न निर्माण होण्याची शक्यता नाकारता येत नाही. त्याकरिता दि. १९ एप्रिल रोजी सकाळी १० वाजल्यापासून ते दि. २० एप्रिल रोजीच्या पहाटे मिरवणुकी संपेपर्यंत डॉ. बाबासाहेब आंबेडकर जयंती सांगता मिरवणूक मार्गावर सर्व प्रकारच्या वाहतुकीस जाण्यास व येण्यास बंद करण्यात आले आहे.

दिलेल्या मार्गावर मिरवणुकीत सामील होणारे वाहने वगळता इतर सर्व प्रकारच्या वाहनांचे वाहतुकीस व यामध्ये पोलीस वाहने, रुग्णवाहिका, अग्निशमन दलाचे वाहने, पोलीस ज्या वाहनास परवानगी देतील अशी वाहने अपवाद वगळता पार्किंगसाठी बंदी राहील. नागरिकांनी दिलेल्या पर्यायी मार्गाचा वापर करावा असे आवाहन पोलीस आयुक्त एम राजकुमार यांनी केले आहे. या कालावधीत मिरवणूक संपेपर्यंत आदेशाचा भंग केल्यास कायद्याप्रमाणे तो शिक्षेस पात्र होईल असेही यात म्हटले आहे.

### बंद करण्यात आलेले मार्ग

१) डॉक्टर बाबासाहेब आंबेडकर उद्यान - सम्राट चौक - छत्रपती शिवाजी महाराज चौक
२) जुना पुना नाका ते छत्रपती शिवाजी महाराज चौक
३) छत्रपती शिवाजी महाराज चौक - मेकॅनिक चौक - सरस्वती चौक - चार पुतळा - डॉ. बाबासाहेब आंबेडकर चौक - डफरीन चौक - जुना एम्प्लॉयमेंट चौक - वाडिया हॉस्पिटल - चांदणी चौक - महापौर निवास - रेल्वे स्टेशन गांधी पुतळा - लोकशाहीर अण्णाभाऊ साठे चौक - मेकॅनिक चौक
४) संगमेश्वर कॉलेज ते जुना एम्प्लॉयमेंट चौक
५) डीआरएम ऑफिस ते जुना एम्प्लॉयमेंट चौक

### असा असेल पर्यायी मार्ग

१) विजापूर रोड कडून हैदराबाद, तुळजापूर, पुणे कडे जाणारी वाहतूक, पत्रकार भवन चौक - महावीर चौक - संत तुकाराम चौक - अशोक चौक - शांती चौक - जुना बोरामणी नाका - मार्केट यार्ड मार्गे इच्छित स्थळी
२) मंगळवेढा कडून येणारी होडगी रोड व विजापूर रोड कडे जाणारी वाहतूक, मरीआई चौक - नागोबा मंदिर - रामवाडी पोलीस चौकी - मोदी बोगदा - पत्रकार भवन मार्गे इच्छित स्थळी
३) जुना पुना नाका चौकाकडून रेल्वे स्टेशन कडे जाणाऱ्या वाहनधारकाने, जुना पुना नाका (५४ मीटर रोड मार्गे) अवंती नगर - यश नगर रेल्वे बोगदा - जानकर नगर - सीएनएस हॉस्पिटल मार्गे - मरीआई चौक ते इच्छित स्थळी
४) जुना पुना नाका चौकाकडून विमानतळ, जुळे सोलापूर कडे जाणाऱ्या वाहनधारकाने, जुना पुना नाका - जुना कारंबा नाका - जुना तुळजापूर नाका - बोरामणी नाका - शांती चौक - गुरुनानक चौक - महावीर चौक ते इच्छित स्थळी
५) विजापूर मंगळवेढा कडून येणारे जड वाहतूक वाहनधारकाने नवीन केगाव बायपास रोड चा वापर करावा
६) अक्कलकोट कडून येणाऱ्या जड वाहतूक वाहनधारकाने, नवीन अक्कलकोट नाका - शांती चौक - जुना बोरामणी नाका - मार्केट यार्ड या मार्गाचा वापर करावा.

## महत्वाचे...



### मोडनिंब येथील स्वामी समर्थ व जोतिबा मंदिरात स्वामी समर्थ पुण्यतिथी सोहळा

**मोडनिंब, दि. १५ एप्रिल-**
मोडनिंब (ता. माढा) येथील श्री स्वामी समर्थ मंदिर व जोतिबा मंदिरात श्री स्वामी समर्थ महाराज पुण्यतिथी सोहळा साजरा करण्यात आला. यावेळी कीर्तनकार हभप श्रीकांत महाराज आरोळे यांचे कीर्तन झाले. आकर्षक फुलांची सजावट करण्यात आली. बुधवारी दुपारी बारा वाजता पुष्पवृष्टी करण्यात आली. त्यानंतर ग्रामपंचायत सदस्य बालाजी पाटील, पंचायत समिती सदस्या प्राजक्ता बालाजी पाटील यांच्या हस्ते महाआरती झाली.चंद्रकांत गिड्डे व स्वामी समर्थ मंगल कार्यालय यांच्या वतीने महाप्रसादाचे वाटप करण्यात आले. चंद्रकांत गिड्डे यांच्या वतीने दरवर्षी या सोहळ्याचे आयोजन केले जाते. यावर्षी हे २५ वे वर्ष आहे. पंचक्रोशीतील भाविकांनी या महाप्रसादाचा लाभ घेतला. प्रतिवर्षी शेकडो भाविकांच्या उपस्थितीत हा सोहळा साजरा करण्यात येतो.




### दादाई बहुउद्देशीय संस्थेतर्फे भीम जयंतीनिमित्त पाणपोईचे उद्घाटन

**सोलापूर, दि. १६ एप्रिल-**
दादाई बहुउद्देशीय समाज सेवी संस्थेच्या वतीने सेटलमेंट फ्रि. कॉलनी नं.१येथे विश्वरत्न डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांची १३५ वी जयंती संस्थापक अध्यक्ष युवराज जाधव यांच्या मार्गदर्शनाखाली मोठ्या उत्साहात साजरी करण्यात आली. महामानव डॉ. आंबेडकर यांच्या प्रतिमेस संस्थेचे आधारस्तंभ नारायण जाधव, भीमज्योत तरूण मंडळाचे मार्गदर्शक गौतम फडतरे यांच्या उपस्थितीत अभिवादन करण्यात आले. तसेच डॉ.आंबेडकर जयंतीनिमित्त कै.भगवान तात्या जाधव व कै.लायव्वा भगवान जाधव यांच्या स्मरणार्थ दादाई संस्थेच्या वतीने पाणपोईचे उद्घाटन करण्यात आले. यावेळी भीमज्योत तरूण मंडळाचे अध्यक्ष राहुल एकमल्ले, अभिजीत फडतरे, संजय गायकवाड, विजय जाधव, निशांत गायकवाड, प्रकाश गायकवाड, मलेश सूर्यवंशी, भारत गायकवाड , निलेश गायकवाड, विवेक जाधव, संतोष गायकवाड, रमेश गायकवाड, समीर विजापुरे, रजाक विजापुरे, अजर शेख, कुणाल जाधव, प्रज्वल जाधव, श्रेयश गायकवाड, प्रथमेश जाधव आदी उपस्थित होते.



### जीवदया ही बसवेश्वरांची शिकवण : सुरज मुलाणी

**वीरशैव व्हिजनतर्फे जलकुंभांचे वाटप**

**सोलापूर, दि. १६ एप्रिल-**
वीरशैव व्हिजनने मुक्या प्राण्यांसाठी पिण्याच्या पाण्याच्या जबाबदारीसह जलकुंभांचे वाटप करून महात्मा बसवेश्वर यांची जीवदयेची शिकवण आचरणात आणली आहे, असे प्रतिपादन जोडभावी पेठ पोलीस ठाण्याचे वरिष्ठ पोलीस निरीक्षक सुरज मुलाणी यांनी केले. वीरशैव व्हिजनतर्फे मुक्या प्राण्यांसाठी जलकुंभांचे वाटप करण्यात आले. यावेळी ते बोलत होते. यावेळी भीम प्रतिष्ठानचे अध्यक्ष वीरेंद्र हिंगमिरे, बसव ब्रिगेडचे अध्यक्ष अमित रोडगे, अडत व्यापारी श्रीकांत धनशेट्टी, वीरशैव व्हिजनचे संस्थापक अध्यक्ष राजशेखर बुरकुले, वीरशैव व्हिजन उत्सव समिती अध्यक्ष विजयकुमार बिराजदार उपस्थित होते. बसव जयंतीनिमित्त वीरशैव व्हिजनतर्फे १० जलकुंभांचे पाण्याच्या जबाबदारीसह वाटप करण्यात येते. कै. मुत्यप्पा बिराजदार यांच्या स्मरणार्थ अडत व्यापारी संगमेश्वर बिराजदार हे प्रतिवर्षी १० जलकुंभ उपलब्ध करून देतात. यावेळी बसवराज सोलापुरे (सुनिल नगर), दयानंद हेले (शेळगी), वीरेंद्र हिंगमिरे (जोडभावी पेठ), श्रीशैल केंभावी (शाहीर वस्ती), आनंद चंडक (बुधले गल्ली) यांना पाण्याच्या जबाबदारीसह देण्यात आले. यावेळी सोमनाथ चौधरी, शिवानंद सावळगी, राहुल बिराजदार, गौरीशंकर बाळशेट्टी, दिलीप जावळे, गंगाधर झुरळे, शांतवीर बसवंती, असलम नदाफ आदी उपस्थित होते.

### टिकेकरवाडीजवळ रेल्वेच्या धडकेत वृध्द ठार

**सोलापूर, दि. १६ एप्रिल-**
धावत्या रेल्वेच्या धडकेने एक ६६ वर्षीय वृद्ध गंभीर जखमी होऊन जागीच ठार झाल्याची दुर्घटना होटगी रोडवरील टिकेकरवाडी जवळ आज गुरुवारी सकाळी साडे आठ वाच्या सुमारास उघडकीस आली . सिद्धाराम शांतप्पा तळसंगे (वय ६६ वर्ष रा. आहेरवाडी , ता.दक्षिण सोलापूर) असे मयताचे नाव आहे. ते बुधवारी रात्रीपासूनच घरातून बाहेर पडले होते . आणि आज गुरुवारी सकाळी त्यांचा मृतदेह सिद्धेश्वर कारखान्यासमोरील रेल्वेब्रीज जवळ मिळून आला .रेल्वेच्या धडकेत ते गंभीर जखमी होऊन जागीच ठार झाले होते .ही खबर विजापूर नाका पोलिसांना मिळाली असता घटनास्थळी पोलीस हवालदार एसटी बहिर्जे यांनी पोहचून सदरचा मृतदेह येथील शासकीय रुग्णालयात शवविच्छेदनासाठी दाखल केला.

## वैशाली वाईन शॉपसमोर पैशाच्या कारणावरून तरुणाला मारहाण

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि.१६ एप्रिल-**
पैसे देण्याच्या कारणावरून एका तरुणाला अज्ञात तीन-चार जणांनी मिळून पाईप व लाथा बुक्क्याने मारहाण केल्याची घटना रेल्वे स्टेशन येथील वैशाली वाईन शॉप समोर बुधवारी रात्री घडली.

रवीकुमार सायबन्ना दिवटे (वय ३६ वर्ष , राहणार थोरली इरन्ना वस्ती सोलापूर) असे त्या मारहाण झालेल्या तरुणाचे नाव असून तो बुधवारी रात्री दहा वाजता रेल्वे स्टेशन समोरील वैशाली वाईन शॉप समोर असताना पैसे देण्याच्या कारणावरून त्याला अज्ञात तीन ते चार जणांनी मिळून प्लास्टिक पाईप व लाथा बुक्क्याने मारहाण केली.

यात चेहऱ्याला जखम व सर्व अंगाला मुकामार लागल्याने तो उपचाराकरता येथील शासकीय रुग्णालयात आज गुरुवारी सकाळी स्वतः दाखल झाला .

## बार्शी तालुक्यात अल्पवयीन मुली पळवून नेण्याचे प्रमाण वाढले

**सोशल मीडियाचा विळखा आणि पोलिसांच्या 'निर्भया' पथकाकडून प्रभावी कारवाईची मागणी**

**तभा वृत्तसेवा,**
**वैराग, दि.१६ एप्रिल-**
सध्याच्या धावपळीच्या युगात वैराग शहर, वैराग भाग आणि संपूर्ण बार्शी तालुक्यात अल्पवयीन मुलींना फुस लावून पळवून नेण्याचे तसेच त्यांच्यावर अत्याचार होण्याचे प्रमाण दिवसेंदिवस वाढत चालले आहे.

या वाढत्या घटनांमुळे ग्रामीण भागातील पालकांमध्ये कमालीची भीती निर्माण झाली असून, आपली मुलगी सुरक्षित आहे का? असा गंभीर प्रश्न आता उपस्थित केला जात आहे. सोशल मीडियाचा गैरवापर आणि संवादाचा अभाव यामुळे या घटनांना खतपाणी मिळत असल्याचे चित्र समोर येत आहे.

**'बदनामी'च्या भीतीने गुन्हे दडपले जातायत; हीच विकृतीला साथ!**

ग्रामीण भागात अशा घटना घडल्यानंतर त्या दाबून टाकण्याची एक घातक प्रवृत्ती दिसून येत आहे. आपल्या मुलीची किंवा कुटुंबाची समाजात बदनामी होईल, या भीतीने अनेक पालक तक्रार करण्यासाठी पोलीस ठाण्यापर्यंत पोहोचत नाहीत. गावातल्या गावात किंवा घरातल्या घरात प्रकरण मिटवण्याकडे कल असतो. मात्र, पालकांनी हे समजून घेणे गरजेचे आहे की, अशा घटना दाबून ठेवणे म्हणजे गुन्हेगाराला पाठबळ देणे होय.

यामुळे गुन्हेगारांचे मनोबल वाढते आणि ते पुन्हा दुसऱ्या मुलीला लक्ष करण्यासाठी मोकळे होतात. 'आपलं कोणीच काही करू शकत नाही' ही भावना गुन्हेगारांमध्ये निर्माण होऊ नये, यासाठी पालकांनी सामाजिक भूमिका घेऊन तक्रार करण्यासाठी पुढे येणे काळाची गरज आहे.

## 'अंत्योदय' हेच भाजपाच्या कार्याचे अंतिम ध्येय : आ. देवेंद्र कोठे

**शहर मध्य मतदारसंघात मंडल प्रशिक्षण वर्ग उत्साहात**

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. १६ एप्रिल-**
पंडित दीनदयाल उपाध्याय यांनी भाजपाच्या कार्यकर्त्यांना दिलेला अंत्योदयाचा मंत्र प्रत्येक कार्यकर्त्यात रुजवणे आवश्यक आहे. अंत्योदय हेच भाजपाच्या कार्याचे अंतिम ध्येय आहे, असे प्रतिपादन आमदार देवेंद्र कोठे यांनी केले.

भारतीय जनता पार्टीच्या पंडित दीनदयाल उपाध्याय प्रशिक्षण महाअभियानांतर्गत सोलापूर शहर मध्य विधानसभेच्या पूर्व, मध्य आणि पश्चिम मंडलाचा प्रशिक्षण वर्ग बुधवारी अक्कलकोट रोड औद्योगिक वसाहतीतील महालक्ष्मी बँक्वेट हॉलमध्ये उत्साहात झाला. या प्रशिक्षण वर्गात दिवसभर विविध सत्रांमध्ये भाजपाच्या पदाधिकारी आणि कार्यकर्त्यांना मार्गदर्शन करण्यात आले. प्रशिक्षण वर्गाचे उद्घाटन शहराध्यक्षा रोहिणी तडवळकर, आमदार देवेंद्र कोठे, महापौर विनायक कोंड्याल यांच्या हस्ते दीपप्रज्वलनाने करण्यात आले.




### अन् आमदार कोठे बसले चक्क शेवटच्या रांगेत

या प्रशिक्षण शिबिरादरम्यान आमदार देवेंद्र कोठे यांना कार्यकर्ते आणि पदाधिकाऱ्यांनी व्यासपीठावर बसण्याचा आग्रह केला. परंतु हा भाजपाचा प्रशिक्षण वर्ग आहे. मी आधी कार्यकर्ता आहे. त्यामुळे मी कार्यकर्त्यांसमवेतच बसतो, असे सांगत आमदार देवेंद्र कोठे यांनी या शिबिरात सगळ्यात शेवटच्या रांगेत बसणे पसंत केले. भाजपामध्ये संघटनेला सर्वाधिक महत्त्व आहे. हे आमदार देवेंद्र कोठे यांनी कृतीतून दाखवून दिले, अशा शब्दांत भाजपच्या शहराध्यक्षा रोहिणी तडवळकर यांनी आमदार कोठे यांचे कौतुक केले.

आमदार कोठे म्हणाले, राज्य आणि केंद्र सरकारच्या योजना तसेच भाजपाची भूमिका जनतेपर्यंत पोहोचवण्यासाठी कार्यकर्त्यांनी सरल ॲप, नमो ॲप, चॅट जीपीटी त्याचबरोबर विविध समाज माध्यमंचा उपयोग करावा. भाजपाचा कार्यकर्ता प्रशिक्षित असेल तर तो अधिक जोमाने पक्षाचे काम करू शकेल. या हेतूने पक्षाच्या वरिष्ठ नेत्यांनी देशभर यंदाच्यावर्षी प्रशिक्षणाचे आयोजन केले आहे, असेही आमदार कोठे यांनी सांगितले.

शहराध्यक्षा तडवळकर म्हणाल्या, देश परमवैभवाला नेण्याचे प्रयत्न भाजपाच्या पूर्वजांनी केले. सामाजिक समरसता, सामाजिक न्याय, अंत्योदयाची संकल्पना रुजवत पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी याच मार्गावरून वाटचाल सुरू ठेवली आहे. पंडित दीनदयाल उपाध्याय यांनी दिलेला एकात्म मानववाद समाजात रुजवण्याची आवश्यकता आहे. या सत्राच्या अध्यक्षस्थानी जकप्पा कांबळे आणि रामचंद्र जन्नू होते.

प्रदेश भाजपचे योगेश बाचल यांनी याप्रसंगी कार्यविस्तार आणि कार्यपद्धती या विषयावर मार्गदर्शन केले. या सत्राच्या अध्यक्षस्थानी किसन जाधव, विशाल धोत्रे होते. यावेळी माजी नगरसेवक आणि भाजपाचे शहर मध्य विधानसभा मतदारसंघाचे एसआयआर प्रमुख गुरुशांत धुत्तरगावकर यांनी एसआयआर बाबत मार्गदर्शन केले. अध्यक्षस्थानी महापौर विनायक कोंड्याल आणि रवी बंडे होते.

सोशल मीडिया, एआय, नमो ॲप या विषयावर अभिषेक चिंता आणि सिद्धेश्वर टेंगळे स्वामी यांनी मार्गदर्शन केले. अध्यक्षस्थानी दत्ता पाटील होते. तसेच भाजपचा इतिहास या विषयावर प्रा. मोहिनी पत्की यांनी मार्गदर्शन केले. या सत्राच्या अध्यक्षस्थानी ज्ञानेश्वर म्याकल आणि शिरीष गायकवाड होते. तर भाजपा सरकारची कामगिरी या विषयावर सुधा अल्लीमोरे यांनी मार्गदर्शन केले. अध्यक्षस्थानी विजया वड्डेपल्ली आणि बजरंग कुलकर्णी होते.

## गळफास घेतलेल्या वैदूवाडी येथील तरुणाचा अखेर मृत्यू

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि.१६ एप्रिल-**
सोलापूर - दारूचे नशेत गळफास घेतलेल्या वैदुवाडी येथील तरुणाचा उपचारादरम्यान येथील शासकीय रुग्णालयात आज गुरुवारी पहाटे अडीच वाजता मृत्यू झाला.

सिद्राम महादेव कोळी (वय ३५ वर्ष, राहणार वैदुवाडी, सोलापूर) असे त्या मयत तरुणाचे नाव असून त्याने १३ एप्रिल रोजी दुपारी राहत्या घरात दारूच्या नशेत असताना घरातील खिडकीला साडीच्या साह्याने स्वतःला गळफास लावून घेतला होता . तेव्हा घरच्यांनी गळफास सोडवून त्याला बेशुद्ध अवस्थेत येथील शासकीय रुग्णालयात भाऊ निखिल कोळी याने दुपारी दाखल केले असता त्याचा उपचारादरम्यान आज पहाटे मृत्यू झाला.

## 'गंगा निवास' मध्ये जपल्या डॉ. बाबासाहेबांच्या आठवणी

- डायनिंग टेबल, ताट, ग्लास, तांब्या या वस्तूंमध्ये जपला प्रज्ञासूर्याचा स्पर्श
- जिथे प्रत्येक भिंत एक कथा सांगते आणि प्रत्येक कोपरा अभिमानाने भरलेला

**तभा वृत्तसेवा । किरण बनसोडे**
**सोलापूर, दि.१६ एप्रिल-**
भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या सोलापूर दौऱ्याच्या आठवणी आजही शहराच्या मनात जिवंत आहेत. त्या केवळ इतिहासाच्या पानांत नाहीत, तर फॉरेस्ट परिसरातील 'गंगा निवास' या सुंदर घरात आजही श्वास घेत आहेत. डॉ. बाबासाहेबांच्या शेवटच्या सोलापूर भेटीला यंदा ८० वर्षे पूर्ण होत असताना, या वास्तूमधील प्रत्येक कोपरा त्यांच्या सहवासाच्या स्मृतींनी भारलेला दिसतो. जिथे प्रत्येक भिंत एक कथा सांगते आणि प्रत्येक कोपरा अभिमानाने भरलेला आहे.

विश्वभूषण डॉ. बाबासाहेब आंबेडकर हे सोलापूर शहर - जिल्ह्यात अनेक वेळा आले. त्यांच्या पदस्पर्शाने ही नगरी क्रांतीप्रवण झाली. १४ जानेवारी १९४६ रोजी डॉ. बाबासाहेब 'मद्रास मेल'ने सोलापुरात आले. त्यावेळी

हणमंतु सायण्णा पसलेलू (गार्ड) यांनी आपल्या घराचे दरवाजे केवळ पाहुणचारासाठी नव्हे, तर इतिहास घडवण्यासाठी उघडले होते. 'गंगा निवास'मध्ये डॉ. बाबासाहेबांचा मुक्काम घडला आणि हे घर एका चळवळीचा साक्षीदार बनले. १९४० साली बांधण्यात आली. इमारतीची देखणी रचना, सुसज्ज आतील सजावट आणि हॉलमधील आकर्षक टाईल्स आहेत. आतील




फर्निचर कर्नाटकी कलाकुसरीचे असून सागवानी लाकडाचे आहे. त्या काळात गंगा निवाससारखी भव्य वास्तू परिसरात नव्हती. डॉ. बाबासाहेबांना आणण्यासाठी त्यांनी खास हिलमन कार आणली गेली. तो प्रवास केवळ एका नेत्याचा नव्हता, तर समाज परिवर्तनाच्या विचारांचा होता.



या दौऱ्यात त्यादिवशी समता सैनिक दलाच्या जवानांनी स्वागत केले. त्यादिवशी डॉ. बाबासाहेबांनी विविध कार्यक्रमांना उपस्थिती लावली. सावरकर मंडळाच्या तिळगूळ समारंभात त्यांनी प्रभावी भाषण करत समाजप्रबोधन केले. तसेच रॅडिकल पार्टीच्या बैठकीत सहभाग नोंदवून स्थानिक राजकीय घडामोडींना दिशा दिली. सरकारी वकील ॲड. जी. आर. देशपांडे यांच्या निधनानंतर त्यांच्या कुटुंबीयांची भेट घेऊन त्यांनी सांत्वनही व्यक्त केले.

हरिभाई देवकरण शाळेतील मुळे सभागृहात जिल्हा लोकल बोर्ड व नगरपालिका यांच्या वतीने बाबासाहेबांना मानपत्र देण्यात आले. बी. सी. होस्टेल





येथे दलित विद्यार्थी फेडरेशनच्या सभेत त्यांनी सोलापूरकरांना मार्गदर्शन केले. या वेळी दादासाहेब गायकवाड व पा. ना. राजभोज यांची उपस्थिती होती. सभेत त्यांनी जीवप्पा ऐदाळे यांना असेंबलीच्या निवडणुकीत निवडून देण्याचे आवाहन केले होते.त्या काळात जीवप्पा सुभाना ऐदाळे हे शेड्युल्ड कास्ट फेडरेशन पक्षाचे आमदारकीचे उमेदवार होते. त्यांच्या प्रचारासाठीच डॉ. बाबासाहेब आंबेडकर सोलापूरात आले होते.

**गंगा निवास : वस्तूंमध्ये जपलेला स्पर्श**

आजही गंगा निवासमध्ये एक ताट, एक ग्लास, एक तांब्या खुर्ची साध्या वाटणाऱ्या या वस्तूंमध्ये इतिहासाचा स्पर्श जपला गेला आहे. डॉ. बाबासाहेबांनी वापरलेले हे दैनंदिन साहित्य केवळ वस्तू नाहीत, तर त्या क्षणांचे साक्षीदार आहेत, जेव्हा या घरात विचारांचा दिवा पेटला होता.

गार्ड कुटुंबीय आजही त्या आठवणींना तितक्याच जिव्हाळ्याने जपतात. हणमंतू गार्ड यांचे नातू प्रकाश पसलेलू हे आजही याच घरात राहतात. जिथे प्रत्येक भिंत एक कथा सांगते आणि प्रत्येक कोपरा अभिमानाने भरलेला आहे.

### जुनी होत चाललेली वास्तू , जिवंत राहिलेला इतिहास

काळाच्या ओघात गंगा निवासची इमारत जुनी झाली आहे पण आठवणी मात्र अजूनही ताज्याच आहेत. ही केवळ एक वास्तू नाही तर हा आंबेडकरी चळवळीचा जिवंत दस्तऐवज आहे. डॉ. बाबासाहेबांच्या पदस्पर्शाने पावन झालेल्या या ठेव्याचे जतन करणे ही केवळ गार्ड कुटुंबाची नव्हे, तर संपूर्ण समाजाची जबाबदारी आहे. या ऐतिहासिक ठेव्याच्या संवर्धनासाठी शासनाने पुढाकार घ्यावा, अशी मागणी आता जोर धरू लागली आहे. कारण गंगा निवास वाचला, तर इतिहास जिवंत राहील. इतिहास जिवंत राहिला, तर प्रेरणा कायम राहणार आहे.

### 'गंगा निवास' इतिहास जपणारी वास्तू

- ठिकाण : फॉरेस्ट परिसर, सोलापूर शहर.
- डॉ.बाबासाहेबांची भेट : १४ जानेवारी १९४६
- आगमन : 'मद्रास मेल'ने सोलापुरात प्रवेश
- मुक्काम : हणमंतू सायण्णा गार्ड यांचे 'गंगा निवास'
- प्रवास : हिलमन कंपनीची कार
- जतन केलेल्या वस्तू : ताट, तांब्या, ग्लास, कप, फुलपात्र, डायनिंग टेबल.
- सोलापुरात प्रमुख कार्यक्रम : सावरकर मंडळ तिळगूळ समारंभातील भाषण, रॅडिकल पार्टी बैठक, हरिभाई देवकरण शाळेत मानपत्र स्वीकार, बी.सी. होस्टेलमध्ये विद्यार्थ्यांना मार्गदर्शन.
- सद्यस्थिती : वास्तू जुनी असून संवर्धनाची तातडीची गरज

CMYK
सोलापूर तरुण भारत, सोलापूर येथून प्रकाशित केले. विभागीय आवृत्ती : धाराशिव, लातूर, सातारा, छत्रपती संभाजीनगर, नांदेड, परभणी, हिंगोली, जालना व बीड, तसेच विजयपूर, कलबुर्गी, बीदर (कर्नाटक) येथून प्रकाशित केले.



## महत्त्वाचे

### नेपाळने लादला भारतावर कर!

**काठमांडू** : नेपाळ सरकारने भारतातून होणाऱ्या खरेदीवर कडक निर्बंध लादले आहेत. नव्या नियमानुसार, भारतातून १०० रुपयांपेक्षा जास्त किमतीचे कोणतेही सामान नेपाळमध्ये नेल्यास त्यावर भंसार म्हणजेच सीमा शुल्क भरणे अनिवार्य करण्यात आले आहे. या निर्णयामुळे भारत-नेपाळ सीमेवर राहणाऱ्या लोकांसह छोट्या व्यापाऱ्यांवर आर्थिक भूर्दंड पडणार आहे. नेपाळ सरकारने आपल्या देशातील स्थानिक उत्पादनांना चालना देण्यासाठी आणि महसूल गळती रोखण्यासाठी हे पाऊल उचलले आहे. सीमेवरील लोकांनी भारतीय बाजारपेठांवर अवलंबून राहण्याऐवजी नेपाळी उत्पादनांना प्राधान्य द्यावे, असा यामागचा उद्देश असल्याचे सांगण्यात येत आहे. नेपाळमधील पंतप्रधान बालेंद्र शाह यांच्या नेतृत्वाखालील नवीन सरकारने हा निर्णय घेतला आहे. यापूर्वी छोट्या-मोठ्या घरगुती वस्तूंच्या खरेदीवर इतकी कडक अंमलबजावणी होत नव्हती. मात्र, आता दैनंदिन गरजेच्या वस्तू महागणार आहेत. डाळ, तेल, साखर, भाजीपाला यांसारख्या दैनंदिन वस्तूंच्या खरेदीवरही ५% ते ८०% पर्यंत शुल्क आकारले जाऊ शकते. सीमेजवळील जोगबनी आणि इतर बाजारपेठांमध्ये नेपाळी ग्राहकांची मोठी गर्दी असते.

# मातृभाषेला प्रथम प्राधान्य द्या

**राष्ट्रपती मुर्मू यांचे प्रतिपादन ● महात्मा गांधी आंतरराष्ट्रीय हिंदी विश्वविद्यापीठाचा दीक्षांत समारंभ**



विद्यार्थिनीला पदकाने सन्मानित करताना राष्ट्रपती मुर्मू, बाजूला राज्यपाल जिष्णू देव वर्मा, बावनकुळे, डॉ. भोयर

**वर्धा, १६ एप्रिल**

भारतीय भाषांचा अभिमान बाळगून त्यांचे संवर्धन करणे ही काळाची गरज आहे. इतर भाषांचा विरोध न करता मातृभाषेचा सन्मान राखणे आवश्यक आहे. जगातील कोणतीही भाषा शिका. परंतु, आपली भाषा प्रथम ठेवा. सेवाग्राम आश्रम भेटीदरम्यान महात्मा गांधी यांचा साधेपणा, राष्ट्रप्रेम आणि समाजसेवेच्या कार्यातून प्रेरणा मिळाली असल्याचे प्रतिपादन राष्ट्रपती द्रौपदी मुर्मू यांनी केले.

महात्मा गांधी आंतरराष्ट्रीय हिंदी विश्वविद्यापीठाच्या सहाव्या दीक्षांत समारंभात राष्ट्रपती मुर्मू मुख्य अतिथी म्हणून बोलत होत्या. यावेळी राज्यपाल जिष्णू देव वर्मा, महसूल मंत्री चंद्रशेखर बावनकुळे, पालकमंत्री डॉ. पंकज भोयर, कुलगुरू प्रा. कुमुद शर्मा उपस्थित होत्या.

गांधीजींनी पाहिलेले विकसित भारताचे स्वप्न साकार करण्यासाठी विद्यार्थ्यांचे मोठे योगदान अपेक्षित आहे. त्यामुळे विद्यार्थ्यांनी वैयक्तिक प्रगतीसोबतच देशाला सशक्त, आत्मनिर्भर आणि विकसित भारत बनविण्यासाठी योगदान द्यावे, असे आवाहन केले

या विश्वविद्यापीठात विविध राज्यांतील विद्यार्थी शिक्षण घेतात. येथे आंतरभाषा संवाद घडून येतो. हिंदीसह भारतीय भाषांचा प्रत्येकाने गौरव बाळगला पाहिजे. महात्मा गांधी इंग्लंडमध्ये शिकले. दक्षिण आफ्रिकेत त्यांनी सामाजिक चळवळ उभारली. परंतु, भारतीय स्वातंत्र्य चळवळीत गांधीजींनी भारतीय भाषेलाच प्राथमिकता दिली. हिंदीच्या प्रचार प्रसारासाठी त्यांनी नेहमीच प्रयत्न केले, असे राष्ट्रपती म्हणाल्या.

राज्यपाल जिष्णू देव वर्मा म्हणाले की, विद्यार्थ्यांनी सदाचार, नैतिकता व सामाजिक उत्तरदायित्व जपत राष्ट्रविकासात योगदान दिले पाहिजे. डिजिटल युगात हिंदी भाषेची भूमिका अधिक महत्त्वाची झाली आहे. चंद्रशेखर बावनकुळे यांनी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या वतीने विद्यार्थ्यांना शुभेच्छा देत राज्य शासन शिक्षण क्षेत्रात रोजगाराभिमुख बदल घडवित असल्याचे सांगितले. यावेळी राष्ट्रपती मुर्मू यांच्या हस्ते विविध विद्याशाखांच्या आठ विद्यार्थ्यांना प्रातिनिधीक स्वरूपात पदवी प्रदान करण्यात आल्या.

कार्यक्रमाला आ. दादाराव केचे, विशेष पोलिस महानिरिक्षक संदीप पाटील, माजी खासदार रामदास तडस, जिल्हाधिकारी वान्मथी सी., मुख्य कार्यकारी अधिकारी पराग सोमण, पोलिस अधीक्षक सौरभ कुमार अग्रवाल उपस्थित होते. (तभा वृत्तसेवा)

# आपलेपणातून घडते तीच खरी सेवा : डॉ. मोहनजी भागवत

**लता-आशा मंगेशकर मेडिकल फाऊंडेशनचे कोनशीला अनावरण**



**पुणे, १६ एप्रिल**

खरी सेवा ही आपलेपणातून घडते. आपलेपणा असला की मनुष्य आहे त्या परिस्थितीत सेवा करतो. मंगेशकर कुटुंब परंपरेने अशीच आपलेपणाने सेवा करीत आहे, असे मत राष्ट्रीय स्वयंसेवक संघाचे सरसंघचालक डॉ. मोहनजी भागवत यांनी व्यक्त केले. नांदोशी येथील लता-आशा मंगेशकर इन्स्टिट्यूट ऑफ मेडिकल सायन्सेसच्या कोनशीला अनावरण प्रसंगी ते बोलत होते.

यावेळी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे, महापौर मंजूषा नागपुरे, विधान परिषदेच्या उपसभापती नीलम गोऱ्हे, उच्च आणि तंत्रशिक्षण मंत्री चंद्रकांत पाटील, फाऊंडेशनचे अध्यक्ष पंडित हृदयनाथ मंगेशकर, विश्वस्त उषा मंगेशकर, आनंद भोसले, आदिनाथ मंगेशकर, लता मंगेशकर फाऊंडेशनचे वैद्यकीय संचालक डॉ. धनंजय केळकर उपस्थित होते.

सरसंघचालक म्हणाले की, लता मंगेशकर आणि आशा भोसले यांनी अखंड स्वरसेवा केली. त्यांचे स्वर मानवी वेदना दूर करणारे आहेत. आजचा कोनशीला अनावरण कार्यक्रम नियोजित वेळी घेतला, ही दोन्ही गायिकांच्या कार्याला दिलेली श्रद्धांजली आहे. मंगेशकर कुटुंब आपलेपणातून रुग्णांची जी सेवा करीत आहे, अशी सेवा आपण सर्वांनी केली पाहिजे.

फडणवीस म्हणाले की, आशाताई त्यांचे आयुष्य उत्सवासारख्या जगल्या. मंगेशकर कुटुंब देशभक्तीने ओतप्रेत भरलेले आहे. लता आणि आशाताईंना सावरकरांविषयी विशेष आदर होता. या कुटुंबाने कधीही सेवेचा सौदा केला नाही, कायम सेवा केली. त्यामुळेच अशी सेवा देणाऱ्या धर्मादाय संस्थांना इमारत करात सवलत देण्याचे काम प्रशासनाकडून करण्यात येईल.

उपमुख्यमंत्री शिंदे म्हणाले की, दुःखाची आणि वेदनांची जाणीव आशाताईंना होती. अनेक संकटांना सामोरे जाताना आशाताई कायम हसतमुख होत्या. त्यामुळेच या ठिकाणी संगीत थेरपी सेंटर देखील उभे करावे; कारण लता आणि आशाताईंच्या संगीतातून अनेक रुग्ण बरे होतील, यात शंका नाही. लतादीदी आणि आशाताई आज आपल्यात नसल्या, तरी हे रुग्णालय त्यांच्या आठवणी सदैव ताज्या ठेवेल. आशाताईंचे सुपुत्र आनंद भोसले यांनीही मनोगत व्यक्त केले. (तभा वृत्तसेवा)

### ४० एकरात उभारणार प्रकल्प

प्रास्ताविकात लता मंगेशकर मेडिकल फाऊंडेशनचे विश्वस्त डॉ. धनंजय केळकर यांनी रुग्णालय प्रकल्पाची माहिती दिली. लता मंगेशकर आणि आशा भोसले यांच्या स्मृतीप्रित्यर्थ ४० एकर क्षेत्रात हा रुग्णालय प्रकल्प उभारण्यात येत असून, तो देशातील मोठा रुग्णालय प्रकल्प असावा, असा प्रयत्न असल्याचे त्यांनी सांगितले.

# बाजार समित्यांतील कामगारांना दिलासा

## ५० किलो वजन मर्यादेचा शासनाचा महत्त्वपूर्ण निर्णय

**मुंबई, १६ एप्रिल**

कृषी उत्पन्न बाजार समित्यांमध्ये काम करणाऱ्या हमाल व कामगारांच्या आरोग्याचे संरक्षण करण्यासाठी राज्य शासनाने महत्त्वपूर्ण निर्णय घेतला असून, शेतीमालाच्या गोण्यांचे वजन ५० किलोपर्यंत मर्यादित ठेवण्याच्या सूचना देण्यात आल्या आहेत. या निर्णयामुळे बाजार समित्यांमधील कामगारांना मोठा दिलासा मिळणार आहे.

बाजार समित्यांमध्ये मोठ्या वजनाच्या गोण्या उचलताना कामगारांच्या आरोग्यावर विपरीत परिणाम होत असल्याचे निदर्शनास आले होते. त्यानुसार आंतरराष्ट्रीय निकषांचा विचार करून ५० किलोपेक्षा अधिक वजनाची हाताळणी टाळण्याचा निर्णय घेण्यात आला आहे, असे शासनाने स्पष्ट केले आहे. या निर्णयाच्या अंमलबजावणीसाठी सर्व कृषी उत्पन्न बाजार समित्यांना आवश्यक सूचना देण्यात आल्या आहेत. शेतकरी व व्यापाऱ्यांमध्ये जनजागृती करून गोण्यांचे वजन निर्धारित मर्यादेत ठेवण्याचे निर्देश देण्यात आले आहेत. तसेच बाजार समित्यांनी या नियमांची प्रभावी अंमलबजावणी करणे आणि त्यावर सतत लक्ष ठेवणे बंधनकारक राहणार आहे.

**कामगारांच्या सुरक्षेला प्राधान्य**

दरम्यान, या निर्णयामुळे बाजार समित्यांमधील कामकाजावर परिणाम होऊ नये, याचीही दक्षता घेण्याच्या सूचना संबंधित अधिकाऱ्यांना देण्यात आल्या आहेत. अंमलबजावणीबाबत नियमित अहवाल सादर करण्याचे निर्देशही शासनाने दिले आहेत. या उपक्रमामुळे कामगारांच्या सुरक्षिततेला प्राधान्य मिळणार असून, बाजार समित्यांमध्ये अधिक सुरक्षित आणि आरोग्यदायी कामकाजाचे वातावरण निर्माण होण्याची अपेक्षा व्यक्त केली जात आहे. (तभा वृत्तसेवा)

## परिषदेच्या नऊ जागांसाठी १२ मे रोजी मतदान

**मुंबई** : महाराष्ट्रातील विधान परिषदेच्या ९ जागांसाठी भारत निवडणूक आयोगाने निवडणूक कार्यक्रम जाहीर केला आहे. या जागांसाठी १२ मे रोजी सकाळी ९ ते दुपारी ४ वाजेपर्यंत मतदान होणार असून, त्याच दिवशी सायंकाळी मतमोजणी करून निकाल जाहीर करण्यात येणार आहे. विधान परिषदेतील नऊ सदस्यांचा कार्यकाळ १३ मे रोजी संपुष्टात येत असल्याने या जागांसाठी निवडणूक घेण्यात येत आहे. यामध्ये उद्धव ठाकरे, संजय केनेकर, नीलम गोऱ्हे, संदीप जोशी, दादाराव केचे, अमोल मिटकरी, रणजितसिंह मोहिते पाटील, राजेश राठोड, शशिकांत शिंदे या सदस्यांचा समावेश आहे

## दक्षिण राज्यांमधील जागा वाढणार: गृहमंत्री अमित शाह

**नवी दिल्ली** : विधेयकावरील चर्चेदरम्यान विरोधी पक्ष असा समज निर्माण करत आहेत की, संपूर्ण प्रक्रियेनंतर दक्षिण भारतीय राज्यांचे प्रतिनिधित्व कमी केले जाईल. लोकसभेतील दक्षिण भारतीय राज्यांचे प्रतिनिधित्व कमी करतील आणि त्यांना मोठे नुकसान पोहोचवतील, हा एक हेतुपुरस्सर पसरवलेला गैरसमज आहे. वास्तवात, दक्षिण भारतातील राज्यांच्या जागा कमी होणार नसून त्या वाढणार आहेत, असे सांगत गृहमंत्री अमित शहा यांनी गुरुवारी लोकसभेत आकडेवारी व माहिती सादर केली. शहा पुढे म्हणाले, कर्नाटकमध्ये २८ जागा आहेत. ज्या सभागृहाच्या ५४३ जागांपैकी ५.१५ टक्के आहेत.

# पत्नीला पेट्रोल घालून पेटविले; आरोपी पतीला अटक

**पतीवर खूनाच्या प्रयत्नाचा तर सासरच्या आठ जणांवर कौटुंबिक हिंसाचाराचा गुन्हा दाखल**

**तभा वृत्तसेवा**
**सोलापूर, दि. १६ एप्रिल-**

सासरी जाऊन एका पतीने पेट्रोल ओतून पत्नीचा जाळून खून करण्याचा प्रयत्न केल्याप्रकरणी पतीवर खुनाचा प्रयत्न केल्याचा तर पतीच्या कुटुंबीयांतील आठ जणांवर विजापूर नाका पोलिस ठाण्यात कौटुंबिक हिंसाचाराचा गुन्हा दाखल करण्यात आला आहे. दरम्यान आरोपी पती



फैजानला अटक करण्यात आली आहे.

पती फैजान, सासरा जावेद, सासू शमसाद, दीर फुरखान, जाऊ उमेरा, नणंद असिफा, तेहसीन, मौना (सर्व रा. मकदुम हॉल जवळ, मुलतानी बेकरी , होटगी रोड सोलापूर) असे गुन्हा दाखल झालेल्या आरोपींची नावे असून याप्रकरणी भाजून जखमी झालेली पत्नी नर्गिस फैजान शेख (वय ३२, रा. लोकमान्य नगर, जि प शाळेजवळ, मजरेवाडी, सोलापूर) यांनी फिर्याद दिली आहे. यातील फिर्यादी नर्गीस यांचे सप्टेंबर २०२४ मध्ये आरोपी सोबत लग्न झाले होते. लग्नानंतर ती जवळपास तीन ते चार महिनेच सासरी नांदली. सासरी नांदत असताना आरोपींनी शारीरिक व मानसिक त्रास देऊन मारहाण केली.

शिवाय माहेरून पैसे, सोन्याचे दागिने आण म्हणत छळ केला. शिवाय १५ एप्रिल २०२६ रोजी आरोपी पती फैजान हा नर्गीस यांच्या घरी येऊन त्यांच्या आईला आणि बहिणीला बाहेर जावा मला नर्गीस शी बोलायचे आहे असे सांगून त्यांना बाहेर काढले. त्यानंतर पत्नी बरोबर वाद घालत आपल्या कपड्यात लपवून आणलेल्या बाटलीतील पेट्रोल ठार मारण्याच्या उद्देशाने पत्नीच्या अंगावर टाकून लाईटरने पेटवून दिले .यात नर्गीस या जवळपास ५५ टक्के भाजल्या. त्यांना घरच्यांनी रात्रीच येथील शासकीय रुग्णालयात दाखल केले. नर्गिस यांच्यावर उपचार सुरू आहेत. दरम्यान याप्रकरणी आज गुरुवारी नर्गिस यांनी दिलेल्या फिर्यादीवरून सासरच्या विरुद्ध गुन्हा दाखल करण्यात येऊन आरोपी पतीला अटक करण्यात आली आहे पोलिस निरीक्षक सुशांत वराळे हे गुन्ह्याचा पुढील तपास करत आहेत.




# निस्वार्थ स्वामी सेवा मंडळातर्फे भाविकांना प्रसाद वाटप

**तभा वृत्तसेवा**
**अक्कलकोट दि १६ एप्रिल**

समर्थ स्वामी निस्वार्थ स्वामी सेवा मंडळातर्फे मैंदर्गी रस्ता भक्त निवास समोर श्री स्वामी महाराजांच्या १४८ व्या पुण्यतिथी निमित्त्य सुनिल काका कुलकर्णी यांच्या मार्ग दर्शनाखाली भाविक भक्ताना लाडू प्रसाद व थंडगार मठ्ठा याचे वाटप करण्यात आले.

याप्रसंगी प्रदिप मडीखांबे, पंकज मडीखाबे, प्राचार्य नागनाथ जेऊर, संजय पाठक, रामचद्र फणसे, नगरसेवक अविनाश मडिखांबे, नितीन पाटील, शिलामणी बनसोडे, रमेश पेठकर, विजयकुमार बाळशंकर, विजय गाडेकर, शुभ्रा अधिरा, मौर्य अर्जुन, नरेश अहिर, अमोल आव्हाड, श्रीकांत जाधव-गवंडे भक्त उपस्थित होते.

# श्री स्वामी समर्थांच्या १४८ व्या पुण्यतिथीनिमित्त

## श्री वटवृक्ष देवस्थानच्यावतीने पालखी सोहळा

- मान्यवरांच्या हस्ते श्रींच्या पारंपारीक पालखी सोहळ्याचा शुभारंभ
- शहरातील चौका चौकात भाविकांनी रांगोळीच्या पायघड्या व पुष्पवर्षाव
- फटाक्यांची आतिषबाजीने पालखी सोहळ्याचे स्वागत

**तभा वृत्तसेवा**
**अक्कलकोट, दि. १६ एप्रिल-**

दत्त अवतारी श्री स्वामी समर्थ महाराजांच्या १४८ व्या पुण्यतिथी निमित्त श्री वटवृक्ष स्वामी महाराज देवस्थानच्या वतीने श्रींचा पालखी सोहळा मिरवणूक मोठ्या उत्साहाने व भक्ती भावाने संपन्न झाला. दिवसभर पुण्यतिथी महोत्सवाचे विविध धार्मिक कार्यक्रम संपन्न झाल्या नंतर सायंकाळी साडे पाच वाजता मंदिरातून पालखी मिरवणुकीस मोठ्या भक्तीभावाने व अपार श्रद्धेने प्रारंभ झाला. प्रारंभी देवस्थानचे पुरोहित मंदार महाराज पुजारी यांचे हस्ते श्रींची आरती झाली.

यानंतर वटवृक्ष मंदिर समितीचे चेअरमन व माजी नगराध्यक्ष तथा विद्यम ान नगरसेवक महेश इंगळे यांच्या प्रमुख उपस्थितीत, नगराध्यक्ष मिलन कल्याणशेट्टी, श्री स्वामी समर्थ अन्नछत्र मंडळाचे प्रमुख कार्यकारी अध्यक्ष अमोलराजे भोसले, अक्कलकोट संस्थानचे श्रीमंत मालोजीराजे भोसले राजासाहेब, सोलापूर जिल्हा पोलीस अधिक्षक अतुलचंद्र कुलकर्णी,



नागपूरचे उद्योजक राणा सुर्यवंशी या मान्यवरांच्या हस्ते पालखी पूजन होऊन प्रस्थान झाले. पालखी सोहळ्यामध्ये टाळ मृदूंगाचा गजर, सुश्राव्य बँड पथक, दिंडी, व स्वामी नामाचा गजर, तसेच ढाकणी, चिकुर्डा, खामसवाडी, उदतपूर, तावशी, उस्मानाबाद, येथून आलेल्या वारकरी दिंडया, ढोल पथक, नयनरम्य फटाक्यांची आतषबाजी यामुळे पालखी सोहळा रंगला होता. शहरातील चौका चौकात भाविकांनी रांगोळीच्या पायघड्या व पुष्पवर्षाव, फटाक्यांची आतिषबाजीने पालखी सोहळ्याचे स्वागत केले. या निमीत्ताने संपूर्ण मंदिरास नयनरम्य अशी आकर्षक विद्युत रोषणाई करण्यात आली होती.

पालखी सोहळ्याचे चौकाचौकात भाविकांनी रांगोळी व गुलाबपुष्पांच्या उधळणासह स्वागत करून दर्शन घेतले. फत्तेसिंह चौक, समर्थ चौक, सावरकर चौक, कारंजा चौक मार्गे समाधी मठाकडे पालखी सोहळ्याचे प्रस्थान झाले समाधी मठात पालखीचे पूजन, भजन होऊन कारंजा चौकमार्गे सुभाष गल्ली, भारत गल्ली, देशमुख गल्ली मार्गे वटवृक्ष मंदिरात पालखी विसावली.

वटवृक्ष मंदिरात भजन, विडा, चौरी, आरती होऊन शिरा प्रसाद वाटपाने पालखी सोहळ्याची सांगता झाली. आज स्वामी पुण्यतिथी निमित्त आ.सचिन दादा कल्याणशेट्टी, नगराध्यक्ष मिलन कल्याणशेट्टी, मा.आमदार सिद्धाराम म्हेत्रे आदीसह विविध मान्यवरांनी श्रींचे दर्शन घेतले. श्री स्वामी पुण्यतिथी निमित्त महाराष्ट्रातील कानाकोपऱ्यातून स्वामीभक्त अक्कलकोट नगरीत दाखल झाले होते, त्यामुळे अक्कलकोट शहरातील रस्ते गर्दीमुळे फुलून गेले होते. यावेळी देवस्थानचे सचिव आत्माराम घाटगे, प्रथमेश इंगळे, विश्वस्त महेश गोगी, उज्वलाताई सरदेशमुख, संपतराव शिंदे, प्रदीप झपके, विजय दास, नगरसेवक अविनाश मडीखांबे, महेश हिंडोळे, खाजप्पा झंपले, श्रीशैल गवंडी, प्रसन्न हत्ते, नागनाथ जेऊरे, प्रमोद हिंडोळे, राजेश नीलवणी, व्यंकट मोरे, अमर पाटील, रामचंद्र समाणे, शिवानंद स्वामी, प्रदीप हिंडोळे, पिंटू साठे, चंद्रकांत सोनटक्के, दीपक जरीपटके, प्रा.शिवशरण अचलेर, संजय बडवे,

शीवा जमगे, बाळासाहेब एकबोटे, दर्शन घाटगे, रमेश शिंदे सर, प्रसाद पाटील सर, अमर पाटील, अंजय फुटाणे, अविनाश क्षीरसागर, सागर गोंडाळ, संजय पाठक, गिरीश पवार, शशिकांत लिंबीतोटे, श्रीनाथ महामूरे, अक्षय सरदेशमुख, काशिनाथ गुरव, ज्ञानेश्वर भोसले, संतोष जमगे, मंगेश फुटाणे, स्वामीनाथ लोणारी, संतोष पराणे, संजय पवार, प्रसाद सोनार, मोहन जाधव, प्रसाद पाटील, नितीन शिंदे, गणेश दिवाणजी, किरण किरात, योगेश पवार, संजय बडवे, रवी मलवे, महेश मस्कले, चंद्रकांत गवंडी, गोकुळ गवंडी, सुनील गवंडी, आदीत्य गवंडी, सुनिल पवार, बंडेराव घाटगे, लक्ष्मण घंटे, स्वामीराव मोरे, अशोक घंटे, प्रशांत गुरव, ज्योती जरीपटके, सुवर्णा जाधव इत्यादींसह देवस्थानचे व श्री स्वामी समर्थ अन्नछत्र मंडळाचे कर्मचारी व सेवेकरी आदींसह शहरातील व परगावाचे अनेक स्वामी भक्त या पालखी सोहळ्यात सहभागी झाले होते.

# ग्रामदैवत श्री नागराजांच्या यात्रेला आजपासून सुरुवात

**तभा वृत्तसेवा**
**मोहोळ, दि. १६ एप्रिल-**



जिल्ह्यासह राज्यात जागृत देवस्थान म्हणून प्रसिद्ध असलेल्या मोहोळ येथील ग्रामदैवत श्री नागनाथमहाराज यांच्या यात्रेला उद्या शुक्रवार (१७एप्रिल) पासून सुरुवात होणार आहे. तैलाभिषकाने सुरू होणाऱ्या यात्रेची २६ एप्रिल रोजी श्रींचे तेल उतरवून सांगता होणार आहे. यात्रा काळात उत्साहाने आसमंत दुमदुमून निघणार आहे.

उद्या शुक्रवारी चैत्र अमावस्या दि. १७एप्रिल रोजी सकाळी श्रींना तेल लावून यात्रेस सुरुवात होणार आहे त्याचप्रमाणे रात्री वसंत पूजा गाभाऱ्यातील आरती चंदन उटी व प्रसाद असा कार्यक्रम होईल.शनिवार दि.१८ रोजी रात्री वसंतपूजा, गाभा-यातील आरती चंदन उटी, प्रसाद,होईल आणि प.पू.हेग्रस वंशज विनायकराव तथा अरुणबुवा मोहोळकर यांचे प्रवचन होणार आहे. रविवार दि. १९ रोजी वैशाख शुक्ल अक्षय्यतृतीया दिवशी श्री रघुनाथ बुवा रचित सोम नाथ बुवा बबनबुवा कुर्डे महाराज यांचे चक्रीभजन, रात्री १ वाजता श्री क्षेत्र वडवळहून श्रींच्या छत्रीचे आगमन होऊन पहाटे ४ वाजता श्रींची खर्गासह सवाद्य मिरवणूक व दिल्ली दरवाज्यात भाकणूक होणार आहे. दि. २० आणि २१ एप्रिल रोजी वसंत पूजा बाहेरील आरती चंदन उटी व प्रसाद होईल. दि. २२ एप्रिल रोजी श्री भिकलींग महाराजांचा अभिषेक भिकलिंग महाराजांची गुरू शिष्य यांची भेट, श्रींची सवाद्य मिरवणूक व रात्री शोभेचे दारुकाम होईल.

दि. २३ एप्रिल रोजी सकाळी श्रींची पूजा व दुपारी ४ वाजता श्रींच्या पालखीची गणासह सवाद्य मिरवणूक व भाकणूक होईल. शुक्रवारी २४ एप्रिल रोजी सकाळी कलगीतुरे व दुपारी ४ वाजता कुस्त्याचे मैदान तर सायंकाळी ६ वाजता श्रींच्या छत्रीचे वडवळकडे प्रस्थान होईल. रविवारी २६ एप्रिल रोजी सकाळी श्रींचे तेल उतरविण्याच्या कार्यक्रमाने यात्रेची सांगता होणार आहे.

**सीसीटीव्हीची नजर** : नागनाथ महाराजांच्या यात्रेत मोठ्या प्रमाणात भाविक येतात. त्यांच्या सुरक्षिततेच्या दृष्टिकोनातून नागनाथ देवस्थान पंच कमिटीच्यावतीने यात्रा परिसरात सीसीटीव्ही कॅमेरे बसविण्यात येणार असल्याची माहिती देवस्थान पंच कमिटीचे अध्यक्ष प्रकाश देशमुख आणि पंच कमिटीच्या वतीने देण्यात आली.

सोलापूर तरुण भारत, सोलापूर येथून प्रकाशित केले. विभागीय आवृत्ती : धाराशिव, लातूर, सातारा, छत्रपती संभाजीनगर, नांदेड, परभणी, हिंगोली, जालना व बीड, तसेच विजयपूर, कलबुर्गी, बीदर (कर्नाटक) येथून प्रकाशित केले.



## अग्रलेख...

# या लढाईचे आव्हान!

केवळ मानवजातीच्याच नव्हे, तर एकूणच सर्व जीवसृष्टीच्या अस्तित्वास सर्वाधिक कडवे आव्हान कोण देतो, याची तीव्र स्पर्धा सध्या माणूस आणि निसर्ग यांच्यात सुरू आहे. अमेरिका-इस्रायल-इराणदरम्यानच्या भीषण युद्धसंघर्षामुळे जवळपास संपूर्ण जग ऊर्जा संकटाशी सामना करू लागले आहे. ही स्थिती निसर्गाने आणलेली नाही. काही मानवनिर्मित संकटे निसर्गाहून क्रूरपणे अस्तित्वावर कसा हल्ला करतात, याचा सध्याची युद्धस्थिती हा चालताबोलता पुरावा आहे. अशा संकटातून बाहेर पडण्याचे मार्ग केव्हा खुले होतील, याची आजच्या घडीला कोणतीही खात्री नाही. युद्धकाळामुळे उभ्या ठाकलेल्या संकटातून सावरण्यासारखी परिस्थिती सुरू होईल, तेव्हा निसर्गाचे संकट सुरू होईल आणि ती दुसरी लढाईच असेल, याची जाणीव आता गडद होऊ लागली आहे. हवामान बदल हे गेल्या काही दशकांतील सर्वात मोठे नैसर्गिक संकट मानले जाते. त्याचे तडाखे मानवजातीलाच नव्हे, तर सर्वच सजीवांना बसतात. जगणे होरपळून टाकणारा हा अनुभव गेल्या काही दशकांत वारंवार मिळत असल्याने, वातावरणातील बदलाचे संकट कायमचेच सजीवांच्या मानगुटीवर बसले आहे. आता तेच संकट नव्या आक्रमणासाठी सज्ज झाले आहे.

सलग काही वर्षे सरासरीपेक्षा जास्त पाऊस झाल्यानंतर यंदाचा मान्सून सरासरीपेक्षा कमी राहील, अशी शक्यता अलिकडेच हवामान खात्याने व्यक्त केली आणि या संकटाचे संकेत सुरू झाले. भारतात वर्षभरात पडणाऱ्या पावसापैकी सुमारे ७० टक्के पाऊस केवळ जून ते सप्टेंबर या जेमतेम चार महिन्यांच्या कालावधीतच पडत असतो. यंदा या काळातील पाऊस दीर्घकालीन, म्हणजे गेल्या सुमारे ५० वर्षांतील जून ते सप्टेंबरमधील पावसाच्या सरासरीच्या ९२ टक्के इतका राहण्याची शक्यता आहे. म्हणजे गेल्या ५० वर्षांतील कमी पावसाची नोंद यंदाच्या मान्सूनच्या मोसमात होण्याची शक्यता आहे. पावसाच्या सरासरीतील ही तूट सुमारे ८ टक्के असेल. जेव्हा सरासरीहून अधिक पाऊस पडतो, तेव्हा माजणाऱ्या हाहाकाराचा अनुभव अलिकडेच आपण घेतला होता. २०२४ आणि २०२५ या दोन्ही वर्षांतील मान्सूनच्या मोसमात पावसाच्या सरासरीमध्ये ८ टक्क्यांची वाढ झाली, तेव्हा मोठ्या प्रमाणावर पूरस्थिती निर्माण झाली; मालमत्ता, पायाभूत सुविधा यांचे नुकसान तसेच जीवितहानी झाली. हवामान खात्याच्या अंदाजानुसार यंदाचा पावसाच्या सरासरीत ८ टक्क्यांची तूट झाली तर २०१९ नंतरचा हा सर्वात कमकुवत मान्सून ठरेल आणि खरीप हंगामातील तांदूळ, मका, ऊस, कडधान्ये, तेलबियांसारख्या पिकांवर संकटाचे सावट दिसेल. साधारणतः मे अखेर किंवा जूनच्या सुरुवातीस या पिकांची पेरणी सुरू होते. ऑक्टोबरच्या दरम्यान ती हाताशी येतात. आजही देशातील जवळपास ४५ टक्के शेती क्षेत्र सिंचनाच्या सुविधांपासून दूरच असल्याने मान्सूनचा पाऊस हाच शेतकऱ्यांचा हमखास आधार असतो. यंदा पावसाळ्याच्या उत्तरार्धात 'अल निनो' या हवामानविषयक घडामोडीचा प्रभाव मान्सूनच्या पावसातील तुटीस कारणीभूत ठरण्याची शक्यता आहे. भारतीय अर्थव्यवस्थेची कणा मानली जाणारी शेती आजही मोठ्या प्रमाणावर पावसावर अवलंबून आहे. त्यामुळे मान्सूनच्या लहरीपणाचा परिणाम केवळ शेतकऱ्यांपुरता मर्यादित राहत नाही, तर तो देशाच्या अर्थव्यवस्थेवर, महागाईवर आणि सामाजिक स्थैर्यावरही उमटतो. कारण यातूनच दुष्काळ, उष्णतेच्या लाटा व जलसंकट यांसारख्या समस्यांना तोंड द्यावे लागते. उष्णतेच्या लाटांनी तर आताच विक्रमी उंची गाठण्यास सुरुवात केली असून महाराष्ट्रातील सुमारे १५ जिल्हे या संकटात होरपळणार असल्याचा इशारा जारी झाला आहे. उष्माघाताने एकएक बळी घेण्यास सुरुवात केली आहे. येत्या महिनाभरात उष्णतेच्या लाटा आपले तडाखे तीव्र करतील, असे इशारे जारी झाले आहेत. राज्यात उष्णता कृती आराखडा आणि भारतीय हवामान विभागाने उष्णतेपासून बचाव करण्यासाठी व्यापक मानक कार्यपद्धती जारी केल्या आहेत. कामगार, खाण कामगार आणि घाम गाळून काम करणाऱ्या श्रमिक वर्गास अशा संकटांचे चटके सर्वाधिक बसतात. त्यामुळे नैसर्गिक संकटे हे सातत्यपूर्ण आव्हान ठरले आहे. विशेषतः उत्तर व मध्य भारतात उष्माघातामुळे मृत्यूंची संख्या वाढल्याचे अनेकदा दिसून आले आहे. पाण्याची टंचाई, वीज मागणीतील वाढ आणि आरोग्यविषयक समस्या या सर्व गोष्टी एकाच वेळी तीव्र होतात. पर्यायी साधनसंपत्तीच्या अभावामुळे ग्रामीण भागात तर परिस्थिती अधिकच गंभीर बनते. २०१५ मध्ये 'अल निनो'मुळे भारतातील पावसाची सरासरी १४ टक्क्यांनी घटली, तेव्हा अन्नधान्य उत्पादनात २.३ टक्क्यांची घट झाली होती. यंदा पावसाचे प्रमाण घटल्यास शेतीसमोर आव्हान उभे राहीलच; पण पश्चिम आशियातील युद्धामुळे निर्माण झालेल्या संकटाची त्यामध्ये भर पडलेली असेल. नैसर्गिक वायू व खतांच्या पुरवठ्यात अडथळे निर्माण झाले आहेत. नैसर्गिक वायूपासून नायट्रोजनयुक्त खतांची निर्मिती केली जाते. सध्या देशात तांदूळ आणि गव्हाचा साठा समाधानकारक असला, पावसाने पाठ फिरविल्यास अन्नधान्य, कडधान्य आणि तेलबियांच्या किमती वाढण्याची शक्यता आहे. पावसाची कमतरता हा केवळ शेतीलाच शाप ठरतो असे नाही. पिण्याच्या पाण्याची टंचाई आणि वीजनिर्मितीला फटका हे या संकटाचे 'साईड इफेक्टस्' असतात. अल निनो ही प्रशांत महासागरातील पाण्याच्या तापमानवाढीशी संबंधित नैसर्गिक प्रक्रिया आहे. परंतु तिचे परिणाम स्थानिक पातळीपुरते मर्यादित न राहता जागतिक स्तरावर जाणवतात. भारतात अल निनोमुळे मान्सूनचा पाऊस दडी मारतो, हा इतिहासच आहे. याआधी १९७२, १९८७, २००२ आणि २००९ ही वर्षे भारतातील दुष्काळासाठी कुप्रसिद्ध ठरली. या काळातही मान्सूनच्या हंगामावर अल निनोचा प्रभाव होता. २००२ मधील दुष्काळाने देशातील अन्नधान्य उत्पादनावर मोठा परिणाम केला आणि आर्थिक वाढीचा वेग मंदावला. गेल्या वर्षभरात जगभराने 'अल निनो'च्या प्रभावाचे मोठे फटके अनुभवले. २०२५ मध्ये पृथ्वीवरील हिमनद्या मोठ्या प्रमाणावर वितळल्या. एका जागतिक अहवालानुसार, गेल्या वर्षात सुमारे ४०० अब्ज टन बर्फ वितळले आणि जागतिक समुद्रपातळीत १.१ मिलीमीटरने वाढ झाली. संपूर्ण वर्षभरात प्रत्येक सेकंदाला ऑलिम्पिक आकाराच्या पाच जलतरण तलावांइतका बर्फ नष्ट होत असल्यासारखी ही स्थिती आहे, हा या अहवालातील इशारा संकटाचे गांभीर्य अधोरेखित करण्यासाठी पुरेसा आहे. कॅनडाचा पश्चिम भाग, अमेरिका आणि मध्य युरोपात बर्फ वितळण्याचे हे प्रमाण सर्वाधिक असल्याने या प्रदेशांतील सुमारे दोन अब्ज लोकांच्या जलसुरक्षेला मोठा धोका निर्माण झाला असून बर्फ वितळण्याचा वेग झपाट्याने वाढत असल्याचे निष्पन्न झाले आहे. २० व्या शतकाच्या उत्तरार्धात दरवर्षी १०० अब्ज टनांपेक्षा कमी बर्फ वितळत असे; आता हा आकडा ४०० अब्ज टनांहून अधिक झाला आहे.

एकूणच, निसर्गनिर्मित संकटे आणि मानवनिर्मित संकटे यांच्या कचाट्यात सापडलेल्या यच्चयावत सजीव समुदायांस आता अनिश्चिततेशी जुळवून घ्यावे लागणार, हे स्पष्ट झालेले आहे. सरकारनेही गेल्या काही वर्षांत या दिशेने काही पावले उचलली आहेत. पण केवळ सरकारी उपाययोजनांवर विसंबून या संकटाचा सामना करणे शक्य नाही. काही जबाबदाऱ्या समाजासही उचलाव्या लागतील. पाण्याचा कार्यक्षम वापर, शेतीमध्ये तंत्रज्ञानाचा वापर, ग्रामीण अर्थव्यवस्थेकडे बळ देणारे शेतीपूरक उद्योग, स्थानिक पातळीवर जलसंधारण उपक्रम यांवर भर द्यावा लागेल. हवामानातील बदलांना सामोरे जाणे ही केवळ सरकारची जबाबदारी असणार नाही, तर ती सामूहिक प्रयत्नांची कसोटी ठरणार आहे. अल निनोकडे आता केवळ नैसर्गिक घटना म्हणून पाहणे योग्य ठरणार नाही. शेती, अर्थव्यवस्था आणि समाज या तिन्ही स्तरांवर परिणाम करणारे ते एक व्यापक आव्हान आहे. एका परीने मानवनिर्मित संकटापाठोपाठ सुरू होणारे हे दुसऱ्या लढाईचे आव्हान असणार आहे. या आव्हानाला सामोरे जाण्यासाठी दूरदृष्टी, वैज्ञानिक दृष्टिकोन आणि ठोस धोरणात्मक उपाययोजना आवश्यक आहेत. अन्यथा, प्रत्येक वर्ष नव्या संकटांची मालिका घेऊन येत राहील.

---

## अर्थविशेष

हितेश पारसे

# ज्येष्ठ नागरिकांनी आयकर रिटर्न भरायलाच हवे का?

भारतात वाढत्या आयुर्मानामुळे ज्येष्ठ नागरिकांची संख्या लक्षणीयरीत्या वाढत आहे आणि निवृत्तीनंतरचे जीवन आर्थिकदृष्ट्या सुरक्षित व सुसंगत ठेवणे ही प्रत्येकासाठी अत्यंत महत्त्वाची बाब बनली आहे. बहुतांश ज्येष्ठ नागरिक पेन्शन, बँक व्याज, मुदत ठेवी, भाडे किंवा लहान गुंतवणुकीतून उत्पन्न मिळवत असतात. या पृष्ठभूमीवर 'आयकर रिटर्न भरावा लागतो का?' हा प्रश्न वारंवार विचारला जातो. अनेक वेळा 'उत्पन्न कमी आहे' किंवा 'निवृत्त आहोत' या कारणांमुळे विवरणपत्र भरले जात नाही. मात्र हा दृष्टिकोन चुकीचा ठरू शकतो.

आयकर कायद्यानुसार, ६० वर्षे पूर्ण केलेल्या व्यक्तीला 'ज्येष्ठ नागरिक' आणि ८० वर्षांपेक्षा जास्त वय असलेल्या व्यक्तीला 'अतिज्येष्ठ नागरिक' मानले जाते. या वर्गीकरणानुसार करमुक्त मर्यादेत सवलती दिल्या आहेत. ज्येष्ठ नागरिकांसाठी ३,००,००० आणि अतिज्येष्ठ नागरिकांसाठी ५,००,००० पर्यंतचे उत्पन्न करमुक्त असते. तथापि, ही मर्यादा ओलांडल्यास विवरणपत्र भरणे बंधनकारक ठरते. परंतु, केवळ उत्पन्नाच्या मर्यादेवरून निर्णय घेणे योग्य नाही. बँक एफडी किंवा बचत खात्यावरील व्याजावर अनेक वेळा टीडीएस कपात केला जातो. अशा वेळी, जरी उत्पन्न करमुक्त मर्यादेपेक्षा कमी असले, तरी तो टीडीएस परत मिळविण्यासाठी विवरणपत्र भरणे आवश्यक असते. अन्यथा, ती रक्कम सरकारकडेच राहते. डिजिटल युगात आयकर विभागाकडे एआयएस (अन्युअल इन्फॉर्मेशन स्टेटमेंट) आणि टीआयएस (टॅक्सपेयर इन्फॉर्मेशन समरी) च्या माध्यमातून सर्व आर्थिक व्यवहारांची माहिती उपलब्ध असते. मोठे व्यवहार, मालमत्ता खरेदी-विक्री, बँक व्यवहार, गुंतवणूक यांची माहिती विभागाकडे आधीपासून असते. त्यामुळे विवरणपत्र न भरल्यास नोटीस येण्याची शक्यता वाढते. सेक्शन १९४पी अंतर्गत सरकारने ७५ वर्षांवरील काही ज्येष्ठ नागरिकांना सवलत दिली आहे. ज्यांचे उत्पन्न फक्त पेन्शन आणि त्याच बँकेतून मिळणाऱ्या व्याजापुरते मर्यादित आहे आणि ज्यांनी फॉर्म १२बीबीए सादर केले आहे, अशा व्यक्तींना विवरणपत्र भरण्याची गरज राहत नाही. मात्र, ही सवलत मर्यादित असून इतर उत्पन्न असल्यास लागू होत नाही. पेन्शन ही 'सॅलरी इन्कम' म्हणून गणली जाते आणि त्यावर ५०,०००/७५,००० स्टँडर्ड डिडक्शन मिळते. दुसरीकडे, बँक व्याज 'इन्कम फ्रॉम अदर सोर्स'मध्ये येते आणि सेक्शन ८० टीटीबी अंतर्गत ५०,००० रुपयांपर्यंत सूट मिळते. योग्य नियोजन केल्यास कराचा भार कमी करता येतो.

**ज्येष्ठ नागरिकांची व्याख्या :** ज्येष्ठ नागरिक ६० ते ८० वर्षे, अतिज्येष्ठ नागरिक ८० वर्षांपेक्षा जास्त

**करमुक्त मर्यादा :** वर्ग करमुक्त उत्पन्न मर्यादा : सामान्य व्यक्ती २,५०,०००, ज्येष्ठ नागरिक ३,००,०००, अतिज्येष्ठ नागरिक ५,००,०००

**आयकर विवरणपत्र कधी भरावे? :** खालील परिस्थितीत आयकर विवरणपत्र भरणे बंधनकारक आहे - (१) उत्पन्न मर्यादेपेक्षा जास्त असल्यास- उदा. ३,००,००० किंवा ५,००,००० पेक्षा जास्त. (२) ठरावीक आर्थिक व्यवहार झाल्यास- १ कोटीपेक्षा जास्त चालू खात्यात जमा. ५० लाखांपेक्षा जास्त बचत खात्यात जमा, २ लाखांपेक्षा जास्त परदेश प्रवास खर्च, १ लाखापेक्षा जास्त वीज बिल, ४. विवरणपत्र न भरल्यास धोके. सर्व व्यवहारांची माहिती शासनाकडे उपलब्ध असते, तफावत आढळल्यास नोटीस येऊ शकते, परतावा मिळत नाही, दंड लागू शकतो (१,००० ते ५,०००), ५. स्रोतावर कर कपात (टीडीएस) असल्यास. बँक ठेवींवरील व्याजावर अनेकदा कर कपात होते, उत्पन्न करमुक्त असले तरी कपात झालेला कर परत मिळविण्यासाठी विवरणपत्र भरणे आवश्यक, ६. विशेष सवलत (७५ वर्षांवरील)



**खालील अटी पूर्ण असल्यास विवरणपत्र भरण्याची गरज नाही :** वय ७५ वर्षांपेक्षा जास्त. फक्त निवृत्तिवेतन आणि त्याच बँकेतील व्याज उत्पन्न. संबंधित घोषणापत्र सादर केलेले. बँक स्वतः कराची गणना करून कपात करते.

**उत्पन्नाचे प्रकार व सूट-** (१) निवृत्तिवेतन - ५०,००० पर्यंत निश्चित कपात. (ब) व्याज उत्पन्न - ५०,००० पर्यंत सूट. (क) इतर सूट. गुंतवणूक (१.५ लाख पर्यंत). आरोग्य विमा (५०,००० पर्यंत).

**प्रत्यक्ष उदाहरणे :** १ : विवरणपत्र बंधनकारक नाही. श्री. देशमुख (वय ६५ वर्षे) निवृत्तिवेतन = २,४०,००० रुपये, व्याज = ४०,००० रुपये, एकूण = २,८०,००० रुपये. कर - नाही. विवरणपत्र - ऐच्छिक. २ : परताव्यासाठी आवश्यक- श्रीमती जोशी (वय ६२ वर्षे) - ठेवींवरील व्याज = २,८०,००० रुपये. कर कपात = २८,००० रुपये. कर देयक शून्य. २८,००० परत मिळविण्यासाठी विवरणपत्र आवश्यक. ३ : कर लागू होतो. श्री. कुलकर्णी (वय ६७ वर्षे). निवृत्तिवेतन = ४,००,००० रुपये. व्याज = १,००,००० रुपये, एकूण = ५,००,००० रुपये,, वजावट : ५०,००० (निश्चित कपात)- ५०,००० (व्याज सूट). करपात्र उत्पन्न = ४,००,००० रुपये, विवरणपत्र बंधनकारक. ४ : विशेष सवलत लागू - श्री. पाटील (वय ७८ वर्षे)- निवृत्तिवेतन = ५,००,००० रुपये, व्याज = २,००,००० रुपये, बँकेत घोषणा दिलेली विवरणपत्र भरण्याची गरज नाही

**सामान्य चुका :** आवश्यक घोषणा न देणे - उपलब्ध सूट न घेणे - व्यवहारांची पडताळणी न करणे - संयुक्त ठेवीत उत्पन्न चुकीने दाखवणे

**विवरणपत्राचे फायदे :** कर्जासाठी आवश्यक - परदेश प्रवासासाठी उपयोगी - उत्पन्नाचा अधिकृत पुरावा - आर्थिक विश्वासार्हता वाढते

**कोणता फॉर्म वापरावा? :** परिस्थिती फॉर्म. निवृत्तिवेतन + व्याज फॉर्म क्रमांक १. भाडे/भांडवली नफा फॉर्म क्रमांक २. व्यवसाय उत्पन्न फॉर्म क्रमांक ३. अनेक ज्येष्ठ नागरिक फॉर्म १५एच भरत नाहीत, डिडक्शन घेत नाहीत किंवा एआयएस तपासत नाहीत. या चुका टाळण्यासाठी योग्य मार्गदर्शन आवश्यक आहे. तज्ज्ञांचा सल्ला घेतल्यास कर नियोजन प्रभावी करता येते.

**कलम ८७अ अंतर्गत कर सवलत**

जर एखाद्या ज्येष्ठ नागरिकाचे एकूण करपात्र उत्पन्न रु. ५,००,००० पर्यंत असेल (जुनी कर पद्धती), तर कलम ८७अ अंतर्गत त्यांना जास्तीत जास्त १२,५०० पर्यंत कर सवलत मिळते. त्यामुळे अशा परिस्थितीत प्रत्यक्ष कर देयक शून्य होते. तसेच, नवीन कर पद्धतीनुसार जर करपात्र उत्पन्न १२,००,००० पर्यंत असेल, तर कलम ८७अ अंतर्गत ६०,००० पर्यंत कर सवलत मिळते, ज्यामुळे प्रत्यक्ष कर देयक शून्य होऊ शकते. मात्र, ही सवलत मिळविण्यासाठी आयकर विवरणपत्र भरणे आवश्यक आहे.

**निष्कर्षतः** सर्व ज्येष्ठ नागरिकांसाठी विवरणपत्र भरणे बंधनकारक नसले, तरी अनेक परिस्थितींमध्ये ते आवश्यक आणि फायदेशीर ठरते. जसे की, उत्पन्न मर्यादा ओलांडल्यास, कर परतावा घ्यायचा असल्यास, भाडे/नफा असल्यास, योग्य माहिती, जागरूकता आणि नियोजन यामुळे आर्थिक लाभ मिळू शकतो.

९०९६३३२३५३
(लेखक कर व मालमत्ता हस्तांतरण सल्लागार आहेत.)

---

## वेध

रेवती जोशी-अंधारे

# फ्री डिलिव्हरीचा 'गोड गुंता!'

सध्याच्या काळात 'क्विक कॉमर्स' नावाची एक भयंकर सोय आपल्या सेवेत हजर आहे. भयंकर यासाठी की, ही सेवा नकळत आपल्या निर्णयक्षमतेला प्रभावित करू लागली आहे. एका क्लिकवर दूध-दह्यापासून गहू-तांदळापर्यंत, चपला-जोड्यांपासून औषधांपर्यंत प्रत्येक वस्तू काही मिनिटात दारात हजर होते. ही अतिशय आधुनिक आणि परिपूर्ण सुविधा आता घरातील प्रत्येकाच्या हातातील मोबाईलमध्ये आपल्या सेवेसाठी सज्ज आहे. इतकी 'सज्ज' की ती स्वतःच्या अस्तित्वाची आठवण सतत करून देते. अलाउद्दीनच्या दिव्यासारखी ही सुविधा मूलभूत गरज बनली आहे. मग त्या वस्तूंची खरंच गरज असो किंवा नसो, वस्तू दारात येऊन तयारच!

ऑनलाईन शॉपिंग म्हणजे आधीच एक व्यसन आणि त्यात अमुक एका रकमेची खरेदी करा आणि फ्री डिलिव्हरी मिळवा, अशी लक्षवेधी गळ घातली गेल्यानंतर, सामान्य माणूस सहज त्या 'गळाला' लागतो. खरे तर तातडीने गरज असते, एक लिटर दुधाची! साधारण ५० रुपयाचे दुधाचे पाकीट डिलिव्हरी चार्जेससोबत ८० रुपयांचे होताना बघून आपला जीव दडपतो. त्याच क्षणी मेसेज येतो, 'काही विसरलात का?' मग, दही, बटर, चीझ, ताक असे पर्याय येतात आणि सोबत 'फक्त २५ रुपयांची खरेदी करून मिळवा फ्री डिलिव्हरी!' हा मेसेजही येतो. ही चांगली ऑफर आहे, असे म्हणून आपण एक पाकीट बटर आपल्या ऑनलाईन कार्टमध्ये अॅड करतो. त्याच क्षणी आपण फ्री डिलिव्हरीपासून फक्त २० रुपये दूर असल्याचे सांगणारा मेसेज येतो आणि ब्रेड, ब्राऊन ब्रेड, पावाचे अनेक प्रकार पुढ्यात येतात. 'अरे हो! बटरसोबत ब्रेड हवीच' या बाळबोध विचाराने एक ब्रेडचं पाकीट आपण अॅड करतो. तोपर्यंत, १० रुपयांच्या आईसकँडीज्, कोल्डड्रिंक अशी जंत्री पुढ्यात हजर होते. १०-२० रुपयांची आणखी खरेदी करून, पेमेंट करून आपण मोकळे होतो. म्हणजे ५० रुपयांच्या दुधाच्या पाकिटापासून सुरू झालेली खरेदी दीडशे रुपयांपर्यंत संपते. नकळत आपण 'क्विक कॉमर्स'च्या जाळ्यात अलगद अडकलेले असतो. कोणत्याही ऑर्डरची किमान किंमत हा विचार करण्याचा विषय आहे. ५० रुपयांच्या वस्तूचीच गरज असताना, केवळ डिलिव्हरी शुल्क द्यावे लागू नये म्हणून आपण २०० रुपयांची खरेदी करून टाकतो. खर्च वाढत जातो, ठळक दिसेल असा नाही तर गुपचूप! क्विक कॉमर्सच्या जगात आपल्या या वागणुकीचा अभ्यास करणारी यंत्रणा अखंड काम करते आहे. 'बिहेव्हियरल इकॉनॉमिस्ट्स' या प्रक्रियेला 'फ्रिक्शनलेस स्पेंडिंग' असं म्हणतात. जेव्हा पैसे देण्याची प्रक्रिया इतकी सोपी असते तेव्हा अगदी सहज आपलं त्याकडे लक्षही जात नाही. यात दुसरा प्रकार क्रेविंग्जचा आहे. रात्री-अवेळी काहीतरी खायची इच्छा होणं, म्हणजे 'क्रेविंग'. अशा स्थितीत दोन पर्याय असतात. त्या क्षणी संयम बाळगून शांत राहणे म्हणजे दुसऱ्या दिवशी सकाळपर्यंत आपण विसरतो. दुसरा पर्याय मन कशाला मारायचं? या कॅटेगरीतील असतो. झटपट ऑर्डर करायची, दारात आलेल्या चीजवस्तूचा आनंद घ्यायचा आणि महत्त्वाचं म्हणजे बिनदिक्कत जास्तीचे पैसे खर्चायचे. 'मिनिमम कार्ट व्हॅल्यू'च्या या गोड आणि नकळत लादल्या जाणाऱ्या दबावतंत्रातून बाहेर यायला हवं. 'हे देखील घेऊनच टाकू या...' हा विचार अनावश्यक आणि जास्तीच्या वस्तू प्रत्येक फ्री डिलिव्हरीसोबत येतात. महिन्याच्या शेवटी इतके पैसे आपण कशावर खर्च केले, हेसुद्धा नंतर आपल्याला जाणवत नाही. थोडं थांबून, पुन्हा विचार करून निर्णय घ्यायला आपल्याला वेळ द्यायचा नाही, हे क्विक कॉमर्सचे मूळ सूत्र आहे. या विविध अॅपच्या माध्यमातून खरेदीचा नेमका फायदा घेणं, विविध ऑफर्सचे कूपन अप्लाय करणं आणि संयमित खरेदी करणं हे ग्राहक म्हणून आपलं कौशल्य आहे. खरेदीसाठी याद्या बनविणं, कोपऱ्यावरचा भाजीवाला किंवा वाण्याशी घरगुती संबंध असणं, त्यांच्याकडे उधारीची खाती चालविणं, दूध-ब्रेडसाठी थोडं चालत जाणं या सगळ्यांतून थोडे पैसे वाचविणे, संयमाची सवय, लोकांशी संवाद आणि 'डिजिटल डिटॉक्स' असे फायदे नक्कीच होतात.

हे अॅप बिनकामाचे आहेत किंवा क्विक कॉमर्स वाईट आहे, असे नाही. ती एक वेळ वाचविणारी सोय आहे. फक्त, त्याची सवय लागता कामा नये. या नियंत्रणामुळे जीवनात खूप आमूलाग्र बदल वगैरे होणार नाहीत, पण, आपल्या खाण्यापिण्याच्या सवयी मात्र नक्कीच सुधारतील आणि माणसात आल्यासारखं वाटेल. १० मिनिटांच्या सोयीसाठी आपण काय गमावत आहोत, ते स्पष्ट होईल. खूपच आवश्यक असेल तेव्हाच दैनंदिन खरेदी या अॅप्सवरून करा. मनमौजी न होता संयमाची गुरुकिल्ली शोधा. ऑनलाईन नाही हो...तुमच्याचजवळ!

९८५०३३९२४०

---

## दखल

शिवाजी कराळे

# कॉर्पोरेट क्षेत्रातील महिलांची असुरक्षितता

नाशिकमधील 'टाटा कन्सल्टन्सी सर्व्हिसेस' या नामांकित आयटी कंपनीमधील महिला कर्मचाऱ्यांवरील कथित लैंगिक अत्याचार आणि त्यानंतर धर्मांतरासाठी दबाव आणल्याच्या आरोपांनी कॉर्पोरेट जगताला अस्वस्थ करणारे प्रश्न समोर आणले आहेत. या प्रकरणाकडे एखाद दुसरी घटना असल्याप्रमाणे पाहता येणार नाही. कारण यात कार्यस्थळी सुरक्षितता, सत्तेचा गैरवापर, तक्रार निवारण यंत्रणेची विश्वासार्हता आणि संस्थात्मक जबाबदारी अशा अनेक बाबींचा समावेश होतो. देशातील सर्वात प्रतिष्ठित कंपन्यांपैकी एक असलेल्या संस्थेबाबत अशा प्रकारच्या तक्रारी समोर येतात, तेव्हा त्या संबंधित कंपनीपुरत्याच मर्यादित राहत नाहीत, तर संपूर्ण कॉर्पोरेट संस्कृतीवर प्रश्नचिन्ह निर्माण करतात. या पृष्ठभूमीवर टाटा समूहाचे अध्यक्ष नटराजन चंद्रशेखरन यांनी दिलेली प्रतिक्रिया महत्त्वाची ठरते. त्यांच्या वक्तव्यात संस्थेची प्रतिमा जपण्याबरोबरच आरोपांचे गांभीर्य लक्षात घेऊन योग्य चौकशी होईल, असा संकेत दिसून येतो; मात्र अशा प्रसंगी केवळ आश्वासन पुरेसे ठरत नाही, तर पारदर्शक आणि निष्पक्ष तपास होऊन सत्य बाहेर येणे अधिक आवश्यक असते.

सेक्शुअल हॅरेसमेंट ऑफ वुमेन अॅक्ट, २०१३ सारखा कायदा तसेच विशाखा मार्गदर्शक सूचना या ऐतिहासिक मार्गदर्शक तत्त्वांमुळे प्रत्येक संस्थेला कार्यस्थळी लैंगिक छळ रोखण्याची जबाबदारी देण्यात आली आहे. प्रत्येक मोठ्या कंपनीत अंतर्गत तक्रार समिती, प्रशिक्षण कार्यक्रम आणि संवेदनशीलता उपक्रम राबविले जातात. कागदोपत्री ही व्यवस्था सक्षम आणि सर्वसमावेशक वाटते; मात्र अशा घटनांची संख्या वाढत असून त्या दडपण्याचे प्रकार वाढत आहेत. कॉर्पोरेट क्षेत्रातील महिलांनी लैंगिक छळाच्या तक्रारी केल्या, तर त्या संबंधित समित्यांकडे पाठवायला हव्यात. त्याची चौकशी व्हायला हवी. तथ्य आढळल्यास त्या पोलिसांपर्यंत पोहोचल्या पाहिजेत; परंतु नाशिकचे प्रकरण पाहता 'टीसीएस'च्या पुण्यातील मनुष्यबळ विभागाच्या अधिकाऱ्यांनी महिलांच्या तक्रारीची दखल घेतली नाही, असे दिसते. त्यामुळे या लैंगिक अत्याचारात त्यांना सहआरोपी केले, हे बरे झाले. प्रश्न असा आहे की, या सगळ्या चौकटी असूनही प्रत्यक्षात महिलांना सुरक्षिततेची हमी मिळते का? कॉर्पोरेट क्षेत्रात पद, सत्ता आणि संधी यांचा गुंतागुंतीचा खेळ सुरू असतो.

एखाद्या व्यक्तीवर त्याच्या इच्छेविरुद्ध धार्मिक ओळख बदलण्याचा दबाव आणला जात असेल, तर तो केवळ नैतिकतेच्या नव्हे, तर कायद्याच्या चौकटीतही गंभीर गुन्हा ठरतो; मात्र या मुद्याकडे पाहताना अत्यंत सावध दृष्टिकोन आवश्यक आहे. परिणामी प्रत्येक प्रकरणाची स्वतंत्र, पुराव्यांवर आधारित चौकशी होणे अत्यावश्यक आहे. व्यक्तींच्या कृत्यांना संपूर्ण समुदायाशी जोडणे टाळले पाहिजे. अन्यथा, न्यायाच्या प्रक्रियेवरच परिणाम होऊ शकतो. महिलांच्या सुरक्षिततेबाबत सर्वात मोठा प्रश्न केवळ नियमांचा नसून त्यांच्या अंमलबजावणीचा आहे. अनेक वेळा तक्रार समित्या अस्तित्वात असल्या तरी खऱ्या अर्थाने स्वतंत्र नसतात. वरिष्ठ व्यवस्थापनाचा प्रभाव, संस्थेची प्रतिमा जपण्याची धडपड आणि अंतर्गत राजकारण यामुळे तक्रारी दडपल्या जाण्याची शक्यता निर्माण होते. पीडित महिलांना बदली, नोकरी जाण्याची भीती किंवा बदनामी यांचा सामना करावा लागतो. परिणामी, अनेक घटना कधीच समोर येत नाहीत. हीच शांतता शोषणाला खतपाणी घालते. यावर उपाय म्हणून केवळ कायदे पुरेसे नाहीत, तर संस्थात्मक संस्कृतीत मूलभूत बदल आवश्यक आहेत. त्यासाठी पारदर्शकता, उत्तरदायित्व आणि पीडित-केंद्रित दृष्टिकोन यांचा अंगीकार करणे गरजेचे आहे. तक्रार करणाऱ्या महिलांना संरक्षण आणि मानसिक आधार देणे, चौकशी प्रक्रिया स्वतंत्र ठेवणे आणि दोषींवर कोणताही दबाव न आणता कठोर कारवाई करणे ही किमान अपेक्षा असावी. त्याचबरोबर पुरुष कर्मचाऱ्यांमध्येही संवेदनशीलता आणि जबाबदारीची जाणीव निर्माण करणे महत्त्वाचे आहे. कॉर्पोरेट क्षेत्र हे आधुनिकतेचे आणि प्रगतीचे प्रतीक मानले जाते; परंतु त्याच क्षेत्रात महिलांना सुरक्षिततेची हमी मिळत नसेल, तर ही प्रगती अपुरी आहे. पद आणि पैशाच्या मागे धावताना मानवी मूल्ये दुर्लक्षित होत असल्यास त्याची किंमत संपूर्ण समाजाला चुकवावी लागते. त्यामुळे महिलांच्या सन्मानाचे आणि स्वातंत्र्याचे रक्षण हे केवळ कायद्याचे नव्हे, तर प्रत्येक संस्थेच्या नैतिकतेचे मोजमाप ठरले पाहिजे. नोकरी, बढती किंवा वेतनवाढ यांसारख्या बाबींचे आमिष दाखवून जर शोषण होत असेल, तर तो केवळ वैयक्तिक गैरवर्तनाचा मुद्दा राहत नाही, तर ते संस्थात्मक अपयश ठरते. अशा वातावरणात पीडित महिलांसाठी आवाज उठवणे अधिक कठीण होते. कारण त्यांच्या समोर करीअर, आर्थिक स्थैर्य आणि सामाजिक प्रतिष्ठा यांचे प्रश्न उभे राहतात.

धर्मांतराच्या दबावासारख्या संवेदनशील आरोपांमुळे या प्रकरणाला आणखी एक गंभीर परिमाण मिळाले आहे. असे काही घडत असेल, तर ते कायद्याच्या चौकटीत तपासले जावे आणि दोषींवर कठोर कारवाई व्हावी; मात्र या मुद्यावर बोलताना व्यापक समाज किंवा विशिष्ट समुदायावर सरसकट आरोप करण्याऐवजी, संबंधित व्यक्तीच्या कृत्यांवर लक्ष केंद्रित करणे आवश्यक आहे. अन्यथा, अशा प्रकरणांचा वापर समाजात दुरावा आणि अविश्वास वाढविण्यासाठी होऊ शकतो. या संपूर्ण घडामोडींनी कार्यस्थळी महिलांची सुरक्षितता प्रत्यक्षात कितपत सुनिश्चित आहे, हा मूलभूत प्रश्न समोर आणला आहे. कायदे आणि धोरणे कागदावर असली, तरी त्यांची प्रभावी अंमलबजावणी होत आहे का, हे तपासायला हवे. तक्रारी ऐकून घेणारी यंत्रणा निष्क्रिय किंवा पक्षपाती असेल, तर पीडितांना न्याय मिळण्याची आशा क्षीण होते. अशा वेळी संस्थांनी केवळ नियमांचे पालन केल्याचा दिखावा न करता, प्रत्यक्षात सुरक्षित आणि न्याय्य वातावरण निर्माण करण्यासाठी कटिबद्ध राहणे गरजेचे आहे. या प्रकरणाचे सत्य काय आहे, हे निष्पक्ष चौकशीतूनच स्पष्ट होईल; परंतु इतके मात्र नक्की की, अशा आरोपांनी कॉर्पोरेट भारताला आत्मपरीक्षण करण्याची संधी दिली आहे. प्रतिष्ठा, नफा आणि विस्तार यांच्याइतकीच महत्त्वाची बाब म्हणजे कर्मचाऱ्यांचा सन्मान आणि सुरक्षितता. तीच धोक्यात आल्यास कोणतीही संस्था कितीही मोठी असली, तरी विश्वासार्हता टिकविणे कठीण ठरेल.

(लेखक विधिज्ञ आहेत.)

---

### जल संवर्धन काळाची गरज

पाणी हे जीवनाचे मूलभूत साधन आहे. 'जल आहे तर जीवन आहे' हे वाक्य अगदी सत्य आहे. मानव, प्राणी, पक्षी, वनस्पती, शेती, उद्योगधंदे आणि संपूर्ण पर्यावरण यांचे अस्तित्व पाण्यावर अवलंबून आहे. परंतु आज वाढती लोकसंख्या, पाण्याचा वाढता वापर, भूजलाची घटती पातळी, नद्यांचे प्रदूषण आणि जंगलतोड यामुळे पाण्याची टंचाई गंभीर समस्या बनली आहे. त्यामुळे जलसंवर्धन ही काळाची गरज बनली आहे. जलसंवर्धन म्हणजे पाण्याचे जतन करणे, योग्य वापर करणे, साठवण करणे आणि भविष्यासाठी सुरक्षित ठेवणे होय. निसर्गाने दिलेले पाणी मर्यादित आहे. त्याचा अपव्यय न करता नियोजनपूर्वक उपयोग केला पाहिजे. अनेक ठिकाणी पावसाचे पाणी वाहून जाते. जर ते योग्य प्रकारे साठवले तर भविष्यात पाण्याची समस्या कमी होऊ शकते. पाण्याचे महत्त्व जीवनाच्या प्रत्येक क्षेत्रात आहे. पिण्यासाठी स्वच्छ पाणी आवश्यक आहे. शेतीसाठी पाणी अत्यावश्यक आहे. उद्योगधंद्यांमध्येही पाण्याचा मोठ्या प्रमाणावर वापर होतो. मात्र, भूजलाचा अतिरेकी उपसा केल्यामुळे विहिरी-बोअरवेल कोरड्या पडत आहेत. नद्यांमध्ये सांडपाणी आणि कचरा सोडल्यामुळे जलप्रदूषण वाढत आहे. जंगलतोडी मुळे पावसाचे प्रमाण कमी होत आहे तसेच लोकसंख्या वाढीमुळे पाण्याची मागणीही वाढत आहे. जलसंवर्धनासाठी पावसाचे पाणी साठवणे हा उत्तम उपाय आहे. घरांच्या छतावरून येणारे पाणी टाक्यांमध्ये साठवून शेतीत ठिबक सिंचन आणि तुषार सिंचनाचा वापर केल्यास पाणी वाचते. शेतीत जलयुक्त शिवार हा मूलभूत उपाय मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या संकल्पनेतून राबविण्यात आला. त्याचा उन्नत प्रभाव बघायला मिळाला. नळ चालू ठेवणे, पाणी वाया घालवणे या सवयी बदलल्या पाहिजेत. तलाव, विहिरी आणि बंधारे यांची दुरुस्ती करून त्यांचा उपयोग वाढवता येतो. जास्तीत जास्त वृक्षारोपण केल्यास पावसाचे प्रमाण वाढते आणि जमिनीत पाणी मुरते. विद्यार्थ्यांनी पाण्याचा अपव्यय टाळावा, झाडे लावावीत, इतरांना जागरूक करावे आणि शाळेत जलसंवर्धनाचे उपक्रम राबवावेत. प्रत्येकाने आपल्या दैनंदिन जीवनात पाणी वाचवण्याची सवय लावली पाहिजे. शाळा-सरकारमार्फत जनजागृतीचे कार्यक्रम राबवावे. मोटार गाड्या पाईप लावून धुवू नये, छतावरच्या टाकीत पाणी वाहू देऊ नये. पाणी हे निसर्गाचे अमूल्य वरदान आहे. त्याचे संरक्षण करणे ही प्रत्येक नागरिकाची जबाबदारी आहे.

**अनंत कपाळे** / ९३७३१०२८९८

## वाचक पत्रे

### चांदणी चौकातील बस थांबा

साताऱ्याकडे अथवा स्वारगेटकडे जाताना सर्व बसेस चांदणी चौकात हायवेवर थांबतात. त्याठिकाणी उतरणाऱ्या प्रवाश्यांना बावधन अथवा कोथरूड येथे जायचे असते. प्रवासी सामानासह हायवेवर उतरल्यावर, मागून मुळशीकडून पुलावरून खाली भरधाव येणारी आणि साताऱ्याकडे किंवा कोथरूडकडे वेगात जाणाऱ्या वाहनांची त्यांना धडक बसणे आणि अपघात होणे याची प्रचंड शक्यता आहे. तसेच, हायवेवरून बावधनच्या सर्व्हिस रोडला एक जोड आहे. बसेस जरी तिथून आत आणल्या, तरी उतरलेल्या प्रवाशाला चालत कोथरूडच्या दिशेने पुढे उतरावे लागते किंवा बावधनच्या दिशेने मागे यावे लागते. माझी सूचना आहे की, मुळशीकडून येणाऱ्या पुलाखाली पुणे महानगर बस सेवेचा थांबा आहे. तिथेच म.रा.प. महामंडळाच्या साताऱ्याकडे जाणाऱ्या बसेस थांबवण्यात याव्या. कोथरूड मार्गे स्वारगेटला जाणाऱ्या बसेस, त्याच थांब्यालगत पण बावधन सेवा रस्त्यावर थांबवाव्या म्हणजे बावधनच्या प्रवाश्यांना सुरक्षितपणे उतरता येईल तसेच कोथरूडला जाऊ इच्छिणाऱ्या प्रवाशांसाठी कोथरूडचा उतार संपल्यानंतर भुसारी कॉलनी येथे थांबा द्यावा.

**प्रसाद भट** / बावधन, पुणे-९४२३३२९०००

### ग्रामीण भाग आणि अकरावीची ऑनलाईन प्रवेश प्रक्रिया

इयत्ता दहावीचा निकाल लागण्याच्या आधीच महाराष्ट्र राज्य माध्यमिक व उच्च माध्यमिक मंडळाच्या अकरावी ऑनलाईन प्रवेशाच्या नोंदणी प्रक्रियेला सुरुवात झाली आहे. मंडळाने दहावीचा निकाल लागण्यापूर्वीच अर्जाचा भाग-१ भरण्याची सुविधा उपलब्ध करून दिली आहे. परंतु अकरावी प्रवेशाचा ऑनलाईन अर्ज भरताना विद्यार्थ्यांना आपली सर्व माहिती अद्यायावत करावी लागणार व दहावीचा निकाल लागल्यानंतर प्रवेश अर्जाचा भाग-२ ज्यावेळेस सुरू होईल त्यावेळी महाविद्यालयाचा पसंती क्रमांक, मोबाईल क्रमांक आणि ई-मेल आयडी वापरावा लागेल; शिवाय कोणकोणती कागदपत्रे लागतात हाही विचार करावा लागेल. कॉलेजेसचे कटऑफ समजून घ्यावे लागतील. या सर्व ऑनलाईन प्रक्रियेतून जाताना ग्रामीण भागातील विद्यार्थ्यांना बऱ्याच अडचणींचा सामना करावा लागतो. मागील वर्षी ऑनलाईन प्रक्रियेचे योग्य मार्गदर्शन नसल्याने त्यांचे प्रवेश त्यांच्या गावापासून बऱ्याच अंतरावर असलेल्या महाविद्यालयात झाले. तेव्हा सर्व विद्यार्थ्यांना ग्रामीण भागातील शिक्षकांनी, पालकांनी, गावातील ऑनलाईन मार्गदर्शन केंद्रांनी लक्ष घालून त्यांची प्रवेश प्रक्रिया सुकर करावी.

**धनंजय पांडे** /अकोला

रविवारची पत्रे व वाचक पत्रे पाठविण्यासाठी ई-मेल अॅड्रेस
tbedit2016@gmail.com

सोलापूर तरुण भारत, सोलापूर येथून प्रकाशित केले. विभागीय आवृत्ती : धाराशिव, लातूर, सातारा, छत्रपती संभाजीनगर, नांदेड, परभणी, हिंगोली, जालना व बीड, तसेच विजयपूर, कलबुर्गी, बीदर (कर्नाटक) येथून प्रकाशित केले.

सोलापूर तरुण भारत
https://epaper.dainiktarunbharat.com/



## महत्वाचे...




## आंबेडकर जयंतीनिमित्त जनमंगल फाउंडेशनची पाणपोई

**सोलापूर, दि. १६ एप्रिल-**

ॉभारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर जयंती निमित्त जनमंगल पतसंस्थेच्या कार्यालयामध्ये आज जनमंगल फाउंडेशन व जनमंगल पतसंस्था यांच्या संयुक्त विद्यमाने डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या प्रतिमेस पुष्पहार अर्पण करून अभिवादन करण्यात आले.त्यानंतर जनमंगल पतसंस्थेच्या कार्यालयासमोर मोफत पाणपोईचे उद्घाटन करण्यात आले.याप्रसंगी जनमंगल फाउंडेशनचे अध्यक्ष कानिफनाथ थोरात , सदस्य संतोष क्षीरसागर, जनमंगल पतसंस्थेच्या चेअरमन सविता थोरात, सचिवा प्रीती कांबळे, संचालिका शिल्पा बावधनकर, सागर बावधनकर तसेच कर्मचारी वृंद उपस्थित होते.



## भीम प्रतिष्ठानतर्फे सोलापूर बार असोसिएशनला संविधान फ्रेम भेट

**सोलापूर, दि. १६ एप्रिल-**

भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांचे १३५व्या जयंतीनिमित्त भिम प्रतिष्ठानतर्फे संविधानाच्या उद्देशिकाची फोटो फ्रेम बार असोसिएशन सोलापूर यांना भेट देण्यात आली. याप्रसंगी भीम प्रतिष्ठानच्या संस्थापक दलितमित्र. बाबा बाबरे यांच्या हस्ते बार असोशियन यांचे अध्यक्ष अॅड. बाबासाहेब जाधव यांना संविधानाची उद्देशिका फोटो फ्रेम भेट देण्यात आली. यावेळी ज्येष्ठ वकील अॅड. संजीव सदाफुले, डॉ. बाबासाहेब आंबेडकर विधीमंडचे अध्यक्ष अॅड. शताब्दीकुमार दोड्यानुर, कार्याध्यक्ष अॅड. रविराज सरवदे, भीम प्रतिष्ठानच्या सचिव अकबर शेख, कार्याध्यक्ष सिद्धांत बाबरे आदी मान्यवर उपस्थित होते.

## बोधीवृक्ष रोप लावून डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांना अभिवादन

**सोलापूर, दि.१६ एप्रिल-**



भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या जयंती दिनानिमित्त सोलापूर येथे विश्वरत्न औषधीवनाची सुरुवात करण्यात आली.डॉ. बाबासाहेब आंबेडकर वसतिगृह तसेच क्रांतीज्योती सावित्रीबाई फुले वसतिगृह समोरील परिसरात बॉटनिकल गार्डन उभारणीचा शुभारंभ करण्यात आला असून, या उपक्रमाला विश्वरत्न वन असे नामकरण करण्यात आले. यावेळी बोधीवृक्ष (पिंपळ) रोप लावून डॉ. आंबेडकर यांना अभिवादन करण्यात आले. तसेच विविध देशी व औषधी वनस्पतींची लागवड करून पर्यावरण संवर्धनाचा संदेश देण्यात आला. पर्यावरण रक्षक उपमहापौर ज्ञानेश्वरी देवकर यांच्या हस्ते या बॉटनिकल गार्डन निर्मितीची सुरुवात करण्यात आली.या प्रसंगी नगरसेवक सत्यजित वाघमोडे, विशेष कार्यकारी अधिकारी महेश देवकर, पर्यावरण दूत डॉ. मनोज देवकर, वस्तीगृह अध्यक्षा मनीषा जगताप, राम हुंडारे, सिद्धार्थ भडकुंबे, मोहन कांबळे आणि विद्यार्थी वर्ग मोठ्या संख्येने उपस्थित होते.जयंतीनिमित्त १३५ रोपांची लागवड करून अभिवादन करण्यात आले.

# विद्यार्थ्यांच्या संकल्पनांतून सोलापूरच्या विकासाला नवी दिशा : महापौर कोंड्याल

### संवेद २०२६' स्मार्ट गव्हर्नन्स हॅकाथॉन अंतिम प्रकल्प प्रदर्शन व पारितोषिक वितरण सोहळा

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि.१६ एप्रिल-**

संवेद २०२६ हॅकाथॉनमधून शहरातील नागरी समस्यांवर अनेक अभिनव आणि व्यवहार्य उपाय समोर आले आहेत. विद्यार्थ्यांच्या संकल्पनांतून सोलापूरच्या विकासाला नवी दिशा मिळेल. या कल्पनांची अंमलबजावणी करून शहरातील सेवा अधिक सक्षम करण्यासाठी आम्ही पुढाकार घेऊ, असे प्रतिपादन महापौर विनायक कोंडयाल यांनी केले.

एमआयटी विश्वप्रयाग विद्यापीठात सोलापूर महानगरपालिकेच्या सहकार्याने आयोजित 'संवेद २०२६' स्मार्ट गव्हर्नन्स हॅकाथॉनच्या अंतिम प्रकल्प प्रदर्शन व पारितोषिक वितरण सोहळ्यात ते बोलत होते. यावेळी महापालिका आयुक्त डॉ. सचिन ओम्बासे, उपायुक्त आशिष लोकरे, अच्युत गोडबोले, प्रा. कृष्णा वेदुला, प्रा. विल्यम ओक्स, विद्यापीठाचे कुलगुरू प्रा. गोपाळकृष्ण जोशी, संचालक राघवेंद्र एम. चाटे, कुलसचिव प्राणेश मुरनाळ, डॉ. प्रभा कासलीवाल, डॉ. दर्शन रुईकर, डॉ. आनंद शिंपी उपस्थित आदी उपस्थित होते.

आयुक्त डॉ. ओंबासे म्हणाले की, विद्यार्थ्यांनी सुचवलेल्या उपाययोजनांना प्रत्यक्ष प्रकल्पांमध्ये रूपांतर करण्यासाठी महापालिका कटिबद्ध आहे. तसेच पुढील सहा महिने ते एक वर्षाच्या कालावधीत या संकल्पनांचा पाठपुरावा करण्यात येणार असून, विद्यार्थ्यांना इंटर्नशिपची संधीही उपलब्ध करून देण्यात येईल.

कुलगुरू प्रा. जोशी म्हणाले, विद्यापीठ म्हणून आम्ही विद्यार्थ्यांना समस्या-निवारक म्हणून घडवण्यासाठी कटिबद्ध आहोत. 'हॅकाथॉन' हा आजच्या जेन-झी'ला (Gen Z) समस्या सोडवण्याच्या प्रक्रियेत सहभागी करून घेण्याचा एक अत्यंत प्रभावी मार्ग आहे.



#### हॅकाथॉनची ठळक वैशिष्ट्ये

- देशातील १० राज्यांतील २७००+ विद्यार्थ्यांचा सहभाग
- एकूण ५४६ संघांची नोंदणी; ७५ संघांची निवड
- अंतिम फेरीत २५ उत्कृष्ट संघांचा प्रवेश
- नागरी समस्या : वाहतूक, पाणीपुरवठा, स्वच्छता, आरोग्य, पार्किंग .
- तज्ज्ञ मार्गदर्शन व MTLB कार्यशाळेमुळे कौशल्यवृद्धी
- आंतरशाखीय सहभागामुळे नाविन्यपूर्ण उपायांची निर्मिती

#### टीम अॅक्काबाइट प्रथम तर द्वितीय टीम सुपरनोवा

- प्रथम : 'टीम अॅक्काबाइट' (आर.व्ही. कॉलेज, बंगळुरू) - २ लाख रुपये.
- द्वितीय : 'टीम सुपरनोवा' (एसआयईएस, नवी मुंबई) - १ लाख रुपये.
- उत्तेजनार्थ (प्रत्येकी ५० हजार रुपये) :
- टीम आयओटीयन्स (फ्रां.सी. रोड्रिग्स आयटी)
- टीम किलोबाईट (एनआयआयटी, राजस्थान)
- टीम हायड्रो-ऑप्स (केएलई युनिव्हर्सिटी, हुबळी)
- स्पेशल ज्यूरी अवॉर्ड : टीम गॉड-डॅम (केएलई युनिव्हर्सिटी, हुबळी) - २५ हजार रुपये.



## डॉ. असदुल्लाह खान इंग्लिश हायस्कूलला आदर्श शाळा पुरस्कार प्रदान

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि.१६ एप्रिल-**

एकनाथ स्वाभिमानी शिक्षक सेना, महाराष्ट्र राज्यच्यावतीने डॉ. असदुल्लाह खान इंग्लिश हायस्कूल अँड ज्युनिअर कॉलेज या संस्थेची आदर्श शाळा म्हणून पुरस्कार प्रदान करण्यात आला. हा पुरस्कार शाळेच्या सर्वांगीण प्रगतीसाठी, गुणवत्तापूर्ण शिक्षणासाठी तसेच विद्यार्थ्यांच्या सर्वांगीण विकासासाठी केलेल्या उल्लेखनीय केल्यामुळे हा शाळेची निवड करण्यात आली.

प्राचार्य मोहम्मद साकिब सय्यद यांनी हा पुरस्कार स्वीकारला. यावेळी शिक्षक अब्दुल रहमान शेख उपस्थित होते. यावेळी प्रमुख पाहुणे म्हणून कल्याण डोंबिवली खासदार श्रीकांत शिंदे, सोलापूर जिल्हा लोकसभा संपर्क प्रमुख तथा हातकणंगले लोकसभा म तदारसंघाचे विद्यमान खासदार धैर्यशील माने, सांगलीचे माजी खासदार चंद्रहार पाटील, नूतन राज्यसभा खासदार ज्योतीताई वाघमारे, शिवसेना वैद्यकीय मदत कक्षाचे कक्ष प्रमुख मंगेश चिवटे, एकनाथ स्वाभिमानी शिक्षक संघटनेचे राज्य अध्यक्ष बापूसाहेब अडसूळ, एकनाथ स्वाभिमानी शिक्षक संघटनेचे राज्य प्रवक्ता तथा शिवसेना अल्पसंख्यांक जिल्हाध्यक्ष व माजी सीनेट सदस्य एजाज शेख, खरात सर, वैभव शेटे, दाजी चौघुले, जूबेर सर इत्यादी मान्यवर उपस्थित होते.

हे पुरस्कार मिळाल्याबद्दल संस्थेचे संस्थापक अध्यक्ष डॉ. असदुल्लाह खान तसेच विश्वस्त सादुल्लाह खान आणि इबादुल्लाह खान यांनी प्राचार्य व सर्व शिक्षक-शिक्षकेत्तर कर्मचाऱ्यांचे अभिनंदन केले.

# नवदाम्पत्याने बालकाश्रमातील दोन मुलांचे घेतले शैक्षणिक पालकत्व

**तभा वृत्तसेवा**
**सोलापूर, दि. १६ एप्रिल-**

आजच्या काळात विवाह सोहळा म्हटलं की डोळ्यासमोर येतात ते लाखो रुपयांचे खर्च, डीजेचा आवाज आणि भव्य सजावट. मात्र, या सर्व दिखाव्याला फाटा देत सोलापूर जिल्ह्यातील एका नवदाम्पत्याने डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या जयंतीचे औचित्य साधून समाजासमोर एक नवा आणि आदर्श वस्तुपाठ ठेवला आहे. शुभम मिसाळ आणि धनश्री सुर्वे या दांपत्याने आपला विवाह सोहळा बालकाश्रम व वृद्धाश्रमात साजरा करत सामाजिक संवेदनेचा परिचय करून दिला आहे.

शुभम आणि धनश्री या दोघांचेही शिक्षण 'सामाजिक कार्य' या अभ्यासक्रमात झाले आहे. आपल्या शिक्षणाचा आणि विचारांचा वारसा त्यांनी केवळ पुस्तकी न ठेवता प्रत्यक्ष आयुष्यात उतरवला. मोरवंची येथील प्रार्थना फौंडेशन संचलित बालकाश्रम आणि वृद्धाश्रमात हा विवाह सोहळा पार पडला. वंचितांच्या सहवासात लग्नगाठ बांधून त्यांनी विवाह हा केवळ दोन व्यक्तींचा नव्हे, तर समाजाशी नातं जोडणारा संस्कार आहे हा संदेश दिला.

दोन मुलांचे शैक्षणिक पालकत्व: लग्नात भेट म्हणून मिळालेली सर्व रक्कम त्यांनी बालकाश्रमातील एका मुलाच्या आणि एका मुलीच्या शिक्षणासाठी अर्पण केली. या दोन्ही मुलांचे शैक्षणिक पालकत्व घेण्याचा संकल्प या दांपत्याने केला आहे.

लग्नाचे औचित्य साधून वृक्षारोपण करण्यात आले. एक झाड म्हणजे एक जीवन हा संदेश देत त्यांनी पर्यावरण संवर्धनाची गरज अधोरेखित केली. वृद्धाश्रमातील निराधार आजी-आजोबांसोबत वेळ घालवून त्यांना आपुलकीची



भेट दिली, तर बालकाश्रमातील चिमुकल्यांसोबत लग्नाचा आनंद वाटून घेतला.

या आगळ्यावेगळ्या विवाह सोहळ्याला प्रसाद मोहिते, अनु मोहिते यांची प्रमुख उपस्थिती होती. तसेच लोकव्याख्यानकार प्रा. विशाल गरड यांनी विशेष उपस्थिती लावून या उपक्रमाचे कौतुक केले.

**सोलापूर डिस्ट्रीक्ट लेबर सोसायटीज को-ऑप फेडरेशन लि., सोलापूर**

पत्ता :- श्रममंदिर ११३/अ, सिध्देश्वर पेठ, सोलापूर

**जाहिर निविदा**

आमच्या संस्थेच्या वतीने सभासदांना भेट वस्तु स्वरुपात
१) 20' ट्रॉली बॅग २) लॅपटॉप बॅग ३) १ टेबल २ खुर्ची देणेचे आहे तरी इच्छुक दुकानदारांनी सिलबंद निविदा दि. २५/०४/२०२६ पर्यंत वरील पत्त्यावर आणुन द्यावे.

**फेडरेशन ऑफिस वर ५ टन सोलार बसविणे आहे**
तरी इच्छुक दुकानदारांनी सिलबंद निविदा दि. २५/०४/२०२६ पर्यंत वरील पत्त्यावर आणुन द्यावे.

१) सदरचे वस्तु जी.एस.टी. बिलसह देणे आहे. २) सदर वस्तुवर संस्थेचे नांवासह देणे आहे.
३) सदरचे वस्तु संस्थेच्या ठिकाणी आणी तालुक्याच्या ठिकाणी पोहोच करणे.
४) निविदा स्विकारणे अथवा नाकारण्याचे सर्व अधिकार संस्थेकडे राखुन ठेवले आहे.

**चेअरमन** – सोलापूर डिस्ट्रीक्ट लेबर सोसायटीज को-ऑप फेडरेशन लि., सोलापूर

**अहिल्यानगर महानगरपालिका,अहिल्यानगर**

ई निविदा सूचना क्र.: 01 / सन २०२६-२७
निविदा आयडी क्र.:ANMC_2026_ANMC_1295158_1

अहिल्यानगर महानगरपालिका बुरुडगाव कचरा डेपो येथे Design, supply, installation and commissioning of green waste 10 TPD processing unit to Biomass briquettes ( Briquetting Plant-90 mm) खाजगी संस्थेची नियुक्ती करणे कामी ही निविदा मागविण्यात येत आहेत. याबाबत सविस्तर निविदा सूचना, पात्रतेच्या अटी व शर्ती महाराष्ट्र शासनाच्या https://mahatenders.gov.in या अधिकृत संकेतस्थळावर उपलब्ध आहेत. याची संबंधितांनी नोंद घ्यावी.

उपायुक्त
अहिल्यानगर महानगरपालिका

### सावधानतेची जाहीर नोटीस

तमाम लोकास कळविण्यात येते की, डि व सब डि सोलापूर पैकी तालुका उत्तर सोलापूर पैकी शहर सोलापूर महानगरपालिका नवीन हद्दवाढ भागातील मौजे सोरेगाव येथील गट क्र. २१२/२ मधील गोल्डन सिटी फेज-२ पैकी एन. ए. प्लॉट क्र. १४ यासी. ''एकूण क्षेत्र ९९.०६ चौ. मी. अथवा १०६६ चौ. फुट हक्क व वहिवाटीसह चतुःसिमा येणे प्रमाणे- पूर्वेस:- गट क्र. २१२/२ पैकी प्लॉट क्र. ६२ रस्ता, दक्षिणेस:- प्लॉट क्र. १३, पश्चिमेस:- प्लॉट क्र. ९ मी. रस्ता, उत्तरेस:- ९ मी रस्ता.

सदर मिळकत ही श्री. रोहत गोरख देशमुख यांचे मालकीचे असून त्यांनी विक्रीस काढले असता आमचे अशिलांनी खरेदी घेण्याचे ठरवून व त्याप्रमाणे आमचे अशील व श्री. रोहत गोरख देशमुख यांचे दरम्यान बोलणी झालेली असून, आमचे अशिलांनी सदर जागेच्या खरेदीखतापोटी ठरलेल्या रक्कमे पैकी रक्कम रु. १,००,०००/- (एक लाख) विद्यमान मालकांना दिलेला आहे, त्याप्रमाणे आमचे अशील लवकरच खरेदीचा व्यवहार पूर्ण करणार आहेत.

तरी, सदर मिळातीवर कोणाचीही टाच, जप्ती, दान, गहाण, बोजा, बक्षीस पत्र, मृत्यू पत्र, विकसन करारपत्र, भाडेकरार, लिव्ह अँड लायसेन्स, इसारापावती, साठेखत, कब्जा पावती, खरेदीखत, कुलमुखत्यार पत्र, कोर्ट हुकूमनामा, वारसा हक्क अगर कोणत्याही प्रकारचा हक्क हितसंबंध असल्यास ही नोटीस प्रसिद्ध झालेपासून ०२ (दोन) दिवसात आमचे अशिलास खालील पत्त्यावर लेखी कागदपत्रासह कळवावे. मुदतीत कोणाची ही हरकत न आल्यास सदर मिळकत निर्वेध व निजोखमी आहे असे समजून आमचे अशील खरेदी व्यवहार पूर्ण करतील मग तदनंतर कोणाचीही कसलीही हरकत असल्यास ती आमचे आशीलावर व सदर मिळकतीवर मुळीच बंधनकारक राहणार नाही.

ही सावधानतेची जाहीर नोटीस दिली ता. १६/०४/२०२६

सही /-
**श्री. प्रशांत शहाजी सुतार,**
**अॅड. प्रतिक वसंत गुंगे**
अॅडव्होकेट
कार्यालय पत्ता- चेंबर नं. ३३ जिल्हा न्यायालय,
आवार सोलापूर ४१३००१
मो. नं.- ९५६१२००६६८/९४२१०१०६६८
अशिला तर्फे अॅडव्होकेट

### बँक ऑफ़ बड़ौदा Bank of Baroda

नवी पेठ, शाखा
पहिला मजला, डांगेकर कॉम्प्लेक्स, नवी पेठ, सोलापूर - ४१३००१

**मागणी नोटीस U/S 13(2)**
सिक्युरिटायझेशन अॅण्ड रिकन्स्ट्रक्शन ऑफ फायनान्शिअल अॅसेटस् अॅण्ड एन्फोर्समेंट ऑफ सिक्युरिटी इंटरेस्ट अॅक्ट २००२ चे कलम १३(२) अनुसार नोटीस

१. कर्जदाराचे, जामिनदार व कायदेशीर वारसदार यांचे नाव व पत्ता

| अ. क्र. | शाखा / कर्जदार / जामिनदार / गहाणदारांची नावे आणि पत्ते | मागणी नोटीसीची तारीख / अनुत्पादक मालमत्तेची तारीख | मंजूर कर्ज रक्कम | खाते क्रमांक / खात्याचा प्रकार / व्याज दर | येणे रक्कम | स्थावर / जंगम मालमत्तेचा तपशील |
|---|---|---|---|---|---|---|
| १. | (कर्जदार) श्री. रमीजराजा सिकंदर शेख एस.आर.पी. कॅम्प, जी–१० बीएल क्रमांक ४, पूर्णसोरेगाव कॅम्प, विजापूर रोड, ४१३००८, सोलापूर उत्तर सोलापूर, महाराष्ट्र, भारत ४१३००८ | १८/०२/२०२६ / ०८/०२/२०२६ | रु. ३०,००,०००/- | ९८६२०६०००३६१५ / मुदत कर्ज-गृहनिर्माण कर्ज / ९.१०% | रु. १८,६६,५५९/- इतर + व्याज + शुल्क (रुपये अठरा लाख सासष्ठ हजार पाचशे एकोणपन्नास फक्त) मुदत कर्ज-गृहकर्ज | मालमत्तेचे गहाणखत समता गृहकर्ज, निवासी फ्लॅटचे, बेअरिंग सर्वे नंबर, नवीन एस क्रमांक ११३/१बी, प्लॉट क्रमांक ०३/फ्लॅट क्रमांक २०५ येथे स्थित दरवाजा क्रमांक/घर जवळचा दरवाजा प्रशासन जमीन चौ.मीटर, बिल्ड अप क्षेत्र ६६.४२, कार्पेट क्षेत्र ५१.१४ दुसरा मजला आणि गोल्डन टॉवर येथे स्थित कव्हर कार पार्किंगसह इमारतीत उपलब्ध असलेल्या सर्व सुविधा आणि सुविधा जुने एस. क्रमांक ३३०/१बी, प्लॉट क्रमांक ०३, सैफुल जवळ, मजरेवाडी, ता. उत्तर सोलापूर, जिल्हा सोलापूर ४१३००४ शहर सोलापूर उत्तर, जिल्हा सोलापूर, राज्य/प्रदेश महाराष्ट्र देश भारत रमीजराजा सिकंदर शेख यांच्या मालकीचे. चतु:सिमा पुढील प्रमाणे: पुर्वेस - लॉबी / कॉमन पॅसेज; पश्चिमेस - आकाशात उघडा; उत्तरेस - फ्लॅट क्रमांक २०६; दक्षिणेस - आकाशासाठी उघडा |

२) मुख्य कर्जदार (कर्जदार) याने / हिने / त्याच्या / त्यांच्या देणे रक्कमेची फरतफेड करण्यास कसूर केले असल्याने आम्ही यांचे / हिचे / त्याचे / त्यांचे खाते रिझर्व्ह बँक ऑफ इंडिया यांनी जारी केलेल्या मार्गदर्शक सुचनांनुसार निश्चित केले आहे. ३) आपणांस ही सूचना सिक्युरिटायझेशन अॅण्ड रिकन्स्ट्रक्शन ऑफ फायनान्शिअल अॅसेटस् अॅण्ड एन्फोर्समेंट ऑफ सिक्युरिटी इंटरेस्ट अॅक्ट २००२ नुसार जारी करण्यात आली आहे, कारण रजिस्टर्ड पोस्टाने आपणांस पाठविण्यात आलेली नोटीस पोहोच न होता परत आली, यानुसार आपणांस पुढीलप्रमाणे रक्कमेची व्याजासह भरणा करण्यास बजावण्यात येत आहे. ४) आपणांस देण्यात आलेली कर्जसुविधेची रक्कम वरीलप्रमाणे मालमत्ता / सिक्युरिटीजद्वारे सुरक्षित करण्यात आली आहे ५) आता या जाहीर सूचनेद्वारे आम्ही आपणांस या सूचनेच्या तारखेपासून ६० दिवसांच्या आत येणे रक्कम, व्याज, भविष्यातील व्याज आणि प्रासंगिक खर्च आणि किंमत यांसह परत करण्याचा सल्ला देत आहोत. अन्यथा बँक सरफेसी अॅक्ट २००२ अनुसार कारवाई करतील. खाली सही करणार यांच्याकडे सदर मालमत्तांचा ताबा घेणे. त्यानंतर सदर मालमत्तांची विक्री करण्याचे अधिकार आहेत आणि ते सरफेसी अॅक्ट सेक्शन १३ अनुसार बँकेचे अधिकृत अधिकार आहेत.

दिनांक - १८-०२-२०२६, स्थळ - नवी पेठ, सोलापूर (मजकूरात संधिग्ता असल्यास इंग्रजी मजकूर ग्राह्य धरा)
सही/– अधिकृत अधिकारी
बँक ऑफ बडौदा

### बँक ऑफ़ बड़ौदा Bank of Baroda

नवी पेठ, शाखा
पहिला मजला, डांगेकर कॉम्प्लेक्स, नवी पेठ, सोलापूर - ४१३००१

**मागणी नोटीस U/S 13(2)**
सिक्युरिटायझेशन अॅण्ड रिकन्स्ट्रक्शन ऑफ फायनान्शिअल अॅसेटस् अॅण्ड एन्फोर्समेंट ऑफ सिक्युरिटी इंटरेस्ट अॅक्ट २००२ चे कलम १३(२) अनुसार नोटीस

१. कर्जदाराचे, जामिनदार व कायदेशीर वारसदार यांचे नाव व पत्ता

| अ. क्र. | शाखा / कर्जदार / जामिनदार / गहाणदारांची नावे आणि पत्ते | मागणी नोटीसीची तारीख / अनुत्पादक मालमत्तेची तारीख | मंजूर कर्ज रक्कम | खाते क्रमांक / खात्याचा प्रकार / व्याज दर | येणे रक्कम | स्थावर / जंगम मालमत्तेचा तपशील |
|---|---|---|---|---|---|---|
| १. | (कर्जदार) श्री. गायकवाड अमर मोहनराव, प्लॉट नं. २३१, समर्थ सोसायटी, सोरेगाव विजापूर रोड, सोलापूर, उत्तर सोलापूर – ४१३००४ | १८/०२/२०२६ / ०८/०२/२०२६ | रु. २०,६१,०००/- | व्याज दर ९८६२०६०००३७८९ / मुदत कर्ज-गृहनिर्माण कर्ज / ८.६०% | रु. १२,००,७०३/- इतर + व्याज + शुल्क (रुपये बारा लाख सातशे तीन रुपये फक्त) | मालमत्तेचे गहाणखत–समन्यायी गहाणखत, फ्लॅटचे निवासी, सर्वेक्षण क्रमांक जुना एस क्र. ३३०/१ब, नवीन एस.क्र. ११३/१ब, प्लॉट क्रमांक ०३/ फ्लॅट क्रमांक ३०३ येथे स्थित दरवाजा क्रमांक / घर तिसरा मजला, प्रशासकीय जमीन चौरस मीटर, बिल्ड अप एरिया ४०.२९, कार्पेट एरिया ३४.५१, जुना एस. क्र. ३३०/१ब, न्यूज क्रमांक ११३/१ब, गोल्डन टॉवर, प्लॉट क्रमांक ३, सैफुल जवळ, मजरेवाडी, ता.उत्तर सोलापूर, जिल्हासोलापूर, नगरपालिका, शहर सोलापूर उत्तर, जिल्हा सोलापूर, राज्य/प्रदेश महाराष्ट्र देश भारत पिन कोड ४१३००४ श्री. अमर मोहनराव गायकवाड यांचे मालकीचे. चतु:सिमा पुढील प्रमाणे: पुर्वेस - फ्लॅट क्रमांक ३०२; पश्चिमेस - फ्लॅठ क्रमांक ३०४; उत्तरेस - लॉबी / सामान्य रस्ता; दक्षिणेस - आकाशासाठी खुले |
| २. | (कर्जदार) श्री. गायकवाड अमर मोहनराव, प्लॉट नं. २३१, समर्थ सोसायटी, सोरेगाव विजापूर रोड, सोलापूर, उत्तर सोलापूर – ४१३००४ | १८/०२/२०२६ / ०८/०२/२०२६ | रु. २१,८०,०००/- | ९८६२०६००००३७९० / मुदत कर्ज-गृहनिर्माण कर्ज / ८.९०% | रु. १४,६४,५५७/- इतर + व्याज + शुल्क (रुपये चौदा लाख चौसष्ट हजार पाचशे सत्तावन रुपये फक्त) | मालमत्तेचे गहाणख–समतुल्य गहाणखत, फ्लॅट निवासी, सर्वेक्षण क्रमांक जुना एस.क्रमांक ३३०/१बी न्यूज क्रमांक ११३/१बी, प्लॉट क्रमांक ०३,/फ्लॅट क्रमांक ३०२, दरवाजा क्रमांक/घर, जवळचा दरवाजा, प्रशासकीय जमीन चौरस मीटर, बिल्ड अप क्षेत्र ४४.७७, कार्पेट क्षेत्र ३४.५१, जे तिसऱ्या मजल्यावर आहे आणि जमिनीतील अविभाजित हिस्सा तसेच समान्य सुविधा वापरण्याचा अधिकार, कव्हर्ड कार पार्किंग आणि दारुगोळा आहे, प्लॉट क्रमांक ३ मधील इमारतीतील एकूण १४८८.१६ चौरस मीटर जुना एस क्रमांक ३३०/१बी, जो सोलापूर महानगरपालिका सोलापूरच्या हद्दीत ता.गाव मजरेवाडी उत्तर सोलापूर येथे स्थित आहे, पिन- ४१३००४. सैफुल माजरेवाडी जवळ, शहर सोलापूर दक्षिण, जिल्हा सोलापूर, राज्य/प्रदेश महाराष्ट्र देश भारत, पिन कोड ४१३००४ गायकवाड अमर मोहनराव यांच्या मालकीचा. चतु:सिमा पुढील प्रमाणे: पुर्वेस - फ्लॅट क्रमांक ३०१; पश्चिमेस - फ्लॅठ क्रमांक ३०३; उत्तरेस - लॉबी / सामान्य रस्ता; दक्षिणेस - आकाशासाठी खुले |

२) मुख्य कर्जदार (कर्जदार) याने / हिने / त्याच्या / त्यांच्या देणे रक्कमेची फरतफेड करण्यास कसूर केले असल्याने आम्ही यांचे / हिचे / त्याचे / त्यांचे खाते रिझर्व्ह बँक ऑफ इंडिया यांनी जारी केलेल्या मार्गदर्शक सुचनांनुसार निश्चित केले आहे. ३) आपणांस ही सूचना सिक्युरिटायझेशन अॅण्ड रिकन्स्ट्रक्शन ऑफ फायनान्शिअल अॅसेटस् अॅण्ड एन्फोर्समेंट ऑफ सिक्युरिटी इंटरेस्ट अॅक्ट २००२ नुसार जारी करण्यात आली आहे, कारण रजिस्टर्ड पोस्टाने आपणांस पाठविण्यात आलेली नोटीस पोहोच न होता परत आली, यानुसार आपणांस पुढीलप्रमाणे रक्कमेची व्याजासह भरणा करण्यास बजावण्यात येत आहे. ४) आपणांस देण्यात आलेली कर्जसुविधेची रक्कम वरीलप्रमाणे मालमत्ता / सिक्युरिटीजद्वारे सुरक्षित करण्यात आली आहे ५) आता या जाहीर सूचनेद्वारे आम्ही आपणांस या सूचनेच्या तारखेपासून ६० दिवसांच्या आत येणे रक्कम, व्याज, भविष्यातील व्याज आणि प्रासंगिक खर्च आणि किंमत यांसह परत करण्याचा सल्ला देत आहोत. अन्यथा बँक सरफेसी अॅक्ट २००२ अनुसार कारवाई करतील. खाली सही करणार यांच्याकडे सदर मालमत्तांचा ताबा घेणे. त्यानंतर सदर मालमत्तांची विक्री करण्याचे अधिकार आहेत आणि ते सरफेसी अॅक्ट सेक्शन १३ अनुसार बँकेचे अधिकृत अधिकार आहेत.

दिनांक - १८-०२-२०२६, स्थळ - नवी पेठ, सोलापूर (मजकूरात संधिग्ता असल्यास इंग्रजी मजकूर ग्राह्य धरा)
सही/– अधिकृत अधिकारी
बँक ऑफ बडौदा

## डॉ.जयवंत महाराज यांची पसायदानावर तीनदिवसीय प्रवचनमाला

**करकंब, दि. १६ एप्रिल-**



श्री.सद्गुरु भजलिंग महाराज ट्रस्ट करकंब यांच्यावतीने अक्षयतृतीया आणि चंदन उटीचे औचित्य साधून १७ ते १९ एप्रिल दरम्यान सद्गुरु भजलिंग महाराज मठाम ध्ये संध्याकाळी ६ ते ८ या वेळेत ह.भ.प.डॉ. जयवंत महाराज बोधले यांचे संतश्रेष्ठ ज्ञानेश्वर महाराज यांनी लिहिलेल्या पसायदान या विषयावर तीनदिवसीय प्रवचनमाला आयोजित केल्याचे अध्यक्ष बाळासाहेब वास्ते यांनी सांगितले. ३ दिवस चालणाऱ्या प्रवचनमालेसही भाविक भक्तांनी उपस्थित उपस्थित राहून भरभरून प्रतिसाद देत अध्यात्मिक विचारांच्या मेजवानीचा सर्व करकंबकर आणि पंचक्रोशीतील भाविक भक्तांनी लाभ घ्यावा, असे आवाहन आयोजकांनी केले आहे. प्रवचनमाला यशस्वी करण्यासाठी सद्गुरू भजलिंग महाराज ट्रस्ट, विद्या वास्ते, संजय दुधाणे, श्रीनिवास देशपांडे, ज्ञानेश्वर दुधाणे शिष्य परिवार परिश्रम घेत आहेत.

### खरेदीपूर्व जाहीर नोटीस

तमाम लोकांस विशेषतः मौजे बार्शी व आसपासचे परिसरातील तसेच बार्शी तालुक्यातील लोकांना या जाहीर नोटीसीद्वारे कळविण्यात येते की,

डि सोलापूर सब डि व ता. बार्शी पैकी बार्शी शहर हद्दीतील जमीन गट नंबर ८७१ याचा चालू गट नंबर ८७१/२ याचे एकूण क्षेत्र २ हे ३८.०२आर आकार ०५ रू पैसे या पैकी माझे कोर्ट वाटपाने उडतवाटणी प्रमाणे आलेली जमीन तिचे क्षेत्र ०० हे ४४.४५ आर आकार ०० रू ७६ पैसे या पैकी तुम्हास विक्री केलेले क्षेत्र पुढील प्रमाणे -

अ) वर नमूद जमीनी पैकी दक्षिण बाजूची मधील तिचे क्षेत्रफळ ०० हे ०० हे १८.८२४३ आर (याचे चौ.मी. १८८२.४३) अशी जमीन यासी चतुः सिमा पुर्वे मैनाबाई राऊत यांचे हे १९.२६६३ आर जमीन, दक्षिणेस वायकुळे यांची जमीन, पश्चिमेस सदर नंबर पैकी नियोजीत डी. पी. रोडने बाधीत होण्याची शक्यता असणारा १०० फुट रुंदीचा दक्षिणोत्तर चालीचा १५५८ चौ मी चा समाईक मालकीचा रस्ता, उत्तरेस सदर गटा पैकी बिनशेती झालेला लेआऊट.

ब) वर नमूद जमीनी पैकी पुर्वे दक्षिण कोपऱ्यातील जमीन तिचे क्षेत्र ६३७ चौ. मी. अशी जमीन यासी चतुः सिमा पुर्वेस सदर नंबर पैकी नियोजीत डी.पी. रोडने बाधीत होण्याची शक्यता असणारा १०० फुट रुंदीचा दक्षिणोत्तर चालीचा १५५८ चौ.मी. समाईक मालकीचा रस्ता, दक्षिणेस - सदर गटा पैकी तुमचे मालकीची जमीन, पश्चिमेस नियोजीत १२.०० मीटर रुंदीचा रस्ता, उत्तरेस सदर गटा पैकी तुमचे मालकीची जमीन येणेप्रमाणे चतुः सिमा पुर्वक जमीन आतिल दगड, माती वगैरे तदंगभूत वस्तुसह वहिवाटीच्या हक्कांसह. व येणे जाणेच्या या गटातील नियोजीत डी. पी. रोडसाठी समाईकात सोडलेल्या क्षेत्रात वाटप पत्रात सर्व सह हिस्सेदारांचा समाईक हिस्सा आहे. त्या प्रमाणे १५५८ चौ.मी. पैकी माझे येणारे समाईक हिस्साचे मालकी हक्कासह जमीन.

वर नमूद जमीन ही श्रीमती प्रमिला गोवर्धन ठोंबरे, श्री. सुधीर गोवर्धन ठोंबरे, प्रिया गोवर्धन ठोंबरे लग्नानंतरचे नांव सौ. सुप्रिया समिर आयरकर यांचे मालकी व कब्जे वहिवाटीची असून त्यांनी त्यांचे प्रापंचिक, कायदेशीर गरजेपोटी आमचे अशिहास विक्री करण्याचे ठरविलेले आहे व आमचे अशिलांनी सदरची मिळकत खरेदी घेण्याचे ठरविलेले आहे. तसा विक्री संबंधीचा व्यवहारही उभयतांमध्ये ठरलेला असून त्याप्रमाणे आमचे अशिलाकडून त्यांनी इसारा दाखल रक्कम ही स्विकारलेली आहे व सदरची मिळकत हि निर्वेध, निजोखमी, बिनबोजाची, स्वतंत्र मालकी व कब्जे वहिवाटीची असल्याची खात्री, ग्वाही प्लॉट मालकांनी आमचे अशिलास दिलेली आहे.

या उपर हि वर नमूद मिळकत संदर्भाने कोणाचाही कसलाही गहाण, दान, बक्षीस, साठेखत, मृत्युपत्र, खरेदीखत, वारसा, फेडपत्र, पोटगी, टाच, कर्ज-बोजा, जप्ती, करार, नोटरी, खंडपत्र, बटईपत्र, आग्रहक्क, पोटगीबोजा, कोर्ट केसेस अथवा अन्य कोणत्याही स्वरुपाचा हक्क हितसंबंध तसेच वादविवाद असल्यास त्यांनी खालील नमूद पत्त्यावर योग्य त्या कागदोपत्री पुराव्यानिशी ही नोटीस प्रसिद्ध झालेपासून १० (दहा) दिवसांचे आत कागदपत्रासह लेखी स्वरुपात आमचे कार्यालयात येऊन समक्ष भेटून खात्री करून द्यावी. वर नमूद मुदतीत कोणाचीही कसलीही हरकत, तक्रार न आलेस वर नमूद मिळकतही निजोखमी व बिनबोजाची, त्यावर कोणाचाही कोणत्याही प्रकारचा हक्क अथवा हितसंबंध नसल्याचे समजून अथवा त्यांनी तो जाणीव पूर्वक स्वईच्छेने सोडून दिला असे समजून आमचे अशील व प्लॉट मालक आपसात ठरल्याप्रमाणे खरेदीचा व्यवहार पुर्ण करतील त्यानंतर मागाहून कोणाचीही, कसलीही, कोणतीही प्रकारची तक्रार आमचे अशिलावर बंधनकारक राहणार नाही. याची नोंद घ्यावी.

कोणाचीही फसवणुक होवू नये म्हणुन ही खरेदीपुर्वी जाहीर नोटीस दिली असे. ता. १६/०४/२०२६

सही/-
**अॅड. पल्लवी सुधाकर वाघमारे**
जिल्हा व सत्र न्यायालय, बार्शी
मो. ८८३०८२३६५६
अशिलातर्फे अॅडव्होकेट

महाराष्ट्र शासन
सांस्कृतिक कार्य विभाग
**पुरातत्व व वस्तुसंग्रहालये संचालनालय**
फोर्ट जॉर्ज, सेंट जॉर्ज रुग्णालय आवार, छत्रपती शिवाजी महाराज टर्मिनस जवळ, मुंबई – ०१
दुरध्वनी क्र. : ०२२–२२६२३३८०/२२६२३४४६ Email Id : asthapna.doam@gmail.com

**सूचना**

जागतिक बँकेच्या सहाय्याने ''महाराष्ट्र जिल्हास्तरीय विकासास चालना देण्यासाठी संस्थात्मक क्षमता सक्षमीकरण प्रकल्प (MAHASTRIDE)'' हा प्रकल्प राबविण्यास मान्यता देण्यात आली आहे. सदर प्रकल्पांतर्गत, सांस्कृतिक कार्य विभागाच्या अधिपत्याखालील पुरातत्व व वस्तुसंग्रहालय संचालनालयामध्ये प्रकल्प अंमलबजावणी युनिट (PIU) स्थापन करण्यासाठी खालील कंत्राटी व तात्पुरत्या स्वरूपातील पदांसाठी पात्र उमेदवारांकडून अर्ज मागविण्यात येत आहे.

| अ. क्र. | पदाचे नाव | कमाल एकत्रित मानधन (प्रतिमाह) | पद संख्या |
|---|---|---|---|
| १ | प्रकल्प व्यवस्थापक–नि–सनियंत्रण व संस्थात्मक तज्ञ | रु. २,००,०००/– | १ |
| २ | संवर्धन वास्तुशास्त्रज्ञ | रु. १,५०,०००/– | १ |
| ३ | संस्कृती व वारसा तज्ञ | रु. १,५०,०००/– | १ |
| ४ | पर्यटन (सांस्कृतिक) विपणन व प्रोत्साहन तज्ञ | रु. १,५०,०००/– | १ |
| ५ | सार्वजनिक–खाजगी भागीदारी (PPP) तज्ञ | रु. १,५०,०००/– | १ |
| | | एकूण | ५ |

वरील पदांसाठी आवश्यक शैक्षणिक पात्रता, अनुभव निकष आणि सविस्तर अटी व शर्ती या खाली नमूद केलेल्या संकेतस्थळांवर अपलोड करता येणाऱ्या PDF मध्ये उपलब्ध आहेत. वरील पदांसाठी अर्ज Google Forms द्वारे मागविण्यात येत आहे व प्रत्येक पदासाठी स्वतंत्र लिंक उपलब्ध करून देण्यात येत आहे. सदर अर्जाच्या लिंक संबंधित PDF मध्ये उपलब्ध करून दिल्या आहेत.

सदर भरती प्रक्रियेबाबतची सविस्तर माहिती खालील अधिकृत संकेतस्थळांवर उपलब्ध आहे:
**https://maharashtra.gov.in/ • https://www.mahaarchaeology.in/**
अर्ज सादर करण्याची अंतिम तारीख **२६.०४.२०२६** आहे. सदर अंतिम तारखेनंतर प्राप्त झालेले अर्ज कोणत्याही परिस्थितीत निवडीसाठी ग्राह्य धरले जाणार नाहीत. याची सर्व इच्छुक उमेदवारांनी नोंद घ्यावी.

**दिनांक : १५.०४.२०२६**
सही/–
(डॉ. तेजस मदन गर्गे)
संचालक




## महत्त्वाचे

### फ्रेंच ओपनच्या बक्षीस रकमेत वाढ

**पॅरिस** : फ्रेंच ओपन टेनिस स्पर्धा २०२६ मध्ये आपल्या बक्षीस रकमेत ९.५ टक्क्यांनी वाढ करणार असून, एकूण ६१.७ दशलक्ष युरोची रक्कम बक्षीस म्हणून दिली जाईल, असे आयोजकांनी गुरुवारी सांगितले.




रोलँड-गॅरोस स्पर्धेत पुरुष आणि महिला, अशा दोन्ही गटांतील स्पर्धकांसाठी बक्षीस रक्कम समान राखली जाते. ही वाढ होऊनही, फ्रेंच ओपनची एकूण बक्षीस रक्कम अद्यापही अमेरिकन ओपन, विम्बल्डन व ऑस्ट्रेलियन ओपन स्पर्धांच्या तुलनेत मागेच आहे. क्रीडा क्षेत्रात महसुलाचे अधिक न्याय्य वाटप व्हावे, अशी मागणी जोर धरत असताना; आयोजकांनी अलीकडील वर्षांत केवळ विजेत्यांसाठीच नव्हे, तर स्पर्धेच्या सुरुवातीच्या टप्प्यातच बाद होणाऱ्या खेळाडूंसाठीही सर्व फेऱ्यांमधील बक्षीस रक्कम वाढवण्यावर लक्ष केंद्रित केले आहे.

### शुभंकर शर्मा आघाडीवर

**नवी दिल्ली** : बोल्डर हिल्स गोल्फ अँड कंट्री क्लबमध्ये आयोजित बोल्डर्स क्लासिक स्पर्धेत एट-अंडर ६४ च्या उत्कृष्ट फेरीनंतर भारतीय गोल्फपटू शुभंकर शर्मा सात शॉट्सची मोठी आघाडी मिळविली आहे. शर्माने आपल्या या प्रभावी फेरीसह बोल्डर हिल्स गोल्फ अँड कंट्री क्लबमधील कोर्स विक्रमाची बरोबरी केली.



रशीद खान, अंगद चीमा व विशेष शर्मा हे दुसऱ्या स्थानावर संयुक्तपणे आहेत; मात्र ते शर्माच्या तुलनेत खूपच पिछाडीवर आहेत. शुभंकर शर्मा २०१७ नंतरच्या आपल्या पहिल्या डीपी वर्ल्ड पीजीटीआय टूर विजयाचे लक्ष्य बाळगून आहे. अजितेश संधू व सप्तक तलवार याच्यासह इतरही अनेक गोल्फपटू बोल्डर्स क्लासिकमध्ये दमदार कामगिरी करीत स्पर्धेत आपले स्थान भक्कम करण्यासाठी प्रयत्नशील आहेत. दोन वेळा विजेता असलेला २९ वर्षीय शुभंकर याने, आदल्या दिवशीच हनी बैसोयाने प्रस्थापित केलेल्या कोर्स विक्रमाची बरोबरी केली.

### भारत, दक्षिण आफ्रिका महिला टी-२० सामना आज

**डर्बन** : भारत आणि दक्षिण आफ्रिकेच्या टी-२० महिला संघादरमयान शुक्रवारी येथे पहिला टी-२० सामना खेळला जाणार आहे. दक्षिण आफ्रिका आणि भारत यांच्यात होणारी आगामी २० मालिका ही केवळ एक नेहमीची द्विपक्षीय लढत नसून, तिला त्याहून अधिक महत्त्व प्राप्त झाले आहे; कारण ही मालिका २०२६ च्या आयसीसी महिला टी-२० विश्वचषकासाठीची एक अत्यंत महत्त्वाची तयारी म्हणून काम करणार आहे. भारतीय संघ मजबूत लयीत या मालिकेत उतरत आहे. श्रीलंकेवर ५-० असा एकतर्फी विजय आणि त्यानंतर ऑस्ट्रेलियाविरुद्ध २-१ असा ऐतिहासिक मालिका विजय, त्यांचा वाढता आत्मविश्वास आणि संतुलन दर्शवतो. अनुभवी खेळाडू आणि उदयोन्मुख प्रतिभेच्या मिश्रणामुळे, भारतीय संघ योग्य वेळी आपल्या सर्वोत्तम कामगिरीच्या शिखरावर पोहोचत असल्याचे दिसते.हा सामना त्यांच्या मागील मोठ्या लढतीची आठवणही करून देतो, ही लढत २०२५ च्या एकदिवसीय विश्वचषकादरम्यान डी.वाय. पाटील स्टेडियमवर झाली होती. त्या सामन्यात भारतीय महिला संघ विजयी ठरल्या होत्या, त्यामुळे जागतिक स्पर्धांच्या अंतिम फेरीत पोहोचूनही विजेतेपदापासून हुकण्याचा दक्षिण आफ्रिकेची परंपरा पुढे चालूच राहिली होती.

### आर्सेनलविरुद्ध मॅन्चेस्टर सिटीला विजयाची गरज

**मॅन्चेस्टर सिटी** : प्रीमियर लीग फुटबॉल स्पर्धेत शुक्रवारी मॅन्चेस्टर सिटी व आर्सेनल यांच्यादरम्यान एक महत्त्वपूर्ण सामना होणार आहे. मॅन्चेस्टर सिटीला विजेतेपदाच्या शर्यतीत कायम राहण्यासाठी हा सामना जिंकणे आवश्यक आहे. गत महिन्यात याच वेळी, आर्सेनल २२ वर्षांतील आपल्या पहिल्या प्रीमियर लीग विजेतेपदाच्या दिशेने वेगाने वाटचाल करीत असल्याचे दिसत होते, तर दुसरीकडे अडखळत खेळणारी मॅन्चेस्टर सिटी गुण गमावत होती आणि पिछाडीवर पडत होती. आर्सेनलवर विजय मिळवून मँचेस्टर सिटी विजेतेपदाच्या शर्यतीवर नियंत्रण मिळवू शकते. चेल्सी आणि लिव्हरपूलवर एकतर्फी विजय मिळवून सिटी सध्या जबरदस्त फॉर्मात आहे. जर सामन्यांचे निकाल आर्सेनलच्या विरोधात गेले, तर त्यांच्यावर सलग चौथ्यांदा उपविजेतेपद मिळवण्याचा धोका आहे. गत ११ वर्षांपासून सिटी लीगमध्ये घरच्या मैदानावर आर्सेनलकडून पराभूत झालेला नाही.

# मुंबई इंडियन्सची बहारदार फलंदाजी

## क्विंटन डी कॉकचे नाबाद शतक ● नमन धीरचे अर्धशतक ● ६ बाद १९५ धावा

◆ **मुंबई, १६ एप्रिल**

१९ व्या इंडियन प्रीमियर लीगमध्ये गुरुवारी वानखेडे स्टेडियमवर पंजाब किंग्सविरुद्धच्या सामन्यात प्रारंभी दोन हादरे बसल्यानंतर मुंबई इंडियन्सच्या खेळाडूंनी बहारदार फलंदाजी केली. सलामीवीर क्विंटन डी कॉकचे पहिले आयपीएल शतक व नमन धीरने झळकावलेल्या अर्धशतकाच्या बळावर मुंबई इंडियन्सने मर्यादित २० षटकांत ६ बाद १९५ धावा उभारल्या आमि पंजाब किंग्ससमोर विजयासाठी १९६ धावांचे लक्ष्य ठेवले.

पंजाब किंग्सचा कर्णधार श्रेयस अय्यरने नाणेफेक जिंकून यजमान मुंबई इंडियन्स संघाला प्रथम फलंदाजीसाठी पाचारण केले. मुंबई इंडियन्सकडून रेयान रिकेल्टन व क्विंटन डी कॉक ही सलामी जोडी आली. या सलामी जोडीने संघासाठी जेमतेम १२ धावा केल्या असताना सामन्याच्या तिसऱ्या षटकांत अर्शदीप सिंगने लागोपाठ दोन चेंडूवर मुंबई इंडियन्सला जबरदस्त हादरे दिले. अर्शदीपच्या चांगल्या चेंडूवर रेयान रिकेल्टन (२) मैदानात कुठेही जोरदार फटका मारू शकला असता, परंतु त्याला फायदा उठवता आला नाही आणि चेंडू थेट डीप बॅकवर्ड स्क्वेअर लेगला उभ्या असलेल्या शशांक सिंगच्या हातात गेला, त्याने तो झेल अगदी सहजपणे टिपला. याबरोबरच अर्शदीप सिंगचे टी-२० मधील १०० बळी पूर्ण झाले.


क्विंटन डी कॉक नाबाद ११२, चेंडू ६० , चौकार ८, षट्कार ७

अर्शदीपला १०१ वा बळी मिळविण्यासाठी फारसा वेळ लागला नाही. १३६.९ किमी प्रति तास वेगाने टाकलेल्या अर्शदीपच्या पुढच्याच चेंडूवर सूर्यकुमार यादवने (०) ड्राइव्ह मारण्याचा प्रयत्न केला; मात्र त्याचा उडालेला झेल शॉर्ट थर्ड मॅनला उभ्या असलेल्या चहलच्या हाती विसावला. मुंबई इंडियन्सने २.२ षटकांत केवळ १२ धावांत दोन महत्त्वपूर्ण मोहरे गमावले. त्यानंतर डी कॉकने सामन्याची सूत्रे आपल्या हाती घेत नमन धीरच्या साथीने खंबीरपणे फलंदाजी केली व मुंबई संघाला सुस्थितीत आणले. या दरम्यान, डी कॉक वैयक्तिक शतकाकडे आगेकूच करीत असताना नमन धीरने आपले अर्धशतक साजरे केले. मात्र याचवेळी नमन शशांक सिंगच्या फिरकीला बळी पडला. नमन धीरने ३१ चेंडूंत ३ चौकार व ३ षट्कारांच्या मदतीने ५० धावांची अर्धशतकी खेळी केली. या दोघांनी तिसऱ्या गड्यासाठी १२२ धावांची भागीदारी केली आणि मुंबई इंडियन्सला ३ बाद १३४ धावांचा टप्पा गाठून दिला. पुढे डी कॉकने हार्दिक पांड्याच्या साथीने आपले आयपीलमधील पहिले शतक पूर्ण केले. जॅनसेनने हार्दिकला (१४), तर अर्शदीप सिंगने शेर्फन रदरफोर्ड (१) तंबूत परत पाठविले, तोपर्यंत मुंबई इंडियन्सने १८.५ षटकांत ५ बाद १८२ धावांपर्यंत मजल मारली. डी कॉकला साथ देण्यास आलेला तिलक वर्मा (८) धावबाद झाला. डी कॉक व मयंक रावतने नाबाद खेळी करीत मुंबई इंडियन्सला २० षटकांत ६ बाद १९५ धावा रचून दिल्या. क्विंटन डी कॉकने ६० चेंडूंत ८ चौकार व ७ षट्कारांसह नाबाद ११२ धावांची आकर्षक शतकी खेळी केली. पंजाबकडून अर्शदीपने ३ बळी, तर मार्को जॅनसेन व शशांक सिंगने प्रत्येकी एक बळी मिळविला. *(वृत्तसंस्था)*

# कोलकात्यासमोर गुजरातचे खडतर आव्हान

◆ **अहमदाबाद, १६ एप्रिल**

१९ व्या इंडियन प्रीमियर लीग हंगामात शुक्रवारी येथील नरेंद्र मोदी क्रिकेट स्टेडियमवर गुजरात टायटन्स आणि कोलकाता नाईट रायडर्स यांच्यादरम्यान साखळी सामना खेळला जाणार आहे. विजयाविना असलेल्या केकेआरसमोर पुनरुत्थान करणाऱ्या गुजरातचे खडतर आव्हान असेल.

संघ निवडीतील विसंगती व प्रमुख खेळाडूंच्या वाईट फॉर्ममुळे कोलकाता नाईट रायडर्सला त्यांच्या गत पाच आयपीएल सामन्यांमध्ये चार पराभवांना सामोरे जावे लागत आहे.

केकेआरची फलंदाजी व गोलंदाजी दोन्हीमध्ये विसंगती असून, महत्त्वाच्या सामन्यांमध्ये वादग्रस्त निर्णयांचा त्यांच्या कामगिरीवर परिणाम झाला आहे.

शुभमन गिलच्या नेतृत्वाखालील गुजरात टायटन्स संघ स्थिर गोलंदाजी आणि फॉर्ममध्ये आलेल्या प्रमुख फलंदाजांमुळे गती मिळवित आहे. आतापर्यंत चारपैकी तीन सामने जिंकून केकेआर ७ गुणांसह तिसऱ्या स्थानावर आहे.


शुभमन गिल


अजिंक्य रहाणे

केकेआरचा महागडा अष्टपैलू खेळाडू कॅमेरॉन ग्रीन, अजूनही आपल्या किमतीला न्याय देऊ शकलेला नाही, ज्यामुळे संघाच्या अडचणींमध्ये भर पडली आहे.

प्रसिध कृष्णा व रशीद खानचा समावेश असलेला गुजरात टायटन्सचा गोलंदाजीचा मारा एक मोठी ताकद ठरत आहे.

दबावाखाली असलेल्या कोलकाता नाईट रायडर्सला पुन्हा बहरात आलेल्या गुजरात टायटन्सविरुद्ध आपली घसरगुंडी रोखण्याची आशा असेल.

कर्णधार अजिंक्य रहाणे व प्रशिक्षक अभिषेक नायर यांच्या नेतृत्वाखाली, केकेआरला आपल्या रणनीतीत स्पष्टता मिळविण्यासाठी संघर्ष करावा लागत आहे. त्यांना पाच सामन्यांपैकी चार सामन्यांत पराभवाचा सामना करावा लागला असून, ते अजूनही या हंगामातील आपल्या पहिल्या विजयाच्या शोधात आहेत. *(वृत्तसंस्था)*

**आजचा सामना**

**गुजरात टायटन्स वि. कोलकाता नाईट रायडर्स**

**स्थळ** : नरेंद्र मोदी क्रिकेट स्टेडियम, अहमदाबाद

**वेळ** : सायं. ७.३० वाजतापासून

**थेट प्रसारण** : स्टार स्पोर्ट्सवर

# आर. वैशालीचा ऐतिहासिक विजय



◆ **सायप्रस, १६ एप्रिल**

भारताच्या आर. वैशालीने सायप्रसमध्ये फिडे महिला कॅण्डिडेट्स बुद्धिबळ स्पर्धेचे विजेतेपद पटकावून इतिहास घडविला आहे. अंतिम फेरीत वैशालीने कॅटेरिना लागनोवर विजय मिळवून आपले विजेतेपद निश्चित केले. या विजयासह ती प्रतिस्पर्ध्यापेक्षा अर्ध्या गुणाने आघाडीवर राहून गुणतालिकेत अव्वल स्थानी राहिली, तसेच तिला आता विद्यमान विश्वविजेती जू वेनजुन हिला आव्हान देण्याचा अधिकार प्राप्त झाला आहे.

महिलांच्या जागतिक बुद्धिबळ अजिंक्यपद स्पर्धेसाठी आव्हान देण्याचा अधिकार मिळवणारी पहिली भारतीय महिला ठरून वैशालीने इतिहास रचला आहे.

**आंध्र प्रदेशचे उपमुख्यमंत्री पवन कल्याण यांच्याकडून कौतुक**

वैशालीच्या या कामगिरीचे आंध्र प्रदेशचे उपमुख्यमंत्री पवन कल्याण यांच्यासह अनेकांनी कौतुक केले आहे. देशाच्या वाढत्या नारी शक्तीचे प्रतीक आहे, अशा शब्दात पवन कल्याण यांनी वैशालीच्या या यशाचे कौतुक केले. *(वृत्तसंस्था)*

# खेळाडूंच्या प्रतिबंधित पदार्थांच्या सेवनाला गुन्हेगारी ठरविणार : मांडविया

◆ **नवी दिल्ली, १६ एप्रिल**

खेळाडूंना प्रतिबंधित कामगिरी-वर्धक पदार्थांची तस्करी व सेवन करणे याला गुन्हेगारी ठरवणाऱ्या कायद्यावर सरकार काम करीत आहे, असे क्रीडा मंत्री मनसुख मांडविया यांनी गुरुवारी सांगितले.

येथे जागतिक उत्तेजक द्रव्य विरोधी संस्थेच्या (वाडा) ग्लोबल अँटी-डोपिंग इंटेलिजन्स अँण्ड इन्व्हेस्टिगेशन्स नेटवर्कच्या अंतिम परिषदेत बोलताना मंत्री म्हणाले की, गत तीन वर्षांपासून उत्तेजक द्रव्य सेवन करणाऱ्या देशांच्या जागतिक यादीत अव्वल स्थानी असलेला भारत, या धोक्याचा आक्रमकपणे सामना करेल. या धोक्यामुळे २०३६ मध्ये ऑलिम्पिकचे यजमानपद भूषविण्याच्या भारताच्या आकांक्षांवर मोठी छाया पडली आहे. आम्ही खेळाडूंच्या सहाय्यक कर्मचाऱ्यांसाठी किंवा प्रतिबंधित पदार्थांची तस्करी आणि सेवन करण्यात सहभागी असलेल्या इतर व्यक्तींसाठी फौजदारी तरतुदी लागू करण्यावर काम करीत आहोत, असे मांडविया म्हणाले.

**प्रशिक्षकांवरही कारवाई केली जाणार**

खेळाडूंना प्रतिबंधित पदार्थांच्या वापरासाठी प्रोत्साहन देताना आढळलेल्या प्रशिक्षकांवरही कारवाई केली जाईल, असेही त्यांनी स्पष्ट केले. सध्या, खेळाडूंना प्रतिबंधित पदार्थांचा पुरवठा रोखण्यासाठी भारतात दंडात्मक तरतुदी नाहीत आणि शिस्तभंगाची कारवाई गुन्ह्याच्या तीव्रतेनुसार आजीवन बंदीपर्यंत मर्यादित आहे. *(वृत्तसंस्था)*

# खलील अहमद आयपीएलमधून बाहेर

## सीएसकेचा ४.८ कोटींचा वेगवान गोलंदाज

◆ **चेन्नई, १६ एप्रिल**

चेन्नई सुपर किंग्सचा (सीएसके) वेगवान गोलंदाज खलील अहमद हा क्वाड्रिसेप्सच्या (मांडीच्या स्नायूंच्या) दुखापतीमुळे आयपीएल मधून बाहेर झाला आहे. आतापर्यंत सीएसकेने खेळलेल्या पाचही सामन्यांचा भाग असलेल्या अहमदला १४ एप्रिल रोजी केकेआरविरुद्ध झालेल्या गत सामन्यादरम्यान उजव्या खुब्याच्या भागात वेदना जाणवू लागल्या होत्या. स्पर्धेच्या सुरुवातीच्या टप्प्यात सीएसकेसाठी सातत्यपूर्ण कामगिरी करणाऱ्या खेळाडूंपैकी तो एक होता.




'ही श्रेणी २ ची दुखापत (स्नायूंची फाटण्याची दुखापत) आहे आणि यातून सावरण्यासाठी पुनवर्सन कार्यक्रमासाठी) किमान १०-१२ आठवडे लागतील, असे सीएसकेच्या एका सूत्राने सांगितले. या डावखुऱ्या वेगवान गोलंदाजाने भारतासाठी ११ एकदिवसीय आणि १८ टी-२० सामने खेळले आहेत. त्याचा भारतासाठीचा शेवटचा सामना जुलै २०२४ मध्ये झाला होता.

तत्पूर्वी, सीएसकेसाठी गोष्टी आता हळूहळू जुळून येत आहेत, असे कर्णधार ऋतुराज गायकवाड म्हणाला होता. पाच वेळा विजेत्या ठरलेल्या या संघाने केकेआरचा ३२ धावांनी पराभव करत आपला सलग दुसरा विजय नोंदवल्यानंतर ऋतुराजने हे विधान केले. *(वृत्तसंस्था)*

# दुखापतीमुळे हैदराबादचा डेव्हिड पेन बाहेर

◆ **नवी दिल्ली, १६ एप्रिल**

सध्या सुरू असलेल्या इंडियन प्रीमियर लीग स्पर्धेदरम्यान सनरायझर्स हैदराबादला एक मोठा धक्का बसला आहे. त्यांचा वेगवान गोलंदाज डेव्हिड पेन घोट्याच्या दुखापतीमुळे उर्वरित आयपीएल हंगामातून बाहेर झाला आहे.



घोट्याला दुखापत झाल्यामुळे डेव्हिड पेन आयपीएल २०२६ मधून बाहेर झाला आहे. तो लवकर बरा व्हावा, अशी आम्ही सदिच्छा व्यक्त करतो, असे फ्रॅन्चायझीने ट्विटरवर पोस्ट करत त्याच्या स्पर्धेबाहेर जाण्याच्या वृत्ताला दुजोरा दिला. मात्र, संघाने अद्याप त्याच्या जागी कोणाची निवड केली जाईल, हे जाहीर केलेले नाही.

पेनने प्रामुख्याने देशांतर्गत क्रिकेट खेळले असून, इंग्लंडसाठी त्याने केवळ एकच एकदिवसीय सामना खेळला आहे. २०२६ च्या लिलावात त्याला कोणत्याही संघाने विकत घेतले नव्हते; परंतु हंगामाच्या सुरुवातीला संघात ऑस्ट्रेलियन वेगवान गोलंदाज जॅक एडवर्ड्सच्या दुखापतीमुळे निर्माण झालेल्या रिक्त जागेवर पर्यायी खेळाडू म्हणून त्याची निवड झाली आणि त्याला या स्पर्धेत खेळण्याची संधी मिळाली. *(वृत्तसंस्था)*

**पॅट कमिन्स तंदुरुस्ती चाचणीत उत्तीर्ण**

दरम्यान, संघाचा नियुक्त कर्णधार पॅट कमिन्स याने तंदुरुस्ती चाचणी यशस्वीरित्या पूर्ण केली असून, तो लवकरच संघात सहभागी होणार आहे. २५ एप्रिल रोजी जयपूर येथे होणाऱ्या हैदराबादविरुद्ध राजस्थान रॉयल्स सामन्यात कमिन्स खेळण्याची दाट शक्यता आहे.

कमिन्सच्या अनुपस्थितीत ईशान किशन संघाचे नेतृत्व करीत आहे. त्याच्या नेतृत्वाखाली, सध्या सुरू असलेल्या हंगामात संघाने खेळलेल्या पाच सामन्यांपैकी दोन सामन्यांत विजय मिळविला आहे. गुणतालिकेत सध्या हा संघ चौथ्या स्थानावर असून, त्यांचा निव्वळ धावगती +०.५७६ इतका आहे.

सोमवारी सनरायझर्स हैदराबादने गुणतालिकेत अव्वल स्थानी असलेल्या राजस्थान रॉयल्सचा पराभव केला. या विजयात पदार्पण करणाऱ्या प्रफुल हिंगे व साकिब हुसेन या गोलंदाजांच्या उत्कृष्ट कामगिरीचा मोलाचा वाटा होता. या दोघांनी प्रत्येकी चार बळी मिळविले. २१७ धावांच्या विशाल लक्ष्याचा पाठलाग करताना राजस्थानचा संघ १९ षटकांत केवळ १५९ धावांत गारद झाला आणि त्यांना ५७ धावांनी पराभव स्वीकारावा लागला. २०१६ चे विजेते आता शनिवारी, हैदराबाद येथील आपल्या घरच्या मैदानावरराजीव गांधी स्टेडियमवर पाच वेळा विजेते ठरलेल्या चेन्नई सुपर किंग्सचा सामना करतील.




# भारत-पाकिस्तान मालिका शक्य नाही : ललित मोदी

**नवी दिल्ली** : पाकिस्तान क्रिकेट मंडळावर (पीसीबी) असलेल्या राजकीय प्रभावामुळे, भारत आणि पाकिस्तान यांच्यात भविष्यात कधीही द्विपक्षीय मालिका खेळली जाण्याची शक्यता नाही, असे मत आयपीएलचे माजी अध्यक्ष ललित मोदी यांनी व्यक्त केले.

जर पीसीबीने राजकीय सूत्रे हलवून या प्रकरणाला राजकीय वळण दिले नसते, तर या दिशेने काही प्रमाणात प्रगती किंवा सकारात्मक हालचाल झाली असती, असेही ते म्हणाले. एखाद्या तटस्थ ठिकाणी सामने खेळवून दोन्ही देशांमधील क्रिकेट संबंध पुन्हा पूर्ववत करता येतील असे मला वाटत नाही. कारण या समस्येचे मूळ कारण म्हणजे पीसीबीवर वाढत असलेला राजकीय प्रभाव आहे. सध्याची परिस्थिती नजीकच्या काळात सुधारण्याची शक्यता कमीच आहे, त्यामुळे नजीकच्या भविष्यात द्विपक्षीय मालिका होण्याची शक्यता प्रभावीपणे संपुष्टात येते व नजीकच्या भविष्यात हे कदाचित शक्य होणार नाही असे मला वाटते, असेही ते म्हणाले.

# वैभव सूर्यवंशीच्या पदार्पणामुळे निवड समितीसमोर उभे आव्हान

◆ **नवी दिल्ली, १६ एप्रिल**

वैभव सूर्यवंशीने इंडियन प्रीमियर लीगमध्ये आपल्या कामगिरीने अक्षरशः धुमाकूळ घातला असताना, भारतीय राष्ट्रीय क्रिकेट संघाचा भाग होण्याच्या दिशेने त्याने आणखी एक पाऊल पुढे टाकल्याचे वृत्त आहे. बीसीसीआयच्या निवड समितीने आगामी आयर्लण्ड दौऱ्यासाठी संभाव्य खेळाडूंच्या यादीत या १५ वर्षीय अष्टपैलू वैभव सूर्यवंशीचा समावेश केला आहे.

वैभव सूर्यवंशीने गत वर्षी, वयाच्या अवघ्या १४ व्या वर्षी आयपीएलमध्ये पदार्पण केले होते; त्यावेळी शार्दुल ठाकूरच्या गोलंदाजीवर, त्याने सामना केलेल्या पहिल्याच चेंडूवर एक जबरदस्त षट्कार ठोकला होता. राजस्थान रॉयल्सने १.१ कोटी रुपयांना आपल्या संघात घेतलेला हा खेळाडू, सध्या सुरू असलेल्या आयपीएल २०२६ हंगामातही आपली छाप पाडत आहे. त्याच्या या कामगिरीमुळेच आता त्याला भारतीय संघात पदार्पणाची संधी दिली जावी, अशी मागणी जोर धरू लागली आहे. ही शक्यता ऐकायला कितीही रोमांचक वाटत असली, तरी वैभवच्या पदार्पणामुळे बीसीसीआयच्या निवड समितीसमोर मात्र संघनिवडीचे एक मोठे आणि गुंतागुंतीचे आव्हान उभे राहू शकते. त्याचे भारतीय संघात पदार्पण ही एक डोकेदुखी ठरू शकते. भारतीय संघाच्या टी-२० क्रिकेट रचनेत सध्या सलामीवीरांसाठी अत्यंत योग्य पर्याय उपलब्ध आहेत. अभिषेक शर्मा, संजू सॅमसन व ईशान किशन यांसारखे स्टार खेळाडू संघासाठी प्रभावी कामगिरी बजावित आहेत. हे तिन्ही भारतीय सलामीवीर टी-२० विश्वचषक २०२६ मध्ये केलेल्या दमदार कामगिरीच्या जोरावर सध्या चर्चेत आहेत आणि त्याचबरोबर चालू असलेल्या आयपीएल हंगामातही ते उत्कृष्ट खेळ करीत आहेत. जरी यशस्वी जयस्वाल मर्यादित षटकांच्या क्रिकेटमध्ये फारसा सक्रिय राहिला नसला, तरीही टी-२० सामन्यांसाठी चौथ्या सलामीवीराचा पर्याय म्हणून तो देखील भारतीय संघाकडे उपलब्ध आहे.

वैभव सूर्यवंशी वरिष्ठ पुरुष टी-२० संघाचा भाग होण्यासाठी 'सज्ज' आहे याची निवड समितीला खात्री आहे, परंतु त्याचा संघात समावेश केल्यास निवडीबाबत एक मोठी पेचप्रसंग निर्माण होऊ शकतो; कारण अभिषेक शर्मा किंवा संजू सॅमसन या दोघांपैकी एकाला वगळण्यासाठी निवड समितीला ठोस कारणे द्यावी लागतील. या दोघांपैकी एकाला वगळले, तर हा प्रश्न उपस्थित होतो की, सूर्यकुमार यादव आपले स्थान कसे टिकवून आहे? असे त्या सूत्राने सांगितले. *(वृत्तसंस्था)*



# इराण फुटबॉल विश्वचषकात खेळणार : इन्फँटिनो

◆ **न्यू यॉर्क, १६ एप्रिल**

भू-राजकीय तणाव असूनही इराण २०२६ च्या फुटबॉल विश्वचषकात सहभागी होईल असा विश्वास फिफा या जागतिक फुटबॉल महासंघाचे अध्यक्ष जियानी इन्फँटिनो यांनी व्यक्त केला. खेळ राजकारणापासून वेगळा ठेवावा असे आवाहनही त्यांनी केले आहे.

सीएनबीसीच्या इन्व्हेस्ट इन अमेरिका फोरममध्ये बोलताना फिफाचे अध्यक्ष जियानी इन्फँटिनो यांनी आगामी फिफा विश्वचषक २०२६ मध्ये इराणच्या सहभागाला ठाम पाठिंबा दिला आहे. सध्याचा भू-राजकीय तणाव आणि सुरक्षेची चिंता असूनही संघ या स्पर्धेत सहभागी होईल, असे म्हणत त्यांनी अमेरिका व इस्रायल यांच्यातील अलीकडील संघर्षानंतर इराणच्या सहभागाबद्दलच्या शंका फेटाळून लावल्या. इराणचा संघ विश्वचषकात नक्कीच येत आहे. तोपर्यंत परिस्थिती शांततापूर्ण असेल. त्यामुळे निश्चितच मदत होईल. पण इराणला यावेच लागेल, असे ते ठामपणे म्हणाले. *(वृत्तसंस्था)*



## महत्वाचे...



### डॉ. आंबेडकर व महात्मा फुले यांच्या जयंतीनिमित्त वाचन दिन साजरा

**बार्शी, दि. १६ एप्रिल-**

श्रीमंत शिवसूर्य बहुद्देशीय प्रतिष्ठान बार्शी, संचलित शिवसेवा वाचन संस्कृती आयोजित महामानव डॉ. बाबासाहेब आंबेडकर, क्रांतीज्योती महात्मा फुले यांच्या जयंतीनिमित्त वाचन दिन श्रीकृष्ण मंदीर उपळाई रोड येथे साजरा करण्यात आला. अध्यक्षस्थानी सई वुमन्स हास्पीटलचे डॉ. कुमार जगताप, प्रमुख पाहुणे ॲड. विवेक गजशिव, सामाजिक कार्यकर्ते सुमित खुरंगळे, पत्रकार चंद्रकांत करडे, गणेश भोळे, उत्तम पोतदार, शिवराज्य सेनेचे हर्षवर्धन पाटील, नगरसेवक आकाश राऊत, रणजीत पाटील, सूर्या मस्के, जाणीव फाउंडेशनचे उपाध्यक्ष वसंत हवालदार, ग्रंथपाल विनोद गायकवाड मान्यवर उपस्थित होते. सुरुवातीला महामानव डॉ.आंबेडकर यांच्या जयंतीनिमित्त महापुरुषांच्या प्रतिमेचे पूजन करण्यात आले. संस्थेचे अध्यक्ष अतुल पाडे यांनी प्रास्ताविक केले. सुरुवातीला संविधान वाचन समीक्षा जमदाडे हिने केले. सर्वच विद्यार्थ्यांना महापुरुषांचे पुस्तके भेट देण्यात आले. यावेळी कार्यक्रमासाठी उपस्थित असलेले शिवराज्य सेनेचे हर्षवर्धन पाटील, ॲड. विवेक गजशिव, डॉ. कुमार जगताप यांनी मनोगत व्यक्त केले. सूत्रसंचालन उदयकुमार पोतदार यांनी केले.


आरुषी उत्सुरगे


यशराज भोसले


पलक छाजेर

### आरुषी उत्सुरगे दहावी परीक्षेत ऑर्किड स्कूलमध्ये प्रथम

**सोलापूर, दि.१६ एप्रिल-**

सीबीएसई माध्यमिक शालांत प्रमाणपत्र परीक्षेत नागेश करजगी ऑर्किड स्कूलमध्ये आरुषी उत्सुरगे ९९.६० टक्के गुण मिळवित प्रथम आली आहे. फेब्रुवारी २०२६ मध्ये झालेल्या या परीक्षेमध्ये ३१ विद्यार्थ्यांनी ९०% हून अधिक गुण मिळविले आहेत, तसेच ७३ विद्यार्थ्यांनी ७५ ते ८०% गुण मिळविले आहेत. एकूण १२७ विद्यार्थ्यांनी प्रथमश्रेणीत उत्तीर्ण झाले. तसेच इंग्रजी, विज्ञान, माहिती तंत्रज्ञान व मराठी विषयात एकूण ३९ विद्यार्थ्यांनी १०० पैकी १०० गुण मिळविले आहेत. संस्थेचे अध्यक्ष डॉ.कुमार दादा करजगी ,सचिवा वर्षाताई विभुते, व्यवस्थापक अक्षय चिडगुंपी, प्राचार्या रुपाली हजारे, मार्गदर्शिका मीना पारखे यांनी अभिनंदन केले. **अन्य यशस्वी विद्यार्थी असे :** आरुषी उत्सुरगे ९९.६०%, यशराज भोसले ९९%, पलक छाजेर ९८.८%, ओंकार मेहता ९८% , वरद बिनगे ९७.८%, इरफान पठाण ९७.६%, पूर्वा कोचर ९७.४%, मानसी मोरे ९७.४ %, अनिशा बंडगुल ९७.२%, दिव्या चव्हाण ९६.४%, प्रथमेश गुंड ९६.२%, अमानअली शेख ९५.४%, आर्या चंडक ९५.४%.

### गुणवत्ता शोध परीक्षेत अकलूज केंद्रातील शिवराज सुरवसे पहिला

**अकलूज दि.१६ -**

सांगली शिक्षण संस्था यांचे मार्फत घेण्यात आलेल्या गुणवत्ता शोध परीक्षामध्ये अकलूज केंद्रातील माळीनगर येथील सासवड माळी एज्युकेशन सोसायटीच्या प्राथमिक शाळा क्रमांक १ मधील इयत्ता तिसरीच्या वर्गातील विद्यार्थी शिवराज महेश सुरवसे हा केंद्रामध्ये २३६ गुण मिळवून पहिल्या क्रमांकाने पास झाला आहे. या परिक्षेत १२५ पैकी ७५ विद्यार्थी उत्तीर्ण झाले. त्याचे दि सासवड माळी एज्युकेशन सोसायटीचे संस्थेचे चेअरमन राजेंद्र गिरमे, सेक्रेटरी अजय गिरमे, शिक्षक श्री बुगड यांचे मार्गदर्शन लाभले. संस्थेकडून शिवराजचा सत्कार करण्यात आला.. शिवराज हा येथील उद्योजक महेश सुरवसे यांचा पुत्र असून यशवंतनगर येथील पत्रकार तुकाराम उबाळे (मास्तर) यांचा तो नातू आहे.



## निधन वृत्त...

### सुरेश मामड्याल



**सोलापूर, दि.१६ एप्रिल-**

जुना विडी घरकुल येथील सुरेश सिद्राम मामड्याल (वय ८१) यांचे आज (गुरुवारी दि.१६ एप्रिल पहाटे निधन झाले आहे. त्यांच्या पश्चात दोन मुले, एक मुलगी, जावई, सुना, नातू नातवंडे असा परिवार आहे.

### सुनीता फंड



**सोलापूर, दि.१६ एप्रिल-**

दमाणीनगर भागातील सोनी सिटी येथील सुनीता अरुण फंड (वय६६) यांच्या निधन झाले .त्यांच्या पश्चात दोन मुले, दोन मुली, नातवंडे असा परिवार आहे. रेल्वे गार्ड अभिजीत फंड यांच्या त्या मातोश्री तर छत्रपती शिवाजी प्रशालेतील लिपिक दीपक डुरे- पाटील यांच्या त्या थोरल्या भगिनी होत.

### डॉ. मिलिंद शाहीर



**सोलापूर, दि. १६ एप्रिल-**

येथील ख्यातनाम डॉ. मिलिंद शाहीर यांचे पुण्याच्या रुबी हॉस्पिटलमध्ये अल्पशा आजाराने निधन झाले. ते ६५ वर्षांचे होते. त्यांच्या निधनानं वैद्यकीय क्षेत्रात हळहळ व्यक्त होत आहे.

### बाळासाहेब जम्मा



**सोलापूर, दि. १६ एप्रिल-**

बाळासाहेब जम्मा (वय ६३) यांचे गुरुवारी अल्पशा आजाराने निधन झाले. त्यांच्यावर लिंगायत स्मशानभूमीत अंत्यसंस्कार करण्यात आले. त्यांच्या पश्चात आई, पत्नी, मुलगा, सून, नातवंडे असा परिवार आहे.

# पंचाचार्य जगद्गुरुंच्या दिव्य सानिध्यात मुक्तेश्वर शिवाचार्य यांचा सुवर्ण-अमृत महोत्सव उत्साहात

**तभा वृत्तसेवा,**
**अकलूज, दि. १६ एप्रिल-**

हिंदू वीरशैव लिंगायत समाजाचे पंचाचार्य जगद्गुरू रंभापुरी पीठाचे वीरसिंहासनाधिश्वर प्रसन्न रेणुक वीरसोमेश्वर शिवाचार्य महास्वामीजी, उज्जैन पीठाचे सद्धर्मसिंहासनाधिश्वर सिद्धलिंग राजदेशीकेंद्र शिवाचार्य महास्वामीजी, श्रीशैल पीठाचे सुर्यसिंहासनाधिश्वर डॉ.चन्नसिद्धराम पंडिताराध्य शिवाचार्य महास्वामीजी, काशी पीठाचे ज्ञानसिंहासनाधिश्वर डॉ. चंद्रशेखर शिवाचार्य महास्वामीजी आणि काशी पीठाचे ज्ञानसिंहासनाधिश्वर डॉ.मल्लिकार्जुन विश्वाराध्य शिवाचार्य महास्वामीजी या पाचही जगद्गुरूंच्या दिव्य सानिध्यात श्री बृहन्मठ वेळापूरचे जेष्ठ मठाधिपती शिवाचार्य शिरोमणी मुक्तेश्वर शिवाचार्य महास्वामीजींचा अमृत महोत्सव आणि सुवर्ण पट्टाभिषेक महोत्सव कार्यक्रम वेळापूरचे नुतन मठाधीपती सदाशिव शिवाचार्य महास्वामीजी यांच्या नेतृत्वामध्ये उत्साहात पार पडला.

पाच दिवस झालेल्या या कार्यक्रमात ध्वजारोहण, गुरुगादीस रुद्राभिषेक, गणेशयाग व महारुद्रयाग स्वाहाकार, दुपारी भजन-किर्तन व संगीत तसेच नवचंडी याग स्वाहाकार कार्यक्रम संपन्न होवून श्रीगुरूंच्या हस्ते दाम्पत्यांना शुभाशिर्वाद देण्यात आले. सायंकाळी शिवाचार्य शिरोमणी मुक्तेश्वर शिवाचार्य महास्वामीजी यांचे नाणेतुला, श्रीफळतुला, पेढातुला, दूधतुला, गहूतुला, साखरतुला, गुळतुला व तांदूळतुला संपन्न होवून श्रीगुरू हस्ते दाम्पत्यांना शुभाशिर्वाद देण्यात आले रक्तदान शिबीर आयोजित करण्यात आले होते त्यामध्ये अनेक सद्धक्तांनी रक्तदान केले.



### धर्मसभेत वृद्धाश्रम निर्माण करण्याचा मानस

रात्री ९.०० वाजता पंचाचार्य जगद्गुरू याचे दिव्यसानिध्यात धर्मसभा सुरू झाली. सदाशिव शिवाचार्य महास्वामीजी वेळापूरकर यांनी श्री बृहन्मठ वेळापूरचा पूर्ण इतिहास व भविष्यातील संकल्प सांगितले. यावेळी भविष्यात मठाच्या माध्यमातून वेद पाठशाळा, गोशाळा, योगशिबीर केंद्र, वृद्धाश्रम व अनाथाश्रमात निर्माण करण्याचा मानस व्यक्त केला. यावेळी महाराष्ट्रातील वीरशैव लिंगायत समाज्यातील बंधु-भगिनी यांचेसह भाविकभक्त हजारोंच्या संख्येने सहभागी झाले होते. या शुभप्रसंगी काशी पीठाचे ज्ञानसिंहासनाधिश्वर डॉ.चंद्रशेखर शिवाचार्य महास्वामीजी यांनी निमार्ण केलेल्या मार्ग हा मुक्तीचा या ग्रंथाचे प्रकाशन उपस्थितांच्या हस्ते करण्यात आले

**प्रमुख मान्यवरांची उपस्थिती**

सदरच्या ऐतिहासिक कार्यक्रमासाठी उपमुख्यमंत्री विजयसिंह मोहिते-पाटील, राजेवाडी श्री सद्गुरू साखर कारखान्याचे चेअरमन एन.शेषगिरीराव, सोलापूर जिल्ह्याचे विधानपरिषद आमदार रणजितसिंह मोहिते-पाटील, शिवरत्न शिक्षण संस्थेच्या अध्यक्षा शितलदेवी धैर्यशील मोहिते-पाटील, बार्शी नगरपरिषदचे उपनगराध्यक्ष तेजस्विनी कथले, पुणे विश्वेश्वर बँकेचे माजी चेअरमन सुनिल शेठ रूकारी, पुणे विश्वेश्वर बँकेचे संचालक अशोक शेठ रूकारी, सोलापूर जि.प.सदस्य रामप्पा चिवडशेट्टी, सोलापूर जि.प.सदस्य शिवानंद पाटील, वेळापूर ग्रामपंचायत सरपंच रजनिश कांबळे, वेळापूर विविध कार्यकारी सोसायटी चेअरमन अमरसिंह माने-देशमुख, धानोर गावचे माजी सरपंच जीवन जानकर, सोलापूर हृदयम हॉस्पिटलचे डॉ.शैलेश पाटील उपस्थित होते.

### २७५ शिष्यांनी शिवदिक्षा व मिरवणूक

रविवारी सकाळी अय्याचार व शिवदिक्षा संस्कार कार्यक्रमात काशी पीठाचे ज्ञानसिंहासनाधिश्वर डॉ.चंद्रशेखर शिवाचार्य महास्वामीजी यांच्या दिव्य सानिध्यात २७५ शिष्यांनी शिवदिक्षा घेतली. सायंकाळी पालखी मैदान - काळा मारूती मंदिर - व्यापारी पेठ - श्री बृहन्मठ वेळापूर या मार्गावरून पंचाचार्य जगद्गुरूंची भव्य-दिव्य अड्डापालखी व शिवाचार्य मिरवणुक सोहळा संपन्न झाला. यावेळी कलश घेवून महिला सहभागी झाल्या होत्या. बार्शी येथील शिवलीलाताई पाटील यांच्या संस्थेचे विद्यार्थिनी यांनी मृदुंग वादन केले. सांगवी येथील रुद्रपशुपती कोळेकर महाराज शिवपाठ महिला मंडळ यांनी भजन व मृदुंग वादन केले. अकलूज येथील महात्मा बसवेश्वर बहूउद्देशिय संस्थेच्यावतीने ढोल-ताशा वादनाचे उत्कृष्ट सादरीकरण करण्यात आले. सोलापूर व कर्नाटक येथील वीरभद्र मंडळी व ढोळ पथक मंडळी यांनी पारंपरिक नृत्य करत आपली कला सादर केली. यावेळी वैराग येथील विद्युत बग्गी व छत्री उपस्थितांचे लक्ष वेधून घेतले.

### आशिर्वचनानंतर धर्मसभेची सांगता

सोहळ्याच्या शेवटच्या दिवशी सोमवारी पंचाचार्य जगद्गुरूंच्या दिव्यसानिध्यात श्री बृहन्मठ वेळापूरचे जेष्ठ मठाधिपती शिवाचार्य शिरोमणी मुक्तेश्वर शिवाचार्य महास्वामीजी यांना हरिद्रलेपन व अभ्यंग स्नान संपन्न होवून सकाळी ११.०० वाजता पंचाचार्य जगद्गुरु तसेच, उपस्थित शिवाचार्य, संत-महंत, शैक्षणिक, सामाजिक, राजकीय आणि विविध क्षेत्रातील मान्यवरांच्या उपस्थितीत धर्मसभा सुरू होवून शिवाचार्य धर्मसंदेश आणि पंचाचार्य जगद्गुरूंचे प्रमुख आशिर्वचन झाल्यानंतर धर्मसभेची सांगता करण्यात आली. सायंकाळी श्री बृहन्मठ वेळापूरचे जेष्ठ मठाधिपती शिवाचार्य शिरोमणी मुक्तेश्वर शिवाचार्य महास्वामीजी यांची वेळापूर गावातून मिरवणुक कार्यक्रम संपन्न झाल्यावर महास्वामीजींची महाआरती संपन्न झाली.

## घरगुती वादातून डोक्यात घातली बियरची बाटली; दोघांवर गुन्हा दाखल

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि.१६ एप्रिल-**




घरगुती वादातून झालेल्या भांडणात डोक्यात बियरची बाटली घालून ब्लेडने वार करून दमदाटी केल्याप्रकरणी दोघाजणांविरुद्ध सदर बाजार पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

गणेश बोधीवाले व गंगाराम बोधीवाले ( रा. बेडरपुल सोलापूर ) अशी गुन्हा दाखल करण्यात आलेल्या आरोपींची नावे असून याबाबत अमरसिंग माणिकसिंग मन्सावाले (राणा प्रतापपट्टी कुमठा नाका, सोलापूर) यांनी फिर्याद दिली आहे .

यातील फिर्यादी हा १४ एप्रिल रोजी सायंकाळी त्याच्या बेडर पूल येथील सासरवाडीत असताना शेजारी राहणाऱ्या वरील आरोपींनी रोडवर गॅस सिलेंडर का टाकला असे विचारलेल्याच्या कारणावरून त्याने 'हमारे घर के झगडे मे तु बोलनेवाला कोन', असे म्हणून शिवीगाळ करून आरोपी गणेश बोधीवाले यांने बिअर बाटली फिर्यादीच्या मेव्हण्याच्या डोक्यात मारून फोडली व आरोपी गंगाराम बोधीवाले यांने ब्लेडने फिर्यादीच्या हातास व पाठीस मारले व मेव्हण्याची पत्नी अनिता हिच्या हातास व पाठीस मारले व लाथाबुक्यांनी मारहाण करून शिवीगाळ व दमदाटी केल्याचे फिर्यादीत म्हटले आहे. पोलीस हवालदार राठोड हे गुन्ह्याचा पुढील तपास करीत आहेत.

## २२ एप्रिलपासून सुरतगाव येथे रंगणार ग्रामीण क्रिकेट स्पर्धेचा थरार

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. १६ एप्रिल-**

तुळजापूर तालुक्यातील सुरतगाव येथे दि.२२ एप्रिल पासून भव्य ग्रामीण क्रिकेटचा थरार रंगणार असुन, यामध्ये विजेत्या उपविजेत्या संघासह इतरही संघावर बक्षीसांचा वर्षाव होणार आहे. यामुळे सुरतगाव येथे होणाऱ्या या क्रिकेट स्पर्धांसाठी जास्तीत जास्त क्रिकेट संघानी सहभाग नोंदवावा, असे आवाहन आयोजक तथा युवा नेते दादासाहेब घोडके यांनी केले आहे.

भारतीय जनता पार्टी स्थापना दिवस व भारतरत्न डॉ बाबासाहेब आंबेडकर यांच्या जयंतीनिमित्त सुरतगाव येथे दि. २२ एप्रिल पासून भव्य अशा ग्रामीण फुल पिच क्रिकेट स्पर्धांचे आयोजन करण्यात आले आहे. या स्पर्धेमध्ये प्रथम क्रमांकाचे पारितोषिक शरण बसवराज पाटील (शरणभैय्या युथ फाऊंडेशन धाराशिव) यांच्या तर्फे ५५,५५५, द्वितीय क्रमांकाचे पारितोषिक ॲड. अरविंद अप्पाराव बेडगे (सभापती नळदुर्ग) यांच्या तर्फे ३३,३३३, तृतीय क्रमांकाचे पारितोषिक राजभाई शहाजी सुरते (ग्रा.पं सदस्य, सुरतगाव) १५,५५५ तर चतुर्थ क्रमांकाचे पारितोषिक श्रीकांत देवकर (यश कंट्रक्शन) यांच्या तर्फे ७,७७७ अशा भव्य बक्षीसांचा वर्षाव होणार आहे. याच बरोबर इतरही बक्षीसांचा वर्षाव क्रिकेट संघावर होणार आहे. गावोगावी अशा स्पर्धांचे आयोजन करुन युवा पीढींचे सशक्तीकरण करावे व युवा पिढींनी मैदानी खेळांचे महत्त्व अंगीकृत करुण तंदुरुस्त जीवन जगावे, असे आवाहन घोडके यांनी केले आहे. आपली नावनोंदणी कलीम शेख - ९६३७४२१४००, लखन गायकवाड - ८३९०३७००३८, महेश मगर -९६२३६६२१७६ यांच्याकडे करावी, असे सुरतगाव क्रिकेटप्रेमी यांच्या वतीने कळवण्यात आले आहे.





## सांगोला महाविद्यालयात डॉ. आंबेडकर जयंती साजरी

**तभा वृत्तसेवा,**
**सांगोला,दि.१६ एप्रिल -**

सांगोला महाविद्यालयात भारतरत्न डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांची जयंती साजरी करण्यात आली. यावेळी प्र.प्राचार्य डॉ.सुरेश भोसले यांच्या हस्ते प्रतिमेस पुष्पहार अर्पण करून प्रतिमा पूजन करण्यात आले. याप्रसंगी माजी प्राध्यापक बी.एस.खडतरे, प्रशासकीय सेवक माणिक लिगाडे, प्रकाश शिंदे, अनिल साखरे, मधुकर कसबे तसेच प्राध्यापक, प्रशासकीय सेवक व विद्यार्थी उपस्थित होते. कार्यक्रमाचे नियोजन प्र.अधिक्षक विलास माने यांचे मार्गदर्शनाखाली प्रा.नरेंद्र पाटील, राहुल ढोले, अमर केदार यांनी केले.

## आंबेडकर-फुले जयंतीनिमित्त गरजूंसाठी आर्थिक मदत

**उडान फाउंडेशनचा अनोखा उपक्रम**



**तभा वृत्तसेवा**
**बार्शी/वैराग, दि. १६ एप्रिल-**

डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या १३५ व्या जयंती व महात्मा जोतिबा फुले यांच्या जयंतीनिमित्त एकाद्याच्या घरातील विझलेला दिवा पुन्हा पेटवूया या संकल्पनेतून उडान फाउंडेशनने एक अनोखा व समाजोपयोगी उपक्रम राबवला.

बारंगुळे प्लॉट येथील एका गरजू कुटुंबातील व्यक्तीला कॅन्सरसारखा गंभीर आजार झाल्यामुळे मोठा वैद्यकीय खर्च झाला असून, आजारपणामुळे दोघांनाही काम करता येत नाही. अशा परिस्थितीत ११ हजार रुपयांचे वीज बिल थकले असल्याने वीजपुरवठा खंडित झाला होता, त्यामुळे मुलींच्या अभ्यासात अडथळा निर्माण झाला होता. उडान फाउंडेशनने संबंधित कुटुंबाला ५ हजार रुपयांची आर्थिक मदत केली. याचबरोबर गॅस सिलेंडर स्फोटात नुकसानग्रस्त अंकुश पवार (लाडोळे) यांच्या कुटुंबाला ३१०० रुपये आणि सोलापूर रोडवरील कॅन्सरग्रस्त व्यक्तीच्या उपचारासाठीही ३१०० रुपयांची आर्थिक मदत करण्यात आली. यावेळी डॉ. गुलाब अंगारशा, माजी नगरसेवक कय्युम पटेल, ॲड. सरताज मुजावर, सादीक मुल्ला, ॲड.रियाज बागवान, विवेक गजशिव, राहुल पाटील, किरण कोकाटे, नगरसेवक दास मस्के आदी उपस्थित होते. सूत्रसंचालन किरण कोकाटे यांनी केले. जमील खान यांनी आभार मानले.

कार्यक्रम यशस्वीतेसाठी उडान फाउंडेशनचे अध्यक्ष इरफान शेख,उपाध्यक्ष जाफर शेख, कार्याध्यक्ष शकील मुलाणी, सचिव जमील खान, सहसचिव अख्तर शेख, मोहसीन पठाण, साजन शेख, राजु शिकलकर, तोसिफ बागवान, सादिक काझी,रियाज बागवान, अकिल मुजावर, रियाज बागवान मिरचीवाले, अल्ताफ शेख, एजाज शेख यांनी परिश्रम घेतले

## गुरुविद्या प्रतिष्ठानचे मानद पुरस्कार जाहीर

**प्रतिष्ठानच्या वतीने मोफत आरोग्य शिबीर व तायक्कांदो प्रशिक्षण**

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि.१६ एप्रिल-**

महात्मा बसवेश्वर यांच्या जयंती निमित्त येथील गुरूविद्या तर प्रतिष्ठानतर्फे देण्यात येणाऱ्या बसव मानद पुरस्कारासाठी विविध क्षेत्रातील ९ जणांची निवड करण्यात आली असून १६ एप्रिलपासून विविध कार्यक्रमांचे आयोजन केल्याची माहिती प्रतिष्ठानचे अध्यक्ष सातलिंग शटगार यांनी दिली.

सोमवारी (दि.२०) याचे वितरण सध्देश्वर पेठेतील हॉटेल समृद्धी येथे होणार आहे. माजी प्राचार्य के एम जमादार, माजी उपमहापौर नसिमा पठाण, गुरूविद्या प्रतिष्ठानचे संस्थापक अध्यक्ष सोमशेखर भोगडे, अध्यक्ष सातलिंग शटगार, उपाध्यक्षा राजश्री तडकासे, माजी अध्यक्ष प्रा. प्रभाकर नागणसुरे, सौ नमिता थिटे, मोहन भूमकर, विजयकुमार भोगडे, दत्तात्रय जामदार, श्रीदेवी येळमेली, रेणुका हब्बू आदींच्या उपस्थितीत याचे वितरण होईल.

१६ व १७ एप्रिलरोजी विजापूर रोड भागात सोलापूर जिल्हा स्पोर्ट्स कॉन्सिल तायक्कांदो स्पोर्ट्स् प्रशिक्षण शिबिर आयोजित केले आहे. १८ एप्रिल रोजी गुरुविद्या प्रतिष्ठान पोलीस बॉईज असोसिएशन, हरि प्रिया ब्राह्मण महिला सामाजिक मंच यांच्या संयुक्त विद्यमाने. महात्मा बसवेश्वर जयंती व भगवान परशुराम जयंती निमित्त शनिवार (दि.१८) सकाळी ११वाजता डी फार्मसी कॉलेज जवळ व मोनार्च हॉस्पिटल समोर श्रेयस क्लिनिक येथे मोफत सर्व रोग निदान शिबीर आयोजित केले आहे. तसेच नूतन नगरसेवक याचा सत्कार करण्यात येईल. या कार्यक्रमास पोलीस उपायुक्त डॉ अश्विनी पाटील, महापौर विनायक कोंडयाल, गटनेता नगरसेवक नरेंद् काळे, नगरसेवक डॉ किरण देशमुख, ज्ञानेश्वर मॅकल, रूद्रेशजी बोरामणी, सात्विक बडवे, सहयोग ब्राह्मण संस्था जुळे सोलापूर अध्यक्ष श्रीकांत कुलकर्णी, डॉ श्रेयस वळसंगकर प्रमुख पाहुणे म्हणून उपस्थित राहणार आहे. रविवार १९ एप्रिल २०२६ रोजी बसव जयंतीनिमित्त सकाळी कौंतम चौक येथे बसवेश्वरांच्या पुतळ्यास पुष्पहार अर्पण करून आहे. वरील सर्व कार्यक्रमास बसव भक्तांनी उपस्थित राहावे असे आव्हान सचिवा श्रीदेवी यळमेली यांनी केले.

### यांना जाहीर झाला पुरस्कार

✲ **बसवरत्न :** विजय साळुंखे (बार्शी), प्रा श्री स्वामीनाथ कल्लशेटी ✲ **बसव माता :** निर्मला श्रीमत दुधनी ✲ **बसव भूषण :** क्षितीजा विजयकुमार गाताडे ✲ **शरण दांम्पत्य :** सौ व श्री भंडारे. ✲ **बसव श्री :** दत्तात्रय खडतरे (मंगळवेढा) ✲ **बसव शरणी :** वसुंधरा शर्मा कुलकर्णी, सुवर्णा नागेश धरणे, नगमा मोहसीन शेख, मोहसीन जहांगीर शेख

## सांगोल्यात उद्या विविध कामांचे भूमिपूजन व उद्घाटन सोहळा

**शिवसेना प्रवक्ते अरुण पाटील यांची माहिती**

**तभा वृत्तसेवा,**
**सांगोला,दि.१६ एप्रिल -**

सांगोला नगरपरिषदेच्या विविध योजनेअंतर्गत सन २०२५-२६ या वर्षात मंजुर झालेल्या विविध कामांचे भूमिपूजन व उद्घाटन सोहळा शनिवार १८ एप्रिल रोजी दु.४ वा. संपन्न होणार असल्याची माहिती शिवसेना प्रवक्ते नगरसेवक अरुण पाटील यांनी पत्रकार परिषदेमध्ये दिली. यावेळी नगराध्यक्ष आनंदा माने उपस्थित होते.

सांगोला नगरपरिषद क्षेत्रातील चांडोलेवाडी, शेंबडेवस्ती, लक्ष्मीनगर मिरज रोड येथे अंतर्गत रस्ते करणे या कामांचा भूमिपूजन तर आठवडा बाजार येथील मटन मार्केट फेज-२, देशमुख वस्ती येथील रस्ता, मोहन राऊत घर ते बायपास रस्त्यापर्यंत रस्ता खडीकरण व सीडी वर्कचा, चिंचोली रोड ते पूर्वेस फॅब्टेक कॉलेजकडे जाणारा रस्ता ते फॅब्टेक कॉलेज पर्यंतचा रस्ता, अयोध्यानगरी येथील सांस्कृतिक सभागृह, सिद्धिविनायक हौसिंग सोसायटी येथील विकसित केलेली खुली जागा या कामाचा उद्घाटन सोहळा माजी आ.ॲड. शहाजीबापू पाटील यांच्या शुभहस्ते पार पडणार आहे. या कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी नगराध्यक्ष आनंदा माने, प्रमुख उपस्थिती आ.डॉ.बाबासाहेब देशमुख, माजी आ.दिपकआबा साळुंखे पाटील, माजी नगराध्यक्ष रफीकभाई नदाफ यांची असणार आहे.

# प्रधानमंत्री घरकुल योजनेचा वेग मंदावला; सोलापुरात ९५ हजारांहून अधिक घरे अपूर्ण

- १ लाख उद्दिष्टांपैकी फक्त ५ हजार घरे पूर्ण
- हजारो कुटुंबांचे घराचे स्वप्न अधांतरी

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि.१६ एप्रिल-**

प्रधानमंत्री आवास योजना-ग्रामीण (टप्पा-२) अंतर्गत सोलापूर जिल्ह्यात घरकुल बांधकामाची गती अत्यंत मंदावल्याचे चित्र समोर आले आहे. जिल्ह्याला मंजूर झालेल्या घरकुलांपैकी प्रत्यक्ष पूर्ण झालेल्या घरांची संख्या अत्यल्प असून, तब्बल ९५ हजारांहून अधिक घरे अजूनही अपूर्ण अवस्थेत आहेत. त्यामुळे गरजू कुटुंबांचे स्वतःच्या घराचे स्वप्न रखडल्याची भावना व्यक्त होत आहे.

सोलापूर जिल्ह्यासाठी एकूण १ लाख २ हजार ३४४ घरकुलांचे उद्दिष्ट देण्यात आले होते. त्यापैकी आतापर्यंत केवळ ५ हजार ३६१ घरे पूर्ण झाली आहेत. तर ९५ हजार ९४६ घरे विविध टप्प्यांवर अपूर्ण असल्याचे अहवालातून स्पष्ट झाले आहे. ही आकडेवारी प्रशासनाच्या कार्यपद्धतीवर प्रश्नचिन्ह निर्माण करणारी ठरत आहे..घरकुल योजनेत लाभार्थ्यांना टप्प्याटप्प्याने आर्थिक मदत दिली जाते. मात्र प्रत्यक्षात हप्ते वेळेवर न मिळणे, अपुरे अनुदान, वाढते बांधकाम साहित्य दर, मजुरी खर्च आणि कागदोपत्री प्रक्रियेमुळे अनेक लाभार्थ्यांचे बांधकाम रखडले आहे.



अनेकांनी पाया टाकून काम सुरू केले, पण पुढील निधी न मिळाल्याने काम अर्धवट थांबले आहे. त्यामुळे अनेक कुटुंबे अजूनही कच्च्या घरात, पत्र्याच्या शेडमध्ये किंवा भाड्याच्या घरात राहण्यास मजबूर आहेत. १४ एप्रिल २०२६ पर्यंतच्या उपलब्ध आकडेवारीनुसार, ९३ हजार ७०० लाभार्थ्यांना पहिला हप्ता देण्यात आला आहे. मात्र दुसरा हप्ता केवळ ४७ हजार २६४ लाभार्थ्यांपर्यंत पोहोचला आहे. म्हणजेच निम्म्याहून अधिक लाभार्थी अजूनही पहिल्या टप्प्यातच अडकले आहेत. तिसरा आणि चौथा हप्ता अत्यल्प प्रमाणात वितरित झाल्याने पूर्ण घरांची संख्या नगण्य राहिली आहे. तालुकानिहाय पाहता काही भागांत तुलनेने सम ाधानकारक प्रगती झाली आहे. माळशिरस तालुक्याने ५८.७२ टक्के, तर अक्कलकोटने ४८.७३ टक्के प्रगती नोंदवली आहे. मात्र दुसरीकडे सोलापूर उत्तर तालुका सर्वाधिक पिछाडीवर असल्याचे दिसून येत आहे. इतर अनेक तालुक्यांमध्येही घरकुल बांधकामाची गती अत्यंत संथ आहे.जिल्ह्यात अजूनही १,०३७ घरांच्या मंजुरी प्रलंबित असल्याची माहिती समोर आली आहे. मंजुरी मिळाल्यानंतरही निधीअभावी अनेक कामे सुरू होऊ शकलेली नाहीत.

अर्धवट बांधकामामुळे पावसात नुकसान होण्याची भीती व्यक्त केली जात आहे. त्यामुळे प्रशासनाने तातडीने निधी वितरण, प्रलंबित मंजुरी आणि कामांच्या गतीवर लक्ष केंद्रित करणे गरजेचे झाले आहे. घरकुल योजना ही गरीबांसाठी आशेचा किरण मानली जात असली, तरी प्रत्यक्ष अंमलबजावणीत होणारा विलंब आणि आर्थिक अडचणींमुळे ही योजना अनेकांसाठी अद्याप स्वप्नवतच ठरत आहे. आता प्रशासन या रखडलेल्या घरकुलांना कितपत गती देते? याकडे लाभार्थ्यांचे लक्ष लागले आहे.

सलग तीन दिवस पारा ४३ अंशांच्या पार

# सोलापुरात नाईट मार्केटची गरज

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर दि. १६ एप्रिल-**

दिवसभर ऊन असल्याने शहरासह आसपासच्या नागरिकांना शहरातील बाजारपेठात फिरता येत नाही. दुपारच्या उन्हाच्या झळा असह्य होत असल्याने सोलापूर शहरात 'नाईट मार्केट' चालू करावीत, शहरातील प्रम ुख बाजारपेठातील दुकानेही चालू राहावीत, अशी मागणी स्थानिकसह परगावचे नागरिक करु लागले आहेत.

जिल्ह्यात उन्हाचा तडाखा दिवसेंदिवस तीव्र होत असून, आज कमाल तापमानाने ४३.४ अंश सेल्सिअसचा टप्पा गाठला आहे. कालच्या तुलनेत तापमानात ०.१ अंशाने वाढ झाली असून, वाढत्या उष्णतेमुळे जनजीवन विस्कळीत झाले आहे. सकाळी ९ वाजेपासूनच उन्हाची तीव्रता जाणवत आहे. सायंकाळी ४ वाजेपर्यंत ऊन असल्याने शहरातील नागरिक सायंकाळी ५ नंतरच घराबाहेर पडताना दिसत आहेत. यामुळे शहरातील बाजारपेठा सायंकाळी ५ नंतरच भरलेल्या दिसून येत आहेत. दरम्यान, उन्हापासून बचावासाठी करण्यासाठी प्रशासनाकडून वारंवार सूचना देण्यात येत आहेत.

## महत्वाचे...

### अण्णासाहेब पाटील महामंडळाचा डिजिटल पुढाकार

**सोलापूर, दि. १६ एप्रिल-**

अण्णासाहेब पाटील आर्थिक मागास विकास महामंडळामार्फत आर्थिक सहाय्य देण्यापुरते मर्यादित न राहता लाभार्थ्यांना सक्षम उद्योजक बनविण्यासाठी विविध डिजिटल उपक्रमांची प्रभावी अंम लबजावणी करण्यात येत आहे. व्यवसाय वृद्धीसाठी सर्वंकष पाठबळ देण्याच्या उद्देशाने "Marketing Tab' आणि डिजिटल प्रशिक्षण कार्यक्रम सुरू करण्यात आले आहेत. महामंडळाच्या अधिकृत पोर्टलवर विकसित करण्यात आलेल्या 'Marketing Tab' द्वारे लाभार्थ्यांना त्यांच्या उत्पादनांची माहिती, छायाचित्रे, किंमत, संपर्क तपशील व व्यवसायाचा पत्ता अपलोड करण्याची सुविधा उपलब्ध करून देण्यात आली आहे. सध्या यावर २७ हजार ५०० हून अधिक व्यवसायांची नोंद करण्यात आली आहे. या उपक्रमातून लोकल ते ग्लोबल ही संकल्पना प्रत्यक्षात आणण्याचा प्रयत्न करण्यात येत आहे. भविष्यात लाभार्थ्यांच्या मागणीनुसार Payment Gateway सुविधा सुरू करण्याचेही नियोजन आहे.व्यवसायातील आवश्यक कौशल्ये विकसित करण्यासाठी Webinar, YouTube आणि Podcast यांच्या माध्यमातून डिजिटल प्रशिक्षण कार्यक्रम राबविण्यात येत आहेत.

### कोल्ह्याच्या हल्ल्यात २ शेतमजूर जखमी

**सोलापूर, दि. १६ एप्रिल-**

कोल्ह्याने झडप टाकून चावा घेतल्याने शेतामध्ये काम करणारे दोन शेतमजूर जखमी झाल्याची घटना अक्कलकोट तालुक्यातील सिंदखेड येथे घडली. याकूब कासिम शेख (वय-५०), रमेश बाबुराव गाडेकर (वय-५५) अशी जखमींची नावे आहेत. बुधवारी दुपारच्या वेळी याकुब शेख हे शेतातील जनावराचा गोठ्याजवळ काम करीत होते. त्यावेळी कोल्ह्याने झडप टाकून त्यांच्या पायाला चावा घेतला. त्यांनी काठीने हुसकावून लावले. दरम्यान, कांही अंतरावर झोपलेल्या गाडेकर यांच्यावर कोल्ह्याने चाल करुन त्यांच्याही पायाला चावा घेतला. त्यांच्या ओरडण्याच्या आवाजाने आजूबाजूचे शेतकरी घटनास्थळी आले. तेंव्हा कोल्हा उसाच्या फडात गायब झाला. शेख व गाडेकर यांच्यावर अक्कलकोट येथे प्राथमिक उपचार करुन पुढील उपचारासाठी सोलापूर येथील शासकीय रुग्णालयात दाखल करण्यात आले.

### चाकू हल्ल्यात दोन सख्खे भाऊ जखमी

**सोलापूर, दि. १६ एप्रिल-**

अज्ञात कारणावरून चाकू आणि लाथाबुक्क्याने केलेल्या मारहाणीत दोन सख्खे भाऊ जखमी झाले. ही घटना बार्शी तालुक्यातील भांडेगाव येथे बुधवारी मध्यरात्रीच्या सुमारास घडली. समाधान सज्जन मंडलीक (वय ३३ वर्षे) आणि त्याचा भाऊ आकाश मंडलिक अशी जखमींची नावे आहेत. बुधवारी मध्यरात्री १२ वाजेच्या सुमारास ते दोघे घराजवळ असताना विठ्ठल वलगी आणि शांताराम जाधव या दोघांनी मिळून त्यांना मारहाण केली. त्यांना वैराग येथे प्राथमिक उपचार करून येथील शासकीय रुग्णालयात दाखल करण्यात आले.

# बालविवाह रोखण्यासाठी १०९८ ची यंत्रणा सतर्क

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. १६ एप्रिल-**

जिल्हा महिला व बाल विकास अधिकारी कार्यालय व जिल्हा बाल संरक्षण कक्ष अंतर्गत चाईल्ड हेल्प लाईन १०९८ शासकीय यंत्रणा सतर्क झाली आहे. बालविवाह होत असतील तर त्याची माहिती उपरोक्त हेल्पलाइन क्रमांकावर द्यावी, असे आवाहन जिल्हा महिला व बालविकास अधिकारी अविनाश मगर यांनी केले आहे.





अक्षय तृतीया हा महत्वाचा मुहूर्त असल्याने या शुभ मुहूर्तावर सामुदायिक तसेच एकल विवाह समारंभ आयोजित केले जातात. यामध्ये बालविवाहांचे प्रमाण मोठ्या प्रमाणात असण्याची शक्यता नाकारता येत नाही, त्याअनुषंगाने जिल्हा महिला व बालविकास अधिकारी कार्यालय सतर्क झाले आहे. बालविवाह प्रतिबंधक अधिनियम २००६ नुसार विवाहातील मुलीचे वय १८ वर्षे व मुलाचे वय २१ वर्षे पूर्ण असले पाहिजे जर वय त्यापेक्षा कमी असले तर ते बालविवाह मानले जाते. बालविवाह प्रतिबंधक अधिनियम २००६ नुसार असे विवाह बेकायदा ठरतात आणि याविरोधात गुन्हा नोंदविला जातो. रस्त्यावरील बालके, बालकामगार, शोषित बालके, देह विक्रीस बळी पडलेली बालके, व्यसनाधीन बालके, संघर्षग्रस्त बालके, मतिमंद बालके, आपत्तीग्रस्त बालके, कौटुंबिक कलहास बळी पडलेली बालके, हरवलेले बालके, शोषणापासून संरक्षण, भावनिक मदत व मार्गदर्शन, माहिती व संदर्भ सेवेकरिता चाईल्ड हेल्प लाईन १०९८ ही २४ तास मोफत दूरध्वनी सेवा आहे. माहिती देणाऱ्याचे नाव गोपनीय ठेवण्यात येते, असेही त्यांनी सांगितले.

# 'धर्मादाय'मार्फत रुग्णालयांची तपासणी : सूर्यवंशी

### रुग्णांना चांगल्या आरोग्य सुविधा द्याव्यात

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. १६ एप्रिल-**





सोलापूर जिल्ह्यात १७ धर्मादाय रुग्णालये कार्यरत आहेत. या सर्व रुग्णालयांनी शासन निर्दे शानुसार सर्वसामान्य, गरजू व गोरगरीब रुग्णांना चांगल्या आरोग्य सुविधा उपलब्ध करून देणे अनिवार्य आहे. धर्मादाय पथकांमार्फत या रुग्णालयांची तपासणी करण्यात येणार आहे, असे धर्मादाय उप आयुक्त ईश्वर सूर्यवंशी यांनी निर्देशित केले आहे.

नियोजन भवन येथील सभागृहात आयोजित धर्मादाय रुग्णालय जिल्हास्तरीय समितीच्या त्रैमासिक आढावा बैठकीत ते बोलत होते. यावेळी निवासी उपजिल्हाधिकारी अभिजीत पाटील, महात्मा फुले जन आरोग्य योजनेचे जिल्हा समन्वयक प्रवीण गुंजाळ, धर्मादाय निरीक्षक उमेश देशमुख, भागवत फुलसुंदर यांच्यासह समिती सदस्य व धर्मादाय रुग्णालयांचे प्रतिनिधी उपस्थित होते.

राज्य शासनाच्या विधी व न्याय विभागाच्या शासन निर्णयाप्रमाणे धर्मादाय रुग्णालयांनी गोरगरीब गरजू रुग्णांना चांगल्या आरोग्य सुविधेसह त्यांना व्यवस्थित माहिती देणे आवश्यक आहे. ज्या कारणासाठी शासनाने रुग्णालयांना मान्यता दिलेली आहे त्याची प्रभावीपणे अंमलबजावणी करणे आवश्यक आहे. रुग्णालयांना उपलब्ध करुन दिलेल्या जागा वैद्यकीय सेवाऐवजी अन्य कारणांसाठी करता कामा नये.



प्रत्येक धर्मादाय रुग्णालयाच्या बाहेर दर्शनी भागात संबंधित आरोग्य सेवक अथवा आरोग्य मित्र याचे नाव व संपर्क क्रमांक डिस्प्ले बोर्डच्या माध्यम ातून लावावा. तसेच त्या बोर्डवर टोल फ्री क्रमांक तक्रार निवारण क्रमांक ही उपलब्ध करून द्यावेत. जेणेकरून तिथे येणाऱ्या गरजू रुग्णांना तात्काळ आरोग्य मित्राच्या मार्फत सर्व प्रक्रिया वेगाने पार पडता येईल, असेही त्यांनी सांगितले.

**प्रांताधिकाऱ्यांच्या अध्यक्षतेखाली पथक**

सर्व धर्मादाय रुग्णालया मध्ये शासन निर्देशाप्रमाणे आरोग्य सुविधा उपलब्ध करून दिल्या जात आहेत का नाहीत? याबाबतची तपासणी संबंधित प्रांत अधिकाऱ्यांच्या अध्यक्षतेखाली एक पथक तयार करून करण्यात येईल. या पथकामध्ये तहसीलदार, आरोग्य अधिकारी यांचाही समावेश केला जाईल. हे पथक रुग्णालयांची तपासणी करून त्याचा अहवाल एका महिन्यात देईल, असे निवासी उपजिल्हाधिकारी अभिजीत पाटील यांनी सांगितले.

### १०२ वाहन चालकांचे ११ महिने वेतन रखडले

**मंगळवेढा :** मंगळवेढा ग्रामीण रुग्णालयातील अत्यावश्यक असलेल्या १०२ वाहनावरील चालकांच्या तब्बल ११ महिने पगारी न झाल्यामुळे त्यांच्या कुटूंबावर उपासमारीची वेळ आली असून जि.प.चे मुख्य कार्यकारी अधिकारी यांना याबाबत लेखी निवेदन देण्यात आले आहे. मंगळवेढा ग्रामीण रुग्णालयात अत्यावश्यक वाहन म्हणून १०२ ज्या वाहनाची ओळख आहे. यावरील वाहन चालकांना तब्बल ११ महिने वेतन नसल्यामुळे कुटूंबाची उपासमार होत असून किराण दुकानदारानेही उधार देणे बंद केल्यामुळे या चालकांची अर्थिक कोंडी झाली आहे.

# सोलापुरातील १ हजार ५९० रुग्णांना १२.८६ कोटींची मदत

### मुख्यमंत्री सहाय्यता निधी ठरत आहे आधार

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि.१६ एप्रिल-**

सोलापूर जिल्ह्यात गत आर्थिक वर्षात १ हजार ५९० रुग्णांना सुमारे १२ कोटी ८६ लाख रुपयांची वैद्यकीय आर्थिक मदत वितरित करण्यात आल्याची माहिती मुख्यमंत्री सहाय्यता निधी व धर्मादाय रुग्णालय मदत कक्ष प्रमुख रामेश्वर नाईक यांनी दिली. शासनाच्या आरोग्यविषयक विविध योजनांमधून मदत न मिळालेल्या पात्र व गरजू रुग्णांसाठी मुख्यमंत्री वैद्यकीय सहाय्यता निधी 'आधार' ठरत आहे.



मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या दूरदृष्टीतून जिल्हा कक्षाची स्थापना, पेपरलेस अर्ज प्रक्रिया, तातडीने अर्जाचा निपटारा करणे आदी सकारात्मक बदल करण्यात आले. सामंजस्य करार, क्राउड फंडिंग आदींच्या माध्यमातून धर्मादाय रुग्णालये, संस्था, दाते आदींचे सहकार्य लाभत आहे. मुख्यमंत्री सहाय्यता निधीच्या कार्यपध्दतीत केलेल्या सुधारणा आणि मदतीचे विविध मार्ग उपलब्ध करून दिल्याने वितरणाचा वेगही वाढला आहे. कॉक्लियर इम्प्लांट, हृदय, यकृत, किडनी, फुफ्फुस, बोन मॅरो, गुडघ्याचे प्रत्यारोपण, हिप रिप्लेसमेंट, लहान बालकांची शस्त्रक्रिया, मेंदूचे आजार, डायालिसिस, कर्करोग (केम ोथेरपी/ रेडिएशन), अस्थिबंधन, नवजात शिशुंचे आजार, भाजलेले रुग्ण असे २० प्रकारच्या आजारांसाठी अर्थसहाय्य दिले जाते. गरजुंनी १८०० १२३ २२११ या टोल फ्री क्रमांकावर संपर्क साधावा, असे आवाहनही त्यांनी केले.

**सामंजस्य करारद्वारे विशेष निधी उपलब्ध**

मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या पुढाकाराने मुख्यमंत्री सहाय्यता निधी कक्ष, बीपीसीएल फाऊंडेशन व टाटा मेमोरियल सेंटर यांच्यात बालकांच्या कर्करोग उपचारासाठी नुकताच सामंजस्य करार करण्यात आला आहे. या करारामुळे सामाजिक दायित्व अंतर्गत उपचारांसाठी विशेष निधी उपलब्ध होणार आहे. आर्थिक अडचणी कमी होऊन गरजू बालकांना गुणवत्तापूर्ण कर्करोग उपचार होणार आहेत.

**गत आर्थिक वर्षातील मदत**

१ एप्रिल २०२५ ते ३१ मार्च २०२६ या कालावधीत राज्यातील तब्बल ४० हजार ७७६ रुग्णांना ३३३ कोटी ६ लाख ८१ हजार ५०० रुपयांची वैद्यकीय मदत देण्यात आली आहे. तर, याच कालावधीत सोलापूर जिल्ह्यातील १५९० रुग्णांना सुमारे १२ कोटी ८६ लाख ६ हजार रुपयांची आर्थिक मदत वितरित करण्यात आली आहे.

# मिरवणूक मार्ग स्वच्छ, सुरक्षित, सुव्यवस्थित ठेवण्यासाठी सर्व यंत्रणांनी समन्वयाने काम करावे : महापौर कोंड्याल

### महापालिका, पोलिस प्रशासनाने केली मिरवणूक मार्गाची पाहणी

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि.१६ एप्रिल-**

भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या जयंती मिरवणुकीसाठी महापालिका प्रशासनाच्या वतीने सर्वंकष तयारी करण्यात आली असून नागरिकांना कोणतीही अडचण भासू नये यासाठी सर्व विभागांना सतर्क राहण्याच्या सूचना देण्यात आल्या आहेत. मिरवणूक मार्ग स्वच्छ, सुरक्षित आणि सुव्यवस्थित ठेवण्यासाठी सर्व यंत्रणा समन्वयाने काम करत आहेत. तसेच नागरिकांनीही प्रशासनाला सहकार्य करत शिस्तबद्ध पद्धतीने मिरवणुकीत सहभागी व्हावे, असे आवाहन महापौर विनायक कोंड्याल यांनी केले आहे.



भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या जयंती निमित्त रविवारी १९ एप्रिल रोजी निघणाऱ्या मिरवणुकीच्या निमित्ताने सोलापूर महानगरपालिका व पोलीस प्रशासनाने संयुक्तरीत्या मिरवणूक मार्गाची सखोल पाहणी केली. या पाहणी दौऱ्यात महापौर विनायक कोंड्याल यांच्या मार्गदर्शनाखाली विविध विभागांच्या अधिकाऱ्यांनी तयारीचा आढावा घेतला..यावेळी उपमहापौर ज्ञानेश्वरी देवकर, सभागृह नेते नरेंद्र काळे, पोलीस आयुक्त एम. राजकुम ार, महापालिका आयुक्त डॉ. सचिन ओम्बासे, अतिरिक्त आयुक्त संदीप कारंजे, पोलीस उपायुक्त गौउर हसन, विजय कबाडे, अश्विनी पाटील, नगर अभियंता सारिका अकुलवार, कार्यकारी अभियंता (विद्युत) राजेश परदेशी यांच्यासह भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर मध्यवर्ती जयंती उत्सव समिती व बोधिसत्व डॉ. बाबासाहेब आंबेडकर जयंती उत्सव मध्यवर्ती महामंडळाचे पदाधिकारी उपस्थित होते. यामध्ये राजाभाऊ सरवदे, माजी नगरसेवक आनंद चंदनशिवे, बाळासाहेब वाघमारे, के.डी. कांबळे, मिलिंद प्रक्षाळे, सुबोध वाघमोडे, लौकिक इंगळे, नागेश इंगळे, अजित बनसोडे, प्रवीण निकाळजे, रॉकी बंगाळे, दशरथ कसबे, पिंटू डावरे, विकी शेंडगे, सुशील सरवदे, शिवम सोनकांबळे, विनोद वाघमारे, बबन शिंदे तसेच विनीत गायकवाड, सुग्रीव जेटीथोर, अविनाश आठवले, योगेश कांबळे, शुभम धावने आदींचा सहभाग होता.

मिरवणूक मार्गावरील विविध बाबींचा बारकाईने आढावा घेण्यात आला. मिरवणुकीत कोणताही अडथळा निर्माण होऊ नये यासाठी रस्त्यावरील झाडांच्या फांद्या छाटणे, खराब रस्त्यांची दुरुस्ती करणे, विद्युत खांबांवरील दिव्यांची दुरुस्ती करणे तसेच इतर आवश्यक कामे तातडीने पूर्ण करण्याच्या सूचना महापौर विनायक कोंड्याल यांनी संबंधित अधिकाऱ्यांना दिल्या. स्वच्छता, वाहतूक व्यवस्थापन आणि नागरिकांच्या सुरक्षिततेच्या दृष्टीने सर्व उपाययोजना काटेकोरपणे राबविण्याचे निर्देशही दिले.

**पोलीस विभागाकडून सविस्तर नियोजन : पोलीस आयुक्त**

पोलीस आयुक्त एम. राजकुमार यांनी सांगितले की, मिरवणूक मार्गावर वाहतुकीचा अडथळा निर्माण होऊ नये यासाठी पोलीस विभागाकडून सविस्तर नियोजन करण्यात आले आहे. आवश्यक त्या ठिकाणी वाहतूक वळविणे, बंदोबस्त वाढविणे आणि नियंत्रणासाठी विशेष पथके नियुक्त केली जाणार असून कायदा व सुव्यवस्था अबाधित राखण्यासाठी पोलीस प्रशासन पूर्णपणे सज्ज आहे.

# जिल्ह्यात मार्च अखेर ५७ हजार ९२६ कुणबी प्रमाणपत्रांचे वाटप

### विविध कारणांमुळे ५४३ जणांचे नाकारले अर्ज

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. १६ एप्रिल-**

जिल्ह्यात कुणबी, मराठा-कुणबी, कुणबी मराठा दाखले वाटपासाठी विशेष मोहीम राबवली जात असून, २४ ऑक्टोबर २०२३ ते १ एप्रिल २०२६ या काळात जिल्ह्यातून एकूण ५७ हजार ९२६ प्रमाणपत्रांचे वितरण करण्यात आले आहे. तर ५४३ जणांची अर्ज विविध त्रुटींमुळे नाकारण्यात आल्याची माहिती जिल्हा प्रशासनाकडून मिळाली.





दिलेल्या प्रमाणपत्रांमध्ये कुणबी ५७ हजार ७२६, मराठा-कुणबी ३१ आणि कुणबी मराठा १६९ असा समावेश आहे. गतवर्षी सोलापूर जिल्हाधिकारी कार्यालयाने एक महत्त्वपूर्ण परिपत्रक जारी केले होते. छत्रपती शिवाजी महाराज्याभिषेकाच्या ३५० व्या वर्षपूर्तीनिमित्त आणि राष्ट्रपती पद्धतीने घोषित केलेल्या 'सेवा पंधरवडा' उपक्रमांतर्गत विविध जनकल्याणकारी कार्यक्रम राबवण्याचे आदेश दिले आहेत. या उपक्रमाचा एक भाग म्हणून मराठा सम ाजातील पात्र लाभार्थ्यांना कुणबी, मराठा-कुणबी किंवा कुणबी-मराठा प्रमाणपत्र देण्यासाठी विशेष मोहीम राबवली. या उपक्रमाची सुरुवात पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या वाढदिवशी १७ सप्टेंबर २०२५ पासून करण्यात आली आणि त्या उपक्रमाची सांगता राष्ट्रपिता महात्मा गांधी यांच्या जयंतीदिनी २ ऑक्टोबर २०२५ रोजी करण्यात आली. यावेळी जिल्हाधिकारी कार्यालयाच्या आदेशानुसार, मराठा समाजातील पात्र व्यक्तींना जात प्रमाणपत्र देण्यासाठी विशेष शिबिरे आयोजित केली. या शिबिरांमध्ये अर्जदारांना आवश्यक मार्गदर्शन आणि कागदपत्रांची पडताळणी करण्याची सुविधा एकाच ठिकाणी उपलब्ध करून दिली. ज्यामुळे पात्र लोकांना जलद आणि पारदर्शक पद्धतीने प्रमाणपत्र मिळाले आणि या प्रमाणपत्रांमुळे मराठा समाजाला शैक्षणिक आणि नोकरीतील आरक्षणाचा लाभ मिळण्यास मदत होणार आहे. वरील कालावधीत एकूण ५८ हजार ४७३ अर्ज प्राप्त झाले होते. यामध्ये उपविभागीय अधिकारी सोलापूर विभाग सोलापूर क्र. १ यांच्याकडून २६ हजार ७४४, उपविभागीय अधिकारी, सोलापूर क्र. २ यांच्याकडून ११८, माढा प्रांत कार्यालयाकडून २१०८४, पंढरपूर प्रांत कार्यालयाकडून ९ हजार ६०४, मंगळवेढा प्रांत कार्यालयाकडून १३८ आणि माळशिरस प्रांत कार्यालयाकडून ७८५ असे अर्ज प्राप्त झाले होते. यातून ५७ हजार ९२६ जणांना प्रमाणपत्रांचे वितरण करण्यात आले आहे.

हे पत्र मुद्रक व प्रकाशक दिलीप शिवमुर्ती दुलंगे यांनी सोलापूर तरुण भारत मीडिया लिमिटेड करिता, सोलापूर तरुण भारत कार्यालय १९/२० औद्योगिक वसाहत, होटगी रोड, सोलापूर येथे छापून सोलापूर, धाराशिव, लातूर,संपूर्ण मराठवाडा तसेच पश्चिम महाराष्ट्र सातारा,सांगली,कोल्हापूर येथील सोलापूर तरुण भारतच्या विभागीय कार्यालयातून प्रकाशित करून वितरीत केले. ● प्रबंध संपादक : विवेक कृष्णाजी घळसासी. ● समूह मुख्य संपादक : दिलीप यशवंत पेठे.● मुख्य संपादक :प्रशांत वसंतराव माने दैनिक सोलापूर तरुण भारत रजि.नं.G2/RNP/SLP/D/32/2024-26.RNI Reg.No.46878/87. दूरध्वनी -संपादकीय-(०२१७)-२६००४९८ ● जाहिरात विभाग (०२१७)-२६००३९८. E-mail starunbharatgmail.com. ● Website:http://dainiktarunbharat/ या अंकात प्रसिद्ध झालेल्या बातम्या व लेख यामधून व्यक्त झालेल्या मतांशी संपादक/संचालक सहमत असतीलच असे नाही. (पी. आर. बी. कायद्यानुसार जबाबदारी)

Mr. Dilip Shivmurthi Dulange is the publisher on behalf of the Company Solapur Tarun Bharat Media Limited., and Daily Solapur Tarun Bharat. We print/publish and distribute these Editions like Solapur, Dharashiv, Latur Nanded, Parbhani, Hingoli, Jalna, and Beed from Register Address 19/20, Industrial Estate, Hotgi Road, Solapur – 413003. ● Mr. Vivek Krishnaji Ghalsasi - Dissertation Editor / ● Mr. Dilip Yeshwant Pethe - Group Chief Editor ● Mr. Prashant Vasantrao Mane - Chief Editor, Daily Solapur Tarun Bharat Postal Register No. G2/RNP/SLP/D32/2024-26. RNI Register No. 4687/87. Editorial Department Tel. No. – 0217-2600398) Email ID starunbharat@gmail.com and Advertisement Department Tel. No. – 0217-2600498, ● Website: https://dainiktarunbharat.com/, ● Epaper: https://epaper.dainiktarunbharat.com/. The Editors / Directors do not necessarily agree with the views expressed in the news and articles published in this issue. (responsible as per PRB Act)

# पाणीटंचाई निवारण, जलजीवन मिशनच्या कामांना प्राधान्य

## नूतन सीईओ कुशल जैन यांनी स्वीकारला पदभार

## ग्रामदैवत श्री सिध्देश्वरांचे दर्शन घेऊन कामाला सुरुवात



**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि.१६ एप्रिल-**

संतभूमी आणि ऐतिहासिक परंपरा लाभलेल्या सोलापूर नगरीत प्रशासकीय कारकिर्दीची नवी सुरुवात करताना आनंद होत आहे. संतांच्या पावन नगरीत काम करण्याची संधी मिळणे ही माझ्यासाठी अभिमानाची बाब आहे. आपल्या या नव्या इनिंगमध्ये पाणीटंचाई निवारण, जलजीवन मिशनच्या कामांना प्राधान्य देणार आहे, असे जिल्हा परिषदेचे नूतन सीईओ अर्थात मुख्य कार्यकारी अधिकारी कुशल जैन यांनी सांगितले.

सोलापूरचे ग्रामदैवत श्रीसिध्देश्वरांचे दर्शन घेऊन त्यांनी आपल्या कामाची सुरुवात केली. पदभार स्वीकारल्यानंतर त्यांनी जिल्हा परिषदेतील विविध विभागांच्या कामकाजाचा प्राथमिक आढावा घेतला. ग्रामीण भागातील विकासकामे, शिक्षण, आरोग्य, पाणीपुरवठा, रस्ते यांसह शासकीय योजनांची प्रभावी अंमलबजावणी यावर विशेष भर देणार असल्याचे त्यांनी स्पष्ट केले.अतिरिक्त मुख्य कार्यकारी अधिकारी संदीप कोहिनकर, उपमुख्य कार्यकारी अधिकारी स्मिता पाटील, मुख्य लेखा व वित्त अधिकारी मीनाक्षी वाकडे यांनी त्यांचे स्वागत केले. उपमुख्य कार्यकारी अधिकारी चंद्रशेखर जगताप, सूर्यकांत भुजबळ, अमोल जाधव, प्रसाद मिरकले, माध्यमिक शिक्षणाधिकारी सचिन जगताप यांनी त्यांचा सत्कार केला. यावेळी विविध विभागातील अधिकारी, कर्मचारी उपस्थित होते.

उन्हाळ्याची तीव्रता वाढत आहे. जिल्ह्यातील अनेक तालुके हे अवर्षणप्रवण आहेत. त्यामुळे ग्रामीण भागात पिण्याच्या पाण्याची कमतरता भासू नये; यासाठी पाणी टंचाईचा सविस्तर आढावा घेण्यात येईल. 'जलजीवन मिशन' अंतर्गत सुरु असलेल्या पाणीपुरवठ्याची कामांसंदर्भात काटेकोर तपासणी करण्यावर विशेष भर देणार आहे. आपल्या कारकीर्दीत जनसेवेसाठी पूर्ण क्षमतेने प्रयत्न करेन, असेही त्यांनी सांगितले.

### असा आहे प्रशासकीय प्रवास

कुशल जैन हे २०२२ च्या बॅचचे आयएएस अधिकारी आहेत. ते मूळचे जबलपूर (मध्य प्रदेश) येथील आहेत. यापूर्वी त्यांनी दिल्ली येथे रस्ते वाहतूक आणि महामार्ग मंत्रालयात 'सहाय्यक सचिव' म्हणून काम केले. नागपूर जिल्ह्यात एक वर्ष प्रोबेशनरी कालावधी पूर्ण केला.गडचिरोली जिल्ह्यातील अहेरी येथे उपविभागीय अधिकारी आणि एकात्मिक आदिवासी विकास प्रकल्पाचे प्रकल्प अधिकारी म्हणून दीड वर्ष सेवा बजावली आहे.

## महत्वाचे...

### प्रा.सुहास कुलकर्णी यांना पीएच.डी जाहीर

**सोलापूर, दि.१६ एप्रिल-**



प्रा.सुहास गोविंदराव कुलकर्णी यांना पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर सोलापूर विद्यापीठाची संगणक शास्त्र या विषयातील पीएच.डी पदवी जाहीर करण्यात आली. विद्यापीठातील स्कूल ऑफ कम्प्युटेशनल सायन्सेसचे संचालक डॉ.आर.एस.मेंते यांच्या मार्गदर्शनाखाली त्यांनी 'एन इंटेलिजंट अप्रोच फॉर लिव्हर इमेज सेगमेंटेशन टू डिटेक्ट लिव्हर कॅन्सर' या विषयावर शोधप्रबंध सादर केला. डॉ.ए.आर. शिंदे, डॉ.जे.डी. माशाळे, डॉ.एस.डी. राऊत, डॉ.सी.जी. गार्डी, डॉ.बी. डी. चेंडगे, डॉ.सोमशेखर आळंद, प्रा.सुरेश मंकणी, प्राचार्य डॉ.ओ.एम.अष्टणकर आदींनी त्यांचे अभिनंदन केले.

### बौध्द लेणी व त्यांचे महत्त्व याविषयावर उद्या व्याख्यान

**सोलापूर, दि. १६ एप्रिल-**



जागतिक वारसा दिनानिमित्त इंटॅक सोलापूर चॅप्टर व श्री हिराचंद नेमचंद वाचनालय यांच्या संयुक्त विद्यमाने कै.आनंद कुंभार स्मृती व्याख्यानमालेतंर्गत महाराष्ट्रातील बौध्द लेणी व त्यांचे महत्त्व याविषयावर शनिवार, दि.१८ एप्रिल २०२६ रोजी सायंकाळी ६ वाजता हि.ने.वाचनालय येथे डॉ.मंजिरी भालेराव यांचे व्याख्यानाचे आयोजन करण्यात आले आहे. सोलापुरकरांनी मोठ्या संख्येने उपस्थित रहावे, असे आवाहन इंटॅक सोलापूर चॅप्टरचे समन्वयक प्रा.डॉ.नरेंद्र काटीकर यांनी केले.

### बांधकाम व्यावसायिक आत्महत्येप्रकरणी जागामालक महिलेस अटकपूर्व जामीन

**सोलापूर, दि.१६ एप्रिल-**



जुळे सोलापुरातील बांधकाम व्यावसायिक संतोष सुरवसे यांच्या आत्महत्येप्रकरणी जागामालक पी.डी.कदम यांना सोलापूर येथील सत्र न्यायालयाने अटकपूर्व जामीन मंजूर केला. बांधकाम व्यावसायिक संतोष सुरवसे यांच्या आत्महत्येप्रकरणी दि.११ मार्च २०२६ रोजी फौजदार चावडी पोलिस स्टेशन येथे पी.डी. कदम व अन्य एका व्यक्तीविरुध्द गुन्हा दाखल झाला होता. पी.डी.कदम यांनी सोलापूर येथील जिल्हा व सत्र न्यायालयात अटकपूर्व जामिनाचा अर्ज दाखल केला होता. त्यास सरकारी वकिलांनी तीव्र विरोध केला होता. त्यावर आरोपीचे वकिलांनी केलेला युक्तिवाद ग्राह्य धरुन पी.डी.कदम यांना अटकपूर्व जामीन मंजूर करण्यात आला. सदर कामी अर्जदार श्रीमती पी.डी. कदम तर्फे ॲड.शशि कुलकर्णी, ॲड. देवदत्त बोरगांवकर, ॲड.प्रसाद अग्निहोत्री, ॲड. आदित्य आदोने आणि सरकारतर्फे ॲड.एम.एम. देशपांडे यांनी काम पाहिले.

## महामानव डॉ.आंबेडकर, महात्मा बसवेश्वर जयंती मिरवणुक

# डीजेबरोबर बिम लाईट, प्लाझ्मा व लेझर लाईटलाही बंदी

**तभा वृत्तसेवा**
**सोलापूर, दि. १६ एप्रिल-**

महामानव डॉ.बाबासाहेब आंबेडकर जयंतीनिमित्त २६२ सार्वजनिक मंडळ तर महात्मा बसवेश्वर जयंतीनिमित्त ३८ मंडळ स्थापन झाली आहेत. जयंतीनिमित्त काढण्यात येणाऱ्या मिरवणुकांमध्ये डीजे सिस्टीम व बीम लाईट, प्लाझमा व लेझर लाईटच्या वापरास प्रतिबंध घालण्यात आली आहे.




मिरवणुकीच्या अनुषंगाने डीजे, प्लाझ्मा बीम लाईट व लेझर लाईटचा मोठ्या प्रमाणात वापर केला जातो. यामुळे रस्त्यावरील वाहनचालकांचे डोळे दिपून वाहनांवरील नियंत्रण सुटण्याची शक्यता असून अपघात घडू शकतात. मिरवणूक पाहण्यासाठी आलेल्या लहान मुलांपासून ते ज्येष्ठ नागरिकांपर्यंत सर्वांच्या डोळ्यांना इजा होण्याचा धोका असतो.

ज्येष्ठ नागरिक व विविध सामाजिक संघटनांनी दिलेल्या निवेदनाच्या पार्श्वभूमीवर पोलिस आयुक्त एम.राजकुमार यांनी हा आदेश जारी केला. रविवार, दि.१९ एप्रिल रोजी डॉ.बाबासाहेब आंबेडकर जयंती व महात्मा बसवेश्वर जयंतीनिमित्त मिरवणुका काढण्यात येणार आहे. या आदेशाचे उल्लंघन करणाऱ्यांच्या विरोधात भारतीय न्यायसंहिता २०२३ च्या कलम २३३ नुसार कारवाई करण्यात येईल, असेही स्पष्ट करण्यात आले आहे.

# 'दामिनी' पथकाच्या तत्परतेमुळे महिलेचे वाचले प्राण

**तभा वृत्तसेवा**
**सोलापूर, दि. १६ एप्रिल-**

कंबर तलाव परिसरात एका महिलेने आत्महत्येचा प्रयत्न केल्याची घटना मंगळवारी घडली होती. विभाग २ दामिनी पथकाच्या तत्परतेने संबंधित महिलेचे प्राण वाचले आहेत.



मिळालेल्या माहितीनुसार, विभाग २ दामिनी पथक आपल्या हद्दीत पेट्रोलिंग करत असताना, सकाळी हॉटेल मॅनेजमेंट कॉलेज जवळ एका इसमाने दामिनी पथकाला कंबर तलाव येथे एक महिला आत्महत्येचा प्रयत्न करत असल्याची माहिती दिली. माहिती मिळताच पथकाने तात्काळ घटनास्थळी धाव घेतली. संबंधित महिलेने तलावात उडी मारली होती. दामिनी पथकातील महिला कर्मचाऱ्यांनी धाडस दाखवत तिला पाण्यातून सुरक्षित बाहेर काढले आणि तिचे प्राण वाचवले. चौकशीत पती-पत्नीतील कौटुंबिक वादातून महिलेने हे टोकाचे पाऊल उचलल्याचे समोर आले. पोलिसांनी महिलेचे समुपदेशन करून तिला समज दिली. तिचे पती व आई यांना घटनास्थळी बोलावून महिलेची जबाबदारी त्यांच्या स्वाधीन करण्यात आली. या घटनेमुळे दामिनी पथकाच्या सतर्कतेचे आणि मानवतावादी भूमिकेचे सर्वत्र कौतुक होत आहे.

ही कामगिरी पोलीस उपायुक्त डॉ. अश्विनी पाटील, सहाय्यक पोलीस आयुक्त राजन माने, पोलीस निरीक्षक स्नेहा मेहता तसेच सहाय्यक पोलीस निरीक्षक स्वाती येळे यांच्या मार्गदर्शनाखाली महिला पोलीस जयश्री कोळी, सुनीता जाधव व महिला पोलीस चालक प्रतीक्षा शिंदे यांनी पार पाडली.

# गुन्ह्यांमध्ये वारंवार सहभागी होणाऱ्या तरुणाची कारागृहात रवानगी

**तभा वृत्तसेवा**
**सोलापूर, दि.१६ एप्रिल-**

गुन्ह्यामध्ये वारंवार सहभागी होणाऱ्या एका तरुणाची सोलापूर जिल्हा मध्यवर्ती कारागृहात रवानगी करण्यात आली आहे. साहिल शेख (वय-२२, रा.लक्ष्मीनगर, कल्पनानगर मागे, सोलापूर) असे संबंधित तरुणाचे नाव आहे.




साहिल शेख याच्या विरोधात सन २०२५ व २०२६ या कालावधीत बेकायदेशीर शस्त्र बाळगणे, मारामारी करणे यांसारखे गंभीर गुन्हे एमआयडीसी पोलिस ठाण्यात दाखल झाले आहेत. भारतीय नागरिक सुरक्षा संहिता कलम १२६ अन्वये त्याच्याविरुध्द प्रस्ताव सादर केला होता.

या अनुषंगाने पोलिस उपायुक्त विजय कबाडे यांनी आरोपीकडून सार्वजनिक शांतता राखण्याच्या अटींवर २५ हजार रुपयांचे एक वर्ष मुदतीचे बंधपत्र घेतले होते. मात्र बंधपत्राच्या कालावधीतच त्याच्यावर आणखीन गुन्हा दाखल झाला होता. यावरुन त्याला २५ हजार रुपयांचा दंड भरण्याची नोटीस बजावण्यात आली. तरीपण, त्याने आदेशित दंड भरला नाही तसेच आपले म्हणणे सादर केले नाही. त्यामुळे पोलिसांनी त्याची सोलापूर जिल्हा मध्यवर्ती कारागृहात रवानगी केली आहे.



सोलापूर : श्रीरंग कलाकार फाउंडेशन पुणे आणि पुण्यश्लोक सद्गुरु शिवा पार्वती प्रतिष्ठान, नाशिक या दोन संस्थांच्या वतीने ललित कला भवन, कामगार कल्याण मंडळ सोलापूर रविवार पेठ येथे सुप्रसिद्ध रांगोळीकार प्रा. अक्षय शहापूरकर यांची पोट्रेट रांगोळी आणि गालीचा रांगोळी याची कार्यशाळा घेण्यात आली. यात दोन्ही प्रकारच्या रांगोळीसाठी ५० शिबिरार्थींनी सहभाग नोंदविला. या ६ दिवसीय कार्यशाळेत व्यक्तीचित्र रांगोळीतून कसे साकारले जाते याचे संपूर्ण शिक्षण विद्यार्थ्यांना दिले गेले.

# मराठा साम्राज्याचा नकाशा पुन्हा समाविष्ट करा; जिल्हाधिकारी कार्यालयात पुराव्यासह निवेदन सादर


**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि.१६ एप्रिल-**

इयत्ता आठवीच्या इतिहास पाठ्यपुस्तकातून मराठा साम्राज्याचा भौगोलिक विस्तार दर्शविणारा नकाशा वगळण्याच्या निर्णयाविरोधात शिवसेवक प्रतिष्ठान हिंदुस्थान यांनी सोलापूर जिल्हाधिकारी कार्यालयात अत्यंत ठोस, अभ्यासपूर्ण आणि पुराव्यांनी समर्थित निवेदन सादर केले. संस्थापक अध्यक्ष मारुती सिंधुबाई दिगंबर सुरवसे यांच्या नेतृत्वाखाली हे निवेदन निवासी उपजिल्हाधिकारी अभिजीत पाटील यांना देण्यात आले. यावेळी अभिषेक पवार, स्वप्निल सावळगी आणि ओमसी कोंडा उपस्थित होते.

राष्ट्रीय शैक्षणिक संशोधन आणि प्रशिक्षण परिषद (NCERT) यांनी घेतलेला निर्णय हा केवळ शैक्षणिक त्रुटी नसून इतिहासाच्या मूलभूत तत्त्वांना बाधा आणणारा असल्याचे स्पष्ट करण्यात आले. मराठा साम्राज्याचा इतिहास हा भारताच्या राष्ट्रीय स्वाभिमान, पराक्रम आणि अखिल भारतीय एकतेचा आधारस्तंभ असून, त्याचे अपूर्ण चित्र विद्यार्थ्यांसमोर ठेवणे म्हणजे इतिहासाचे विकृतीकरण असल्याचा गंभीर आरोप करण्यात आला.

छत्रपती शिवाजी महाराजांच्या प्रेरणेने उभारलेले हिंदवी स्वराज्य पुढे छत्रपती शाहू महाराज आणि मराठा सरदारांच्या नेतृत्वाखाली महाराष्ट्रापुरते मर्यादित न राहता संपूर्ण हिंदुस्थानभर विस्तारले. दिल्लीच्या राजकारणावर प्रभाव टाकत उत्तर भारतात सत्ता प्रस्थापित करणे आणि विविध प्रांतांमध्ये आपले वर्चस्व निर्माण करणे, ही मराठा साम्राज्याची ऐतिहासिक वास्तवता आहे. राजस्थानातील जयपूर, जोधपूर, मेवाड, बुंदी यांसारख्या राजपूत संस्थानांशी मराठ्यांचे संबंध, संघर्ष, चौथ आणि सरदेशमुखी (खिराज) यांसारख्या करप्रणालीद्वारे निर्माण झालेला आर्थिक प्रभाव हे सर्व मराठा सत्तेच्या व्यापकतेचे जिवंत उदाहरणे आहेत. मराठ्यांचा प्रभाव हा केवळ लष्करी नव्हता, तर तो राजकीय, आर्थिक आणि प्रशासकीय सर्व स्तरांवर होता.

या निवेदनात नकाशाचे शैक्षणिक महत्त्व विशेषत्वाने अधोरेखित करण्यात आले. नकाशा हा इतिहास शिक्षणातील अत्यावश्यक घटक असून, तो विद्यार्थ्यांना साम्राज्याचा भौगोलिक विस्तार, प्रभावक्षेत्र आणि ऐतिहासिक वास्तव समजून घेण्यासाठी अत्यंत महत्त्वाचा असतो. त्यामुळे नकाशा वगळणे म्हणजे विद्यार्थ्यांसमोर अपूर्ण आणि संकुचित इतिहास मांडणे होय, असेही स्पष्ट करण्यात आले.



# भगवान परशुराम जयंतीनिमित्त बहुभाषिक ब्राम्हण समाज एकवटणार

## जुने विठ्ठल मंदिरात मुर्ती प्रतिष्ठापना

## आर्टिफिशियल हत्तीवरुन मिरवणूक

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि.१६ एप्रिल-**

रविवार, दि.१९ एप्रिल २०२६ रोजी भगवान भगवान परशुराम जयंती आहे. यादिवशी मुर्तीपूजन तर सोमवार, दि.२० एप्रिल २०२६ रोजी शहरातील प्रमुख मार्गावरुन मिरवणूक काढण्यात येणार आहे. यानिमित्ताने महाराष्ट्रसह कर्नाटक, राजस्थान, उत्तर प्रदेश आदी राज्यातील बहुभाषिक ब्राम्हण समाज एकवटणार आहेत, अशी माहिती स्वागत समितीचे अध्यक्ष तथा पंचागकर्ते मोहनराव दाते यांनी पत्रपरिषदेत दिली.

सोलापुरात रहात असलेले पण कर्नाटकातील माध्व सांप्रदायाचे समाजबांधव व राजस्थानी ब्राह्मण समाजबांधवांसह उत्तर प्रदेशातील समाजपबांधव विविध वेशभूषा परिधान करुन या मिरवणुकीत सहभागी होणार आहेत. १०० कलशधारी महिला सहभागी होतील. अखंड विष्णू सहस्त्रनाम पठणही होणार आहे, असेही त्यांनी सांगितले.

भगवान परशुराम जयंतीचे औचित्य साधून भगवान परशुराम जन्मोत्सव समितीच्यावतीने सोमवार दि.२० एप्रिल रोजी आर्टिफिशियल हत्तीवरुन भगवान परशुराम मुर्तीची सोलापूर शहरातील प्रमुख मार्गावरुन मिरवणूक काढण्यात येणार आहे. भगवान परशुराम जयंतीदिनी म्हणजे रविवार, दि.१९ एप्रिल रोजी सायंकाळी ६ वाजता जुने विठ्ठल मंदिर येथे भगवान परशुराम मुर्ती प्रतिष्ठापना व पूजन करण्यात येणार आहे, असे उत्सव समितीचे अध्यक्ष आनंद खंडेलवाल यांनी सांगितले.

मुर्ती प्रतिष्ठापनाप्रसंगी वेद प्रतिष्ठानचे वेदमूर्तीद्वय ऋषिकेश दादेगांवकर, गोविंद गवई आणि त्यांचे सहकारी वेदमंत्रांचे पठण करणार आहेत. सोमवार दि.२० एप्रिल रोजी दुपारी ४ वाजता दत्त चौकापासून मिरवणुकीस प्रारंभ करण्यात येणार आहे. नवी पेठ, मेकॅनिकी चौक, सरस्वती चौक मार्गे चार पुतळा येथे ही मिरवणूक पोहोचणार आहे.

या मिरवणुकीत आर्टिफिशियल हत्तीवरील अंबारीमध्ये भगवान परशुराम यांची मूर्तीसह विविध वेशभुषा परिधान केलेले कलाकार, लेझीम पथक, भजन मंडळ सामील होणार आहे, असेही त्यांनी सांगितले. या पत्रपरिषदेस महिला आघाडीच्या अध्यक्षा अश्विनी जोशी, नितीन कुलकर्णी, रमण कुलकर्णी, राम तडवळकर, प्रा.मोहिनी पतकी, दत्ता आराध्ये, दीपक बाजपेयी, वामन कुलकर्णी उपस्थित होते.

सोलापूर तरुण भारत, सोलापूर येथून प्रकाशित केले.
विभागीय आवृत्ती : धाराशिव, लातूर, सातारा, छत्रपती संभाजीनगर, नांदेड, परभणी, हिंगोली, जालना व बीड, तसेच विजयपूर, कलबुर्गी, बीदर (कर्नाटक) येथून प्रकाशित केले.



## ज्ञानामृत आनंदलहरी - १४१५

**कर्मफळ म्हणुनि इच्छुं नये काम ।
तुका म्हणे वर्म दाऊं लोकां ।।**

प्रत्येक जीवमात्राला कांही ना कांही कर्मही करावीच लागतात. वाटयाला कर्म आले नाही असा व्यक्ती असूच शकत नाही. उठणे-बसणे, खाणे-पिणे, चालणे-बोलणे ही सुध्दा कर्मच आहेत. कांही कर्म ही मानवाकडून आपोआप होतच असतात.अर्थात, त्याला ती करावीच लागतात. पण कांही कर्म ही अशी असतात की, जी माणूस केवळ स्वार्थापोटी करतो. माणूस जेव्हा स्वार्थ, अहंकार, ईर्षा, द्वेष, मत्सरापोटी कर्म करतो, तेव्हा ती इतरांसाठी अपायकारक होतात. अशा कर्मांना संत महात्म्यांनी तसेच भारतीय संस्कृतीने अजिबात मान्यता दिलेली नाही. बऱ्याचवेळा माणूस चांगली कर्मेही करतो. पण जेव्हा तो चांगल्या कर्मात मी ला गुंतवतो तेव्हा अशी चांगली कर्मेही त्याला बाधक ठरतात. वाईट कर्म तर बाधकच असतात, पण चांगल्या कर्मात मी ला स्थान दिल्याने तीही बाधकच होतात. आपल्याकडून होणारे कर्म हे विहितच कर्म व्हावे, त्याचबरोबर कोणत्याही परिस्थितीत ते आपणाला बाधक ठरु नये,



यासाठी मानवाने त्या कर्माचे श्रेय लाटण्याचा प्रयत्न करायला नको. कर्मात मी ला अडकवू नये, त्याचबरोबर त्या कर्माच्या फलाची अपेक्षा करु नये. कर्मात मी ला स्थान देणारा व फळाची अपेक्षा ठेवणारा सुखी राहात नाही. म्हणून निष्काम कर्म करण्याचा सल्ला आम्ही सर्वांना देऊ किंवा निष्काम कर्माचा मार्ग दाखविण्याचा प्रयत्न करु, हे स्पष्ट करतांना तुकाराम महाराज म्हणतात,

**कर्मफळ म्हणुनि इच्छुं नये काम । तुका म्हणे वर्म दाऊं लोकां ।।**

निष्काम कर्म हा श्रीमदभगवद्गीतेचा आधारस्तंभ आहे. हा आधारस्तंभ तुकोबा महाराजांनी अभंगाच्या एका चरणातून स्पष्ट केला आहे. संत महात्म्यांनी कर्मावर भर दिला असला तरीही ते कर्मात मात्र गुंतले नाहीत. कर्मात किंवा कर्माच्या फळात अडकणारा माणूस कळत न कळत ईर्षा, मोह, अहंकार, माया, मत्सर यात अडकतो, याची जाण संतांना होती. म्हणूनच त्यांनी त्यांच्याकडून घडणाऱ्या कर्मापासून मी ला आणि फलाच्या इच्छेला अत्यंत दूर ठेवले. श्री ज्ञानेश्वर माऊलींनीही निष्काम कर्मावरच भर दिला आहे.

**परि कर्मफळीं आस न करावी । आणि कुकर्मी संगति न व्हावी ।
हे सत्क्रियाचि आचरावी । हेतूविण ।।**

कर्मफलाविषयी आसक्ती ठेवू नये. वाईट कर्माचा संबंध येऊ देऊ नये. त्याचबरोबर कोणतेही विहित कर्म कसल्याही प्रकारची आशा, अपेक्षा न ठेवता करावे, असे माऊली म्हणतात. संसारात अडकलेला जीव मात्र, हे मी केले, ते मी केले, मी नसतो तर हे झालेच नसते, मी होतो म्हणूनच ते झाले, वगैरे वगैरे म्हणत असतो. मी आणि फलाच्या अपेक्षेशिवाय कर्म करण्याची वृत्ती माणूस जोपासत नसल्याने तो दु:खी होत आहे आणि इतरांनाही दु:खात लोटत आहे. मी आणि फलाची अपेक्षा टाकून देऊन कर्म करण्याचा संत महात्म्यांचा सल्ला आपण प्रत्यक्ष कृतीत उतरुन पहायला हरकत नसावी. आपली ही कृती आपणाला आनंदच देईल, अर्थात आपल्या आनंदलहरी वाढण्यास मदतीस येईल यांत शंकाच नाही. आपण ठरवले तर कांहीही अवघड नसते. आपण ठरवत नाही, हीच मोठी अडचण असते. जय राम कृष्ण हरी।

- ज्ञानदास डॉ. विजयकुमार फड
मो. ९४२२२१६४४८

## सुप्रभात

### आजचा दिवस

वार : शुक्रवार,
दि. १७ एप्रिल २०२६
विक्रम संवत् २०८३ ।
शके -१९४८
संवत्सर - पराभव
मास - चैत्र अमावस्या
ऋतु - वसंत ।
नक्षत्र- रेवती (१२.०२)
योग - वैभृति (०७.२१)
करण - चतुष्पाद (०६.४९)
राहू काल : शुक्रवार
दु. १०.३० ते १२.००

दिनविशेष :
१४७८: हिंदी कवी, थोर कृष्णभक्त व कीर्तनभक्तीचे आचार्य संत सूरदास यांचा मृत्यू
१८९१: कोशकार यशवंत रामकृष्ण दाते यांचा जन्म.
१९२७: भारताचे ८वे पंतप्रधान चंद्रा शेखर यांचा जन्म
१९५२: पहिली लोकसभा अस्तित्वात आली.
१९७५: भारताचे दुसरे राष्ट्रपती डॉ. सर्वपल्ली राधाकृष्णन यांचे निधन.

# सभापती संस्कृती सातपुते ऑन फील्ड !

## दलितवस्ती विकास कामांचा घेतला आढावा



**तभा वृत्तसेवा,
सोलापूर, दि.१६ एप्रिल-**

सोलापूर जिल्हा परिषदेतील विषय समित्यांच्या सदस्य निवडीनंतर नव्याने नियुक्त झालेल्या पदाधिकाऱ्यांनी प्रशासनाच्या कामकाजाला वेग देण्यास सुरुवात केली आहे. विविध विभागांतील प्रलंबित कामे, विकास योजनांची अंमलबजावणी आणि नागरिकांपर्यंत योजनांचा लाभ पोहोचविण्यासाठी संबंधित विभागांचे पदाधिकारी सक्रिय झाल्याचे चित्र पाहायला मिळत आहे. याच पार्श्वभूमीवर समाज कल्याण विभागाच्या सभापती संस्कृती सातपुते यांनी गुरुवारी समाजकल्याण कार्यालयाला भेट देत दलितवस्ती विकास योजनेंतर्गत सुरू असलेल्या कामांचा सविस्तर आढावा घेतला.

सभापती सातपुते यांनी कार्यालयात पोहोचताच दलितवस्तीच्या विविध विकासकामांशी संबंधित दप्तरांची तपासणी केली. मंजूर झालेली कामे, सुरू असलेली कामे, अपूर्ण प्रकल्प, निधी वितरणाची स्थिती तसेच कामांच्या गुणवत्तेबाबत माहिती घेतली. अनेक गावांमध्ये दलितवस्ती विकास योजनेंतर्गत रस्ते, गटारी, पिण्याच्या पाण्याच्या सुविधा, वीजपुरवठा, समाजमंदिर, स्वच्छता सुविधा आणि इतर मूलभूत गरजांशी संबंधित कामे सुरू आहेत. या कामांची सद्यस्थिती काय आहे, याची माहिती त्यांनी अधिकाऱ्यांकडून जाणून घेतली.

यावेळी समाजकल्याण विभागातील अधिकारी व कर्मचाऱ्यांशी संवाद साधताना त्यांनी प्रलंबित कामे तातडीने पूर्ण करण्याच्या सूचना दिल्या. योजनांचा निधी योग्य ठिकाणी आणि वेळेत खर्च होणे आवश्यक असून, नागरिकांना विकासकामांचा थेट लाभ मिळाला पाहिजे, असे त्यांनी स्पष्ट केले. काही ठिकाणी कामे मंजूर होऊनही प्रत्यक्षात गती नसल्याचे निदर्शनास येत असल्याने अशा प्रकरणांची विशेष नोंद घेऊन तातडीने कार्यवाही करण्यास सांगितले. संस्कृती सातपुते यांनी दलितवस्ती विकास योजना ही समाजातील वंचित घटकांच्या प्रगतीसाठी अत्यंत महत्त्वाची योजना असल्याचे सांगितले. गावपातळीवरील पायाभूत सुविधा मजबूत झाल्यास त्या भागातील नागरिकांचे जीवनमान उंचावण्यास मदत होते. त्यामुळे योजनांच्या अंमलबजावणीत कोणतीही दिरंगाई होऊ नये, यासाठी प्रशासनाने दक्ष राहणे गरजेचे असल्याचे त्यांनी नमूद केले. सोलापूर जिल्हा परिषदेत नव्या पदाधिकाऱ्यांनी पदभार स्वीकारल्यानंतर विविध विभागांच्या कामकाजाचा वेग वाढताना दिसत आहे. समाजकल्याण विभागाच्या माध्यमातून राबविण्यात येणाऱ्या योजना प्रभावीपणे राबविण्यासाठी सातपुते यांनी स्वतः पुढाकार घेतल्याने प्रशासनातही हालचाल निर्माण झाली आहे.


या भेटीदरम्यान कार्यालयीन कामकाजातील अडचणी, मनुष्यबळाची गरज, निधी उपलब्धता आणि विभागीय समन्वय या विषयांवरही चर्चा झाली. आवश्यक तेथे तातडीने निर्णय घेऊन कामे मार्गी लावण्याचा प्रयत्न केला जाईल, असा विश्वास त्यांनी व्यक्त केला.

### दलितवस्ती विकास योजनांना नवसंजीवनी

सभापती सातपुते यांच्या या पाहणीमुळे दलितवस्ती विकास योजनांना नवसंजीवनी मिळेल, अशी अपेक्षा व्यक्त केली जात आहे. विकास कामांमध्ये पारदर्शकता, गती आणि गुणवत्ता राखण्यासाठी अशा प्रत्यक्ष पाहण्या महत्त्वाच्या ठरत असल्याची प्रतिक्रिया नागरिकांमधून व्यक्त होत आहे.

## अमृतवचन : जैन मुनी वीरसागर महाराज

### अंतर्मनातील ‘बालस्व’ ओळखा; आत्मशुद्धीतूनच खरे सुख



आहारदा लहानपणी मनावर झालेल्या जखमा, दडपलेल्या भावना आणि अपूर्ण अपेक्षा या पुढील आयुष्यातील विचार व वर्तनावर परिणाम करतात. त्यामुळे अंतर्मनातील ‘बालस्व’ ओळखून त्याला प्रेम, स्वीकार आणि सुरक्षितता देणे अत्यावश्यक आहे. यालाच ‘इनर चाइल्ड हीलिंग’ म्हणतात, असे प्रतिपादन निर्यापक श्रमण मुनिश्री १०८ वीरसागरजी महाराज यांनी केले.

स्वर्गीय भाऊसाहेब गांधी यांच्या जन्मशताब्दी वर्षानिमित्त वालचंद शिक्षण समूहाच्या वतीने आयोजित ग्रीष्मकालीन वाचन उपक्रमांतर्गत डब्ल्यू. आय. टी. जैन टेंपल येथे ते बोलत होते. त्यांनी जैन तत्त्वज्ञानातील आत्मशुद्धी, स्वावलंबन आणि अंतर्मुखतेचे महत्त्व अधोरेखित केले.

‘कोऽहं?’ या प्रश्नाच्या माध्यमातून त्यांनी आत्मचिंतनावर भर देत सांगितले की, स्वतःची ओळख, क्षमता आणि मर्यादा समजून घेतल्यास आत्मविश्वास वाढतो. इतरांकडून अपेक्षा ठेवण्याऐवजी आत्मस्वीकार आणि स्वावलंबनाचा मार्ग स्वीकारल्यास मानसिक स्थैर्य प्राप्त होते.

मनातील वेदना दडपून न ठेवता त्या व्यक्त करणे गरजेचे आहे. संवादातून भावनांचे शुद्धीकरण झाल्यास मन:शांती मिळते. तसेच १४ वर्षांपर्यंतच्या वयात मुलांना सकारात्मक संस्कार देणे आवश्यक असून, नकारात्मक भाषेचा वापर टाळावा, असे त्यांनी सांगितले.

सकारात्मक विचार आणि चांगल्या भावना मेंदूत नवे चेतामार्ग निर्माण करतात. ‘मी सक्षम आहे’ हा आत्मविश्वास विकसित करणे हीच खरी अंतर्मनाची चिकित्सा असल्याचे त्यांनी नमूद केले.‘अंतोऽस्ति प्रारंभ‘ या सूत्राद्वारे प्रत्येक शेवट ही नव्या सुरुवातीची संधी असल्याचा संदेश त्यांनी दिला.



## महेश सदाफुले यांच्या शुभकामना चित्रप्रदर्शनाचे थाटात उद्घाटन

**तभा वृत्तसेवा,
सोलापूर, दि.१६ एप्रिल-**

झपुर्झा आर्ट गॅलरी डफरिन चौक येथे आयोजित चित्र प्रदर्शनाचे उद्घाटन सोलापूरतील जेष्ठ चित्रकार सुदर्शन देवरकोंढा यांच्या शहस्ते व प्राध्यापक दीपक देशपांडे, शेरशाह डोंगरी,शशिकांत सदाफुले यांच्या उपस्थितीत चित्र प्रदर्शनाचे उद्घाटन झाले.सदर प्रसंगी महेश सदाफुले यांनी रेखाटलेल्या चित्रांचे सर्व पाहुण्यानी कौतुक केले.त्यांचे पेन्सिल माध्यमातून रेखाटलेले सर्व चित्र उल्लेखनीय अशीच आहेत. या प्रदर्शनात शहरातील सर्व चित्रकला शिक्षक कलाप्रेमी उपस्थित होते . प्रदर्शन १५ एप्रिल ते १९ एप्रिल या कालावधीत सर्व नागरिकांसाठी खुले आहे कार्यक्रमास कलाकार पुष्कराज गोरंटला, धर्मराज रामपुरे,अमर कनकी, चंद्रकांत गंजी, संतोष भालेराव, शांताप्पा काळे, आकाश नंदुर, दया पटणे, सिद्धाराम नालवार,मयूर सदाफुले व फैय्याजशेख उपस्थित होते.

# नेहरू वस्तीगृहाचे बांधकाम पाडल्यास आंदोलन उभा करणार

### काँग्रेसचे जिल्हाध्यक्ष सातलिंग शटगार यांचा ईशारा

**तभा वृत्तसेवा,
सोलापूर, दि.१६ एप्रिल-**

शहरातील मध्यवर्ती ठिकाणी असलेले नेहरू वस्तीगृहाचे बांधकाम पाडल्यास आंदोलन उभा करणार असल्याचा ईशारा काँग्रेसचे जिल्हाध्यक्ष सातलिंग शटगार यांनी दिला आहे. तसेसे निवेदन त्यांनी नायब तहसीलदार स्मिता गायकवाड यांना दिले आहे.

यावेळी वरिष्ठ उपाध्यक्ष अँड. अर्जुनराव पाटील, चिदानंद सुंटे, उपाध्यक्ष प्रा.सिद्राम सलवदे, मोतीराम चव्हाण, लक्ष्मण भोसले, सुरेश शिवपूजे, सुदर्शन आवताडे, असलम शेख, अकबर शेख, दत्तात्रय नामकर, आमिर शेख, मौलाली शेख, दत्तात्रय गजबार, विनोद रणसुरे आदी पदाधिकारी उपस्थित होते. नेहरू वसतीगृह काही राजकीय हितचिंतकाच्या नजरेत भरून येत आहे. त्यामुळे ते पाडकाम करून मोठे व्यापारी संकुलन उभारण्याचे स्वप्न पाहत आहेत. अनेक वर्षांपासून ग्रामीण भागातील गोरगरीब विद्यार्थी



शहरात येऊन शिक्षण घेतात त्यांना राहण्यासाठी जागा नसते.अभ्यास करण्यासाठी जागा नसते. असे विद्यार्थी या नेहरु वस्तीगृहाच्या ठिकाणी राहून शिक्षण घेत असतात. व आजपर्यंत अनेक विद्यार्थी येथे राहून शिक्षण घेतलेले आहे. या वस्तीगृहातील अनेक विद्यार्थी देशांमध्ये मोठमोठ्या मुद्द्यावर (पदावर) पोहोचलेले आहेत. आजही या ठिकाणी ग्रामीण भागातील विद्यार्थ्यांचे वास्तव्य मोठ्या प्रमाणात आहे. या वस्तीगृहाचे कोणी पाडकाम करण्याचा प्रयत्न केल्यास देशाचे नेते माजी केंद्रीय गृहमंत्री सुशीलकुमारजी शिंदे व खा. प्रणिती शिंदे यांच्या मार्गदर्शनाखाली जिल्हा काँग्रेस कमिटीच्या वतीने मोठे आंदोलन उभे करण्यात येईल. असा इशारा जिल्हाध्यक्ष सातलिंग शटगार यांनी दिली आहे. यापूर्वी २००७ मध्ये विद्यार्थ्यांना इतर ठिकाणी स्थलांतरित करून वस्तीगृह पाडून तेथे शॉपिंग सेंटर बांधण्याचा डाव होता. तेव्हाही आजी-माजी विद्यार्थी व काही राजकीय पक्षांनी विरोध करून न्यायालयातून स्थगिती मिळवली होती. आजही आम्ही त्या मताशी ठाम असून जर वस्तीगृह पाडण्याचा विचार केलात तर सोलापूर जिल्ह्यातील या वस्तीगृहात शिक्षण घेतलेले आजी-माजी विद्यार्थी, पालक, त्यांच्या कुटुंबियासह शेतकरी बांधवांना घेऊन मोठे आंदोलन उभे करून हा डाव हाणून पडल्याशिवाय राहणार नाही. असा इशारा शटगार यांनी दिला आहे.

## ११ हजाराची खंडणी मागून गुन्हा दाखल करण्याची धमकी

### पाच जणांवर गुन्हा

**तभा वृत्तसेवा,
सोलापूर, दि.१६ एप्रिल-**

तुम्ही जमिनीचे खूप काळे व्यवहार केले आहात. त्या पोटी मला ११ हजार रुपये द्या अन्यथा तुमच्याविरुद्ध खोटे गुन्हे दाखल करून जेलमध्ये टाकतो, अशी धमकी दिल्याप्रकरणी पाच जणांविरुद्ध एमआयडीसी पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे. विकी सोनवणे व त्याचे सोबत ४ ते ५ मित्र अशी गुन्हा दाखल करण्यात आलेल्या आरोपींची नावे असून याबाबत रविकांत राचप्पा किणगी (वय-४५ वर्षे, रा-३ बसव प्रसाद पार्क, यशराज नगर शेजारी सोलापूर ) यांनी फिर्याद दिली आहे. यातील अरोपीने १४ एप्रिल रोजी रात्री फिर्यादीच्या मित्राचे फोनवरून फोन करून फिर्यादीस तुम्ही खुप काळे जागेचे व्यवहार केले आहेत. त्यापोटी मला ११ हजार रुपये दया, नाहीतर मी तुमच्याविरूध्द खोटे गुन्हे दाखल करून तुम्हाला जेल मध्ये टाकतो. त्यानंतर थोड्याच वेळात फिर्यादीचे घरासमोर त्याचे ४ ते ५ मित्रासोबत येवून जर तुम्ही पैसे दिले नाही तर तुमच्यावर खोटे गुन्हे दाखल करतो असे म्हणून आरडाओरडा केली. त्यानंतर फिर्यादीची पत्नी व मुलगा बाल्कणीत येवून बोलत असताना त्यांना सुध्दा मारहाण करून धमकी दिल्याचे फिर्यादीत म्हटले आहे. सहाय्यक पोलीस निरीक्षक केंद्रे या तपास करीत आहेत.



## इंडियन मॉडेल स्कूलचा दहावी परीक्षेत सलग १४व्या वर्षी 100% निकाल

### ८० विद्यार्थ्यांनी मिळवले ९०% पेक्षा जास्त गुण

**तभा वृत्तसेवा,
सोलापूर, दि.१६ एप्रिल-**

दरवर्षीप्रमाणेच या वर्षीसुध्दा इंडियन मॉडेल स्कूलने यशाची परंपरा कायम राखली आहे. फेब्रु.-मार्च २०२६ मध्ये घेण्यात आलेल्या इ.१० वी सी.बी.एस.ई. बोर्डाच्या परीक्षेचा इंडियन मॉडेल स्कूलचा निकाल १००% लागला आहे. इ.१० वीची ही १४ वी बॅच होती. या शाळेने १००% निकालाचे सातत्य सलग १४ वर्षे राखले आहे.

यावर्षी एकूण १८४ विद्यार्थी दहावीच्या परीक्षेला बसले होते. त्यापैकी ८० विद्यार्थ्यांना ९०% पेक्षा जास्त गुण मिळाले आहेत. तर ०७ विद्यार्थ्यांनी ८९.००% एवढे गुण मिळवले आहेत. अपूर्वा कोरे ही विद्यार्थिनी ९८.६०% घेऊन शाळेत प्रथम आलेली आहे.

श्रीजा जोगदंड ही ९८.००% घेऊन शाळेतून दुसरी आलेली आहे. तर संस्कृती देशमुख व राजवीर साहू हे विद्यार्थी ९७.४०% घेऊन शाळेत तृतीय आलेले आहे. संस्कृती जाधव ९७.२०% घेऊन प्रशालेतून चतुर्थ आलेली आहे तर ईशा भोसले ९७.००% गुण घेऊन प्रशालेतून पाचवी आलेली आहे.

इंग्लिश या विषयात प्रज्ञेशा कवचाळे हीने १०० पैकी १०० गुण मिळवले आहेत. मराठी या विषयात ईशा भोसले, संस्कृती साठे, समृध्दी आदलिंगे, धैर्य गोरे, समृध्दी जगताप या विद्यार्थ्यांनी १०० पैकी १०० गुण मिळवले आहेत.

सोशल सायन्स या विषयात सिमरन बलदवा या विद्यार्थिनीने १०० पैकी १०० गुण मिळवले आहेत. विज्ञान या विषयामध्येप्रतिथ काळे व रतन देशपांडे या विद्यार्थ्यांनी १०० पैकी ९९ गुण मिळवले आहेत.

हिंदी या विषयात श्रीजा जोगदंड या विद्यार्थिनीने १०० पैकी ९९ गुण मिळवले आहेत. गणित या विषयामध्ये अपूर्वा कोरे हीने १०० पैकी ९८ गुण प्राप्त केले आहे. या शिवाय ०७ विद्यार्थ्यांनी ८९% मिळवत यश प्राप्त केलेले आहे.

सर्व यशस्वी विद्यार्थ्यांचे इंडियन मॉडेल स्कूलचे अध्यक्ष प्रा. ए. डी. जोशी, सचिव अमोल जोशी, सचिवा सायली जोशी, मुख्याध्यापिका अपर्णा कुलकर्णी, समन्वयक ममता बसंवती, अचला राचर्ला, सुजाता बुट्टे, आदिती कुलकर्णी, मानसी जोशी, रुही काझी व सर्व शिक्षकांनी अभिनंदन केले. सर्व यशस्वी विद्यार्थ्यांना शाळेतील तज्ञ शिक्षकांचे मार्गदर्शन लाभले.

## संवेद २०२६ ठरणार स्मार्ट गव्हर्नन्सचा टर्निंग पॉइंट

### हॅकाथॉनमधून ‘कल्पनेतून कृतीकडे’ शहर विकासाची नवी ब्लूप्रिंट

सोलापूर सोलापूर शहराच्या नागरी विकासाच्या प्रवासात ‘संवेद २०२६’ हा स्मार्ट गव्हर्नन्स हॅकाथॉन केवळ एक स्पर्धा नसून, धोरणात्मक परिवर्तनाचा नवा अध्याय ठरत आहे. महापालिका आणि एमआयटी विश्वप्रयाग विद्यापीठ यांच्या संयुक्त पुढाकारातून साकारलेला हा उपक्रम सध्याच्या हायटेक युगात शहर विकासाच्या दृष्टीने एक अभिनव प्रयोग म्हणून पुढे येत आहे.

आजपर्यंत नागरी समस्यांवर उपाय शोधण्याची जबाबदारी मुख्यतः प्रशासन आणि निवडून आलेल्या प्रतिनिधींवर केंद्रित होती. मात्र ‘संवेद २०२६’ ने या चौकटीबाहेर जाऊन देशभरातील तरुण मेंदूंना-विशेषतः तंत्रज्ञान क्षेत्रातील विद्यार्थ्यांना शहराच्या समस्यांशी थेट जोडण्याचा प्रयत्न केला. हीच या उपक्रमाची खरी ताकद आहे. कारण वाहतूक व्यवस्थापन, पाणीपुरवठा, स्वच्छता, रस्त्यांची गुणवत्ता किंवा सार्वजनिक आरोग्य यांसारख्या गुंतागुंतीच्या समस्यांवर पारंपरिक उपायांपेक्षा नवतंत्रज्ञानाधारित, डेटा-आधारित आणि व्यवहार्य उपायांची गरज वाढत आहे.

महापौर विनायक कोंडयाल आणि आयुक्त डॉ. सचिन ओंबासे यांनी व्यक्त केलेली अंमलबजावणीची भूमिका विशेष महत्त्वाची ठरते. महापौर विनायक कोंडयाल, महापालिका आयुक्त डॉ. सचिन ओम्बासे, उपायुक्त आशिष लोकरे , तपन डंके, प्रकाश दिवाणजी, आणि एमआयटी विश्वप्रयाग विद्यापीठाचे कुलगुरू प्रा. गोपाळकृष्ण जोशी, संचालक राघवेंद्र एम. चाटे , प्रा. कृष्णा वेदुला, कुलसचिव प्राणेश मुरनाळ, डॉ. प्रभा कासलीवाल, डॉ. दर्शन रुईकर, डॉ. आनंद शिंपी यांच्या प्रयत्नातून ही स्पर्धा यशस्वी झाली आहे.

अनेकदा अशा स्पर्धा केवळ सादरीकरणापुरत्याच मर्यादित राहतात. मात्र येथे पुढील सहा महिने ते एक वर्ष या कालावधीत निवडक कल्पनांना प्रत्यक्ष प्रकल्पांमध्ये रूपांतर करण्याची तयारी दर्शवण्यात आली आहे. यामुळे हा उपक्रम ‘कल्पनेतून कृतीकडे’ जाणारा प्रभावी मॉडेल ठरू शकतो. याशिवाय विद्यार्थ्यांना इंटर्नशिपची संधी देण्याचा निर्णय हा ‘स्किल डेव्हलपमेंट’ आणि ‘सिटी डेव्हलपमेंट’ यांचा संगम घडवणारा आहे. शहराच्या समस्या समजून घेताना विद्यार्थ्यांना प्रत्यक्ष प्रशासनाशी काम करण्याचा अनुभव मिळेल, तर महापालिकेला नव्या पिढीचे तांत्रिक कौशल्य लाभेल. ही दोन्ही बाजूंनी जिंकणारी परिस्थिती आहे. ‘संवेद २०२६’ चे आणखी एक महत्त्वाचे वैशिष्ट्य म्हणजे आंतरशाखीय सहभाग. केवळ अभियांत्रिकी नव्हे, तर विविध शाखांतील विद्यार्थ्यांनी एकत्र येऊन समस्यांकडे बहुआयामी दृष्टिकोनातून पाहण्याचा प्रयत्न केला. भविष्यातील स्मार्ट सिटी संकल्पना याच बहुआयामी विचारांवर आधारित असणार आहे. या उपक्रमातून शासन, शिक्षण आणि उद्योग यांच्यातील समन्वयाचे एक प्रभावी उदाहरण उभे राहिले आहे. विशेषतः चरींहथेीज्ञी सारख्या तज्ज्ञ संस्थांच्या सहभागामुळे विद्यार्थ्यांना जागतिक दर्जाचे तांत्रिक मार्गदर्शन मिळाले, जे स्थानिक समस्यांसाठी जागतिक उपाय शोधण्याच्या दिशेने महत्त्वाचे पाऊल आहे.सोलापूर महापालिका-एमआयटीचा संयुक्त हायटेक प्रयोग संवेद २०२६ हा स्मार्ट गव्हर्नन्सचा टर्निंग पॉइंट ठरणार आहे. हॅकाथॉनमधून सोलापूर शहर विकासाचा नवा ब्लूप्रिंट मिळणार आहे. नागरी समस्यांवर व्यवहार्य उपायांची अंम




किरण बनसोडे
मो. ९८२२६१६१४१

लबजावणीकडे निर्णायक पाऊल उचलले आले. विद्यार्थ्यांच्या तंत्रज्ञानाधारित उपायांवर महापालिकेचा विश्वास; ‘कल्पनेतून कृतीकडे’ वाटचाल आशावादी ठरणार आहे.शासन, शिक्षण आणि उद्योग यांचा संगम हा सोलापूरसाठी शाश्वत विकासाचा नवा मार्ग खुला केला जाणार आहे. ‘संवेद २०२६’ हा सोलापूरसारख्या वाढत्या शहरासाठी केवळ स्पर्धा नसून ‘स्मार्ट गव्हर्नन्स’चा प्रयोगशाळा ठरत आहे. या प्रयोगातून जर काही निवडक प्रकल्प यशस्वीपणे राबवले गेले, तर सोलापूर देशातील इतर महानगरपालिकांसाठी एक आदर्श मॉडेल ठरू शकतो. आता खरी परीक्षा आहे ती अंमलबजावणीची. कल्पना कितीही उत्कृष्ट असल्या, तरी त्यांना प्रत्यक्षात उतरवण्यासाठी सातत्य, निधी, आणि प्रशासनिक इच्छाशक्ती आवश्यक असते. जर महापालिकेने या दिशेने ठोस पावले उचलली, तर ‘संवेद २०२६’ हा उपक्रम शहराच्या विकासाला केवळ नवी दिशा देणार नाही, तर नागरिकांच्या जीवनमानातही ठोस बदल घडवू शकतो.

सोलापूरसाठी हा एक सकारात्मक संकेत आहे. जिथे प्रशासन आणि तरुणाई एकत्र येऊन ‘स्मार्ट’ नव्हे, तर ‘समर्थ’ शहर उभारण्याचा प्रयत्न करत आहेत.

CMYK
सोलापूर तरुण भारत, सोलापूर येथून प्रकाशित केले.
विभागीय आवृत्ती : धाराशिव, लातूर, सातारा,
छत्रपती संभाजीनगर, नांदेड, परभणी, हिंगोली,
जालना व बीड, तसेच विजयपूर, कलबुर्गी, बीदर
(कर्नाटक) येथून प्रकाशित केले.



## डॉ.आंबेडकरांना अभिवादन...



### जि. प. शाळा अंत्रोळी

**सोलापूर :** जि.प. शाळा अंत्रोळी येथे विश्वरत्न, विश्वभूषण, महामानव, परमपूज्य, बोधिसत्व,भारतीय राज्यघटनेचे शिल्पकार,डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या १३५व्या जयंतीनिमित्त अभिवादन करण्यात आले. याप्रसंगी विद्यार्थी व शिक्षक श्रीरंग बनसोडे सर व कीर्ती जाधव मॅडम यांनी बाबासाहेबांबद्दल कार्याची माहिती विद्यार्थ्यांना सांगत यांनी डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या कार्याचा गुणगौरव आपल्या भाषणातून व्यक्त केला. तसेच विविध गुणदर्शनच्या कार्यक्रम, भीम गीते, व नृत्यविष्कार विद्यार्थ्यांनी याप्रसंगी सादर केले. याप्रसंगी शाळेचे मुख्याध्यापक युवराज राठोड, श्रीरंग बनसोडे, नागनाथ म्हमाने, कीर्ती जाधव, मीनाक्षी राठोड, पुष्पा बनसोडे, तसेच डॉ. बाबासाहेब आंबेडकर जयंती उत्सव मंडळ अंत्रोळी चे सर्व पदाधिकारी शालेय व्यवस्थापन समितीचे अध्यक्ष श्रीकांत कोकरे, सदस्य विक्रम जाधव,विद्यार्थी, पालक बहुसंख्येने उपस्थित होते. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन नागनाथ म्हमाने सर आभार प्रदर्शन मीनाक्षी राठोड यांनी केले.



### एकता महिला मंच, झाडी

**वैराग :** बार्शी तालुक्यातील झाडी येथे भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांची जयंती 'एकता महिला मंच' च्या वतीने अत्यंत उत्साहात आणि चैतन्यमय वातावरणात साजरी करण्यात आली. गावातील महिलांनी एकत्र येत सामाजिक ऐक्याचा संदेश देत हा उत्सव साजरा केला. कार्यक्रमाची सुरुवात डॉ. आंबेडकर यांच्या प्रतिमेला पुष्पहार अर्पण करून आणि अभिवादन करून करण्यात आली. यावेळी उपस्थित महिलांनी डॉ. बाबासाहेबांच्या विचारांचे स्मरण केले. एकता महिला मंचच्या सदस्यांनी या जयंती उत्सवासाठी विशेष पुढाकार घेतला होता. एकता महिला मंचच्या आशा चव्हाण, कोमल वाघमारे, सरोजा मते, स्वाती मते, संध्या सरवदे, प्रतीक्षा सांगुळे महिलांचा पुढाकार केवळ सण-उत्सवच नव्हे, तर सामाजिक बांधिलकी जपण्याच्या उद्देशाने एकता महिला मंचने या जयंतीचे नियोजन केले होते. डॉ. बाबासाहेबांनी महिलांना शिक्षणाचा आणि सन्मानाचा अधिकार दिला, त्यामुळे त्यांची जयंती साजरी करणे हे आमचे कर्तव्य आहे अशा भावना यावेळी आयोजकांनी व्यक्त केल्या. सर्वांनी भीमगीतांच्या जयघोषात आणि उत्साही वातावरणात ही जयंती साजरी करून एकमेकांना शुभेच्छा दिल्या.



### बी.बी. दारफळ महावितरण उपकेंद्र

**वैराग :** भारतीय राज्यघटनेचे शिल्पकार, भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या १३५ व्या जयंतीनिमित्त महावितरणच्या सोलापूर ग्रामीण उपविभाग-१ अंतर्गत येणाऱ्या कारंबा शाखा कार्यालयातील ३३/११ केव्ही बी.बी. दारफळ उपकेंद्रामध्ये अभिवादन कार्यक्रम उत्साहात संपन्न झाला. कार्यक्रमाच्या सुरुवातीला महामानव डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या प्रतिमेचे पूजन करण्यात आले. यावेळी उपस्थितांनी बाबासाहेबांच्या कार्याचे स्मरण करत त्यांना विनम्र अभिवादन केले. महावितरणच्या कर्मचाऱ्यांनी सामाजिक बांधिलकी जपत दरवर्षीप्रमाणे यंदाही हा जयंती उत्सव साजरा केला. याप्रसंगी महावितरणचे विजय अडसूळ (प्रधान तंत्रज्ञ, शाखा कार्यालय कारंबा), भैरवनाथ मासाळ (प्रधान यंत्र चालक, बी.बी. दारफळ उपकेंद्र), बाळासाहेब ननवरे (यंत्रचालक, औद्योगिक वसाहत उपकेंद्र), बाळासाहेब ओव्हाळ (विद्युत सहाय्यक), नारायण सर्वगोड व अभिमान धुमाळ (बाह्यस्रोत तंत्रज्ञ), ऋतुराज पाटील व ओंकार बंदपट्टे (प्रशिक्षणार्थी) यांच्यासह इतर कर्मचाऱ्यांनी कार्यक्रमाच्या यशस्वीतेसाठी परिश्रम घेतले. डॉ. बाबासाहेब आंबेडकरांचे विचार आचरणात आणण्याचा संकल्प करत या कार्यक्रमाची सांगता करण्यात आली.



### यशवंतराव चव्हाण सभागृह अद्यावत करावे

**महाराष्ट्र राज्य व्यावसायिक नाट्य निर्माता संघाचे नगराध्यक्षांना निवेदन**

**बार्शी, दि. १६ एप्रिल-**

बार्शी शहरातील यशवंतराव चव्हाण नाट्यगृह अध्ययवत करावे, अशा मागणीचे निवेदन नगराध्यक्ष तेजस्विनी कथले यांच्याकडे महाराष्ट्र राज्य व्यावसायिक नाट्य निर्माता संघाचे सदस्य व दिशा थिएटर्सचे निर्माते दीपक नलावडे, नीता देव, सूर्यकांत वायकर, पत्रकार सचिन अपसिंगकर, जयंत हिंगमिरे यांनी दिले. हे निवेदन उपनगराध्यक्ष रोहित पाटील, मुख्याधिकारी तैमूर मुलाणी, भाजपाचे नगरसेवक नाना राऊत, ठाकरे सेनेचे गटनेते नागेश अक्कलकोटे यांनाही देण्यात आले. या निवेदनामध्ये या नाट्यगृहाची साऊंड सिस्टीम सुधारण्यात यावी, नाट्यगृहाची आसन क्षमता वाढविण्यात यावी, नाट्यगृहामध्ये स्त्री व पुरुष कलावंतांसाठी दोन स्वतंत्र ड्रेसिंग रुमची व्यवस्था करण्यात यावी, तसेच महत्त्वाच्या व्यक्तींसाठी स्वतंत्र विश्राम कक्षाची उभारणी करण्यात यावी, कलावंत व प्रेक्षकांसाठी स्त्री-पुरुषांसाठी स्वतंत्र स्वच्छतागृहे बांधण्यात यावी, या नाट्यगृहाशेजारी उपहारगृह तसेच पार्किंगची स्वतंत्र व्यवस्था करण्यात यावी, नाट्यगृह परिसरामध्ये नाटकांच्या जाहिरातीसाठी स्क्रीनची व्यवस्था करण्यात यावी.अशा विविध मागण्या करण्यात आले आहेत. यावेळी नगराध्यक्षा कथले यांनी या मागण्यांना सकारात्मक प्रतिसाद देत लवकरच या सुधारणा करण्यात येतील असे सांगितले.

# महिला सदस्यांचे पती व पुत्रांकडून ग्रामपंचायत कामकाजात हस्तक्षेप

### मंद्रूपमध्ये महिला सदस्यांना दुय्यम वागणूक

**तभा वृत्तसेवा,**
**दक्षिण सोलापूर, दि.१५ एप्रिल**

मंद्रूप ग्रामपंचायतमध्ये महिला सरपंच असताना व सहा वॉर्डामधून निवडून आलेल्या नऊ महिला सदस्यांना दुय्यम वागणूक मिळत आहे. महिला सरपंचांच्या उपस्थित महिला सदस्यांचे पती व पुत्र ग्रामपंचायत कारभारामध्ये हस्तक्षेप करीत असल्यामुळे नागरिकांमधून टीका होत आहे. महिला सरपंच असताना सर्व महिला सदस्यांना सोबत घेऊन गावच्या विकासासाठी निर्णय घेणे अपेक्षित आहे. मात्र महिला सदस्यांची पती व त्यांचे पुत्र कारभार करीत असल्यामुळे वॉर्डाच्या विकास कामावर परीणाम होत आहे. त्यामुळे वरिष्ठ अधिकारी व पॅनलप्रमुखांनी महिला सदस्यांना 'ॲक्टिव्ह' करून पती व पुत्रांचे हस्तक्षेप थांबविण्याची मागणी पुढे येत आहे.




एकीकडे महिला सशक्तिकरणासाठी व त्यांना आरक्षण देण्यासाठी केंद्र सरकार कायदा करीत आहे. मात्र, मंद्रूप ग्रामपंचायतमध्ये निम्याहून अधिक ग्रामपंचायत सदस्य महिला असताना ग्रामपंचायत कारभारात त्यांचा सहभाग दिसून येत नाही. दुसरीकडे त्यांचे पती व पुत्र कामकाजात हस्तक्षेप करत आहेत. त्यामुळे वॉर्डाच्या विकास कामात व्यत्यय येत आहे. पती व पुत्राच्या मनमानी कारभारामुळे अनेक वॉर्डात विकास कामांमध्ये भ्रष्टाचार होत आहे. त्यामुळे वरिष्ठ अधिकारी व पॅनल प्रमुखांनी महिला सदस्यांना ग्रामपंचायत कारभारात सहभागी होण्यासाठी परावृत्त करावे. तसेच हस्तक्षेप करणाऱ्या पती व पुत्रांवर कारवाई करावी, अशी नागरिकांमधून मागणी आहे.

#### पती व पुत्रांकडून ठेकेदारी

मंद्रूपमधील अनेक वॉर्डात महिला सदस्यांचे पती व त्यांचे पुत्र यांच्याकडून विकासाच्या नावाखाली ठेकेदारी सुरू आहे. अधिकार्यांना 'मॅनेज' करून विकासकामांचे बिल काढण्यासाठी खटाटोप सुरू असल्याचे सांगण्यात येत आहे. यामुळे सत्ताधारी व विरोधी गटाच्या सदस्यांना खुष ठेवण्यासाठी पॅनलप्रमुख महिला सदस्यांच्या अनुपस्थितीकडे जाणिवपूर्वक दुर्लक्ष करीत असल्याची चर्चा सुरू आहे.

#### नागरीकांना बंदी का ?

मंद्रूप ग्रामपंचायतमध्ये महिला सरपंच कामकाज करीत असताना महिला सदस्य ॲक्टीव्ह असणे गरजेचे आहे. त्यांचे पती व पुत्र कारभारात हस्तक्षेप करणे नियमबाह्य आहे. महिला सदस्यांच्या पती व पुत्रांना मासिक बैठकीसह इतर निर्णय प्रक्रियेमध्ये सहभागी करून घेता. मग नागरीकांना मासिक बैठकीत व निर्णयाप्रक्रियेत बंदी का आणता? महिला सदस्यांचे पती व पुत्रही नागरीकच आहेत. यामुळे मंद्रूपमध्ये महिला ग्रामपंचायत सदस्यांना दुय्यम वागणूक मिळत आहे.

**-श्रीमंत पवार, नागरीक सेवालाल नगर, मंद्रूप**




## पंढरीत भर उन्हातही रक्तदान शिबिरास उत्स्फूर्त प्रतिसाद

**भीमजयंती निमित्त बुद्धभूमी निर्माण कृती समितीचा उपक्रम**

**तभा वृत्तसेवा,**
**पंढरपूर, दि.१६ एप्रिल -**

विश्वभूषण डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या १३५ व्या जयंतीनिमित्त नगरपरिषद प्रस्तावित बुद्धभूमी निर्माण कृती समितीच्या वतीने रक्तदान शिबिराचे आयोजन बुधवारी (दि.१५ ) विश्वभूषण डॉ. बाबासाहेब आंबेडकर स्मारक पंढरपूर येथे बुद्धभूमी निर्माण कृती समितीचे कार्याध्यक्ष दीपक चंदनशिवे यांच्या संकल्पनेतून करण्यात आले होते.

या शिबिराचे उद्घाटन आरपीआयचे ज्येष्ठ नेते बाळासाहेब कसबे, भाजपा तालुकाध्यक्ष प्रा. सुभाष मस्के यांच्या हस्ते करण्यात आले. या रक्तदान शिबिरात ५२ रक्तदात्यांनी भर उन्हाची तीव्रता असतानाही रक्तदान करून बाबासाहेबांना अभिवादन केले. या रक्तदान शिबिराला सामाजिक कार्यकर्ते आणि भीमसैनिकांचा उत्स्फूर्त प्रतिसाद मिळाला. रक्तदान शिबिरात सहभागी झालेल्या भीमसैनिकांना डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांची चांदीची प्रतिमा भेट देऊन सन्मान करण्यात आला. याप्रसंगी बुद्धभूमी निर्माण कृती समितीचे रवींद्र शेवडे, अमित कसबे, स्वप्निल गायकवाड, महेश मोटे, विशाल मांदळे, योगेश जाधव, लियाकत मुलानी, अजिंक्य ओव्हाळ, राहुल जाधव, दिगंबर करपे, बुद्धभूषण चंदनशिवे, धनराज शेवाळे, समाधान लोखंडे आदी उपस्थित होते.

## माळेगावात डॉ. आंबेडकर जयंतीनिमित्त सांस्कृतिक कार्यक्रम उत्साहात

**तभा वृत्तसेवा,**
**कन्हेरगांव दि. १६ एप्रिल-**



माळेगांव तालुका माढा येथील लोंढे वस्ती जिल्हा परिषद प्राथमिक शाळेत डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या १३५ व्या जयंतीनिमित्त १४ एप्रिल २०२६ रोजी विद्यार्थ्यांचा सांस्कृतिक कार्यक्रम मोठ्या उत्साहात पार पडला.

या कार्यक्रमात इयत्ता पहिली ते चौथीच्या विद्यार्थ्यांसह माजी विद्यार्थ्यांनी विविध कलागुणांचे सादरीकरण केले. शेतकरी नृत्य, लावणी, कोळीगीत, रिमिक्स गीते तसेच एकांकिका यांद्वारे विद्यार्थ्यांनी प्रेक्षकांची मने जिंकली. कार्यक्रमात विद्यार्थ्यांचा उत्स्फूर्त सहभाग पाहायला मिळाला.अध्यक्षस्थानी बबन किर्ते होते, तर प्रमुख पाहुण्या म्हणून सोलापूर जिल्हा परिषदेच्या सदस्य सविता कोकाटे उपस्थित होत्या. यावेळी बोलताना जिल्हा परिषद सदस्या सविता कोकाटे यांनी विद्यार्थ्यांना गुणवत्ताविकासावर भर देत उज्वल भवितव्य घडविण्याचा संदेश दिला.

कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी मुख्याध्यापिका श्वेता मस्के, शाळा व्यवस्थापन समिती अध्यक्ष अमोल लोंढे, उपाध्यक्ष अमोल खरात, सर्व सदस्य, ग्रामस्थ, शिक्षणप्रेमी तसेच भीम जयंती कमिटीचे अध्यक्ष सुदर्शन लोंढे व सदस्य, माजी विद्यार्थी यांनी सहकार्य केले. सूत्रसंचालन सुप्रिया लोंढे, हिम्मत किर्ते यांनी तर आभार सहशिक्षक जोगदंड यांनी मानले.

## विधानसभेच्या वाढणाऱ्या जागांमुळे बार्शी तालुक्यात काँग्रेसला अनुकूलता

### ॲड. जीवनदत्त आरगडे यांचे मत

**तभा वृत्तसेवा**
**बार्शी, दि. १६ एप्रिल-**



बार्शी तालुका हा पूर्वी काँग्रेस विचारांचा तर सद्यस्थितीत भाजपविरोधी मतांचा आहे, असे मत अखिल भारतीय किसान काँग्रेसचे सहसंयोजक ॲड. जीवनदत्त आरगडे यांनी व्यक्त केले.

अखिल भारतीय काँग्रेस कमिटीच्या निर्देशानुसार बार्शी शहर व तालुका काँग्रेस कमिटीच्यावतीने 'संघटन सृजन अभियान' कार्यक्रमप्रसंगी ते बोलत होते. यावेळी आयसीसीचे निरीक्षक देबासिस पटनायक, महाराष्ट्र प्रदेश काँग्रेस कमिटीचे सचिव तथा निरीक्षक प्रा. यशराज पारखी, ॲड.भाऊसाहेब आजबे सोलापूर जिल्हा काँग्रेस कमिटीचे अध्यक्ष सातलिंग शटगार, बार्शी तालुका काँग्रेस कमिटीचे कार्याध्यक्ष रणधीर गायकवाड, जिल्हा उपाध्यक्ष दत्ताजी गाढवे, वरिष्ठ उपाध्यक्ष तानाजीराव जगदाळे, ओबीसी शहराध्यक्ष विजयसिंह ठाकूर, निलेश मांजरे पाटील, ईश्वर व्हनकळस आदी उपस्थित होते.

ॲड. आरगडे म्हणाले, २००४ विधानसभा निवडणुकीचा अपवाद वगळता बार्शी विधानसभा मतदार संघात भाजप विचाराना अनुकूलता नाही. २०१४ मध्ये राष्ट्रीय आणि राज्य स्तरावर मोदी लाट असतानाही बार्शीकर जनतेने मोदी यांच्या नेतृत्वावर शिक्कामोर्तब केल्याचे दिसंत नाही. २०१४ च्या मोदी लाटेत सुद्धा बार्शी तालुक्यात काँग्रेसच्या विचारांचाच उमेदवार निवडून आला. बार्शी तालुक्यातून दोन्ही राष्ट्रवादी काँग्रेस नेतृत्वहीन आणि दिशाहीन झाल्याने सक्रिय दिसत नाही. आगामी काळात नव्या नेतृत्वाला जन्माला घालण्यासाठी काँग्रेस पक्षाने संघटनात्मक उपक्रम वाढविण्यावर भर द्यायला पाहिजे. त्यामुळे काँग्रेस पक्षाने आगामी निवडणुकात ही जागा काँग्रेस पक्षाला मागावी तसेच विधानसभेच्या जागा वाढणार असल्याने आता काँग्रेस पक्षासाठी आणखी अनुकूलता वाढणार आहे.

## सांगोला चांगलेच तापले

**तभा वृत्तसेवा,**
**सांगोला,दि.१६ एप्रिल -**




नुकत्याच झालेल्या नगरपरिषद, जिल्हा परिषद व पंचायत समिती निवडणुकीसाठी तापलेले राजकीय वातावरण शांत झालेले असताना आता मात्र नैसर्गिक रित्या उन्हामुळे सांगोला तालुक्यात वातावरण चांगलेच तापले असून दुपारच्या वेळी अंगाची लाहीलाही होत आहे. अशा वाढत्या उन्हात स्वतःला हायड्रेट ठेवण्यासाठी आणि थंडावा मिळवण्यासाठी नागरिकांनी आता नैसर्गिक पेयांकडे आपला मोर्चा वळवला आहे. विशेषतः उसाच्या रसाला मोठी मागणी वाढली असून रसवंतीगृहे ग्राहकांच्या गर्दीने फुलून गेली आहेत.

सध्या एप्रिल महिन्यात तापमानाचा पारा वाढल्याने नागरिक त्रस्त झाले आहेत. उसाचा रस हा अधिक आरोग्यदायी आणि स्वस्त पर्याय असल्याने लहानांपासून थोरांपर्यंत सर्वजण याला पसंती देत आहेत. सांगोल्यात शहरी भागासह ग्रामीण भागातील रस्त्यांच्या कडेला असलेल्या रसवंतीगृहांवर दुपारी ११ ते ५ या वेळेत मोठी वर्दळ पाहायला मिळत आहे. गेल्या दोन वर्षांच्या तुलनेत यंदा उन्हाळा अधिक तीव्र असल्याने रसवंती चालकांचा व्यवसाय तेजीत आहे.

उसाचा रस हे उर्जादायी नैसर्गिक व उन्हाळ्यात शरीर थंड करण्यासाठी एक उत्तम पेय आहे. त्यामुळे ऊन्हामुळे आलेला अशक्तपणा दूर होतो तसेच शरीरातील पाण्याची पातळी संतुलित राहते. पचनास मदत करते. त्वचेसाठी फायदेशीर आहे. रोग प्रतिकारक शक्ती वाढते. कावीळ आजारावर उपायकारक असून त्वरीत ऊर्जा प्रदान करते. हे उसाच्या रसाचे फायदे असल्यामुळे नागरिक याला पसंती देत असते

#### ताज्या उसाच्या रसाला मागणी

सध्या उसाचा रस लहान ग्लास वीस रुपये व मोठा ग्लास पंचवीस रुपये असून बिगर बर्फ ऐंशी रुपये तर बर्फा सहित सत्तर रुपये लिटर असा दर आहे. लहान मुलांपासून ते वयोवृद्धापर्यंत आम्ही काढून देत असलेल्या ताज्या उसाच्या रसाला मागणी व चांगला प्रतिसाद आहे.

**-काकासो भागवत,** भागवत रसपान गृह, सांगोला.

## शेगाव दुमाला येथील सराईत गुन्हेगार समाधान चव्हाण दोन वर्षासाठी तडीपार

**तभा वृत्तसेवा,**
**पंढरपूर, दि.१६ एप्रिल -**



येथील तालुका पोलिसांनी कारवाईचा बडगा उगारत शेगावदुमाला येथील सराईत गुन्हेगार समाधान बंडू चव्हाण (वय ३० वर्ष ) याला सोलापूर जिल्ह्यातून दोन वर्षाकरिता तडीपार केले आहे. पोलिस निरीक्षक मुजावर यांनी सांगितले की, पंढरपूर तालुका पोलिसांनी शेगावदुमाला येथील सराईत गुन्हेगार समाधान याच्या विरुध्द दारू विक्रीचे, वाळूचे चोरीचे, मारहाणीचे आदी अकरा गुन्हे दाखल होते. यापूर्वी देखील त्याच्यावर प्रतिबंधक कारवाई करण्यात आली असताना देखील चव्हाण मध्ये कोणतीही सुधारणा झाली नाही. त्याने परत गुन्हे केल्याने त्याच्या विरुद्ध आगामी काळातील सण उत्सवच्या अनुषंगाने प्रतिबंध उपायोजना म्हणून दोन वर्षाकरिता तडीपारचा प्रस्ताव उपविभागीय दंडाधिकारी पंढरपूर विभाग पंढरपूर यांना पोलीस अधीक्षकां मार्फत पाठवण्यात आला होता. त्या अनुषंगाने येथील उपविभागीय दंडाधिकारी सचिन इथापे यांनी समाधान बंडू चव्हाण यास सोलापूर जिल्हातून दोन वर्षाकरिता तडीपार केली आहे.

या आदेशानंतर पंढरपूर तालुका पोलिसांनी समाधान यास ताब्यात घेऊन सोलापूर जिल्ह्याच्या बाहेर पुणे ग्रामीण जिल्ह्यातील वालचंद नगर पोलीस स्टेशनच्या ताब्यात दिले. ही कामगिरी जिल्हा पोलीस अधीक्षक अतुल कुलकर्णी, अप्पर पोलीस अधीक्षक प्रितम यावलकर, सहाय्यक पोलीस अधीक्षक प्रशांत डगळे यांच्या मार्गदर्शनाखाली पंढरपूर तालुका पोलीस स्टेशनचे वरिष्ठ पोलीस निरीक्षक टी.वाय.मुजावर, पोलीस उपनिरीक्षक भारत भोसले, विक्रम वडणे, पोलीस उपनिरीक्षक दत्तात्रय तोंडले, सहायक फौजदार आबा शेंडगे, पोलीस हवालदार सरगर, पोलिस हवालदार गावडे, पोलीस कॉन्स्टेबल सागर गवळी, पोलीस हवालदार मंगेश रोकडे, पोलीस कॉन्स्टेबल हसन नदाफ, चालक पोलीस कॉन्स्टेबल गोडसे यांच्या पथकाने केली.

# वैरागसह बार्शी तालुक्यात उन्हाचा कडाका

## नागरिकांनी आरोग्याची काळजी घेण्याचे आवाहन

**तभा वृत्तसेवा,**
**वैराग, दि. १६ एप्रिल-**

यावर्षी उन्हाळ्याची तीव्रता प्रचंड वाढली असून, वैराग, बार्शी तालुक्यासह संपूर्ण सोलापूर जिल्ह्यामध्ये सूर्यनारायण आग ओकत आहे. दुपारच्या वेळी रस्ते ओस पडत असून उष्णतेच्या लाटेमुळे जनजीवन विस्कळीत झाले आहे.



वाढत्या उष्म्याचा सर्वाधिक फटका लहान मुले, वृद्ध आणि गरोदर स्त्रियांना बसण्याची शक्यता असल्याने आरोग्य विभागाने खबरदारी घेण्याचे आवाहन केले आहे.गेल्या काही दिवसांपासून तापमानाचा पारा ४० अंशांच्या वर गेल्याने उष्माघाताचा धोका वाढला आहे. विशेषतः शेतमजूर, बाहेर फिरणारे विक्रेते आणि प्रवाशांना या उष्णतेचा मोठा त्रास सहन करावा लागत आहे.

#### अशी घ्या स्वतःची आणि कुटुंबाची काळजी

तहान लागण्याची वाट न पाहता तासातासाला पाणी प्या, लिंबू सरबत, ताक, शहाळे (नारळ पाणी) किंवा घरी बनवलेल्या नैसर्गिक पेयांचा वापर करा. दुपारी १२ ते ४ या वेळेत अत्यंत महत्त्वाचे काम असल्याशिवाय घराबाहेर पडणे टाळा, ही वेळ उष्माघातासाठी सर्वात धोकादायक असते. हलके, सैल व सुती कपडे वापरा. बाहेर पडताना डोक्यावर टोपी, रुमाल किंवा छत्रीचा वापर करा. लहान मुलांना दुपारच्या वेळी उन्हात खेळायला पाठवू नका. त्यांना वारंवार पाणी किंवा दूध द्या. मुले जर जास्त चिडचिड करत असतील किंवा गळून गेली असतील, तर तातडीने डॉक्टरांशी संपर्क साधा. गर्भवती महिलांनी शरीरातील पाण्याचे प्रमाण कमी होऊ देऊ नका. आहारात फळांचा समावेश करा आणि थंड ठिकाणी विश्रांती घ्या. वृद्ध व्यक्तींनी वाढत्या वयानुसार उष्णतेचा त्रास लवकर होतो, त्यामुळे त्यांनी दुपारच्या वेळी बाहेर फिरणे पूर्णपणे टाळावे.

#### तातडीचा उपाय

अशा व्यक्तीला त्वरित सावलीत/ थंड ठिकाणी न्यावे. शरीरावर थंड पाण्याच्या पट्ट्या ठेवाव्यात आणि जवळच्या दवाखान्यात हलवावे. उन्ह कितीही तीव्र असले तरी, योग्य खबरदारी आणि सतर्कता आपल्याला सुरक्षित ठेवू शकते. वैराग परिसरातील नागरिकांनी प्रशासनाने दिलेल्या सूचनांचे पालन करावे.

#### उष्माघाताची लक्षणे ओळखा:

जर कोणाला खालील लक्षणे जाणवत असतील, तर दुर्लक्ष करू नका. प्रचंड डोकेदुखी किंवा गरगरणे. मळमळणे किंवा उलट्या होणे. शरीराचे तापमान अचानक वाढणे आणि त्वचा कोरडी पडणे. चक्कर येऊन बेशुद्ध पडणे.

CMYK

# आपला जिल्हा

सोलापूर तरुण भारत, सोलापूर येथून प्रकाशित केले.
आवृत्ती सातारा, संभाजीनगर, नांदेड, परभणी, हिंगोली, जालना व बीड, तसेच विजयपूर, कलबुर्गी, बीदर (कर्नाटक) येथून प्रकाशित केले.

## लग्नाचे आमिष दाखवून तरुणीवर अत्याचार; जबरदस्तीने गर्भपात

**तभा वृत्तसेवा,**
**बार्शी, दि.१६ एप्रिल -**

बार्शी शहरात एका तरुणीवर लग्नाचे आमिष दाखवून वारंवार शारीरिक अत्याचार केल्याची आणि नंतर जबरदस्तीने गर्भपात घडवून आणल्याची गंभीर घटना उघडकीस आली आहे.याप्रकरणी बार्शी पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

पीडित तरुणीने दिलेल्या फिर्यादीनुसार, संशयित आरोपी सोहेल बाबू शेख (रा. बालाजी सिम्फोनी, पनवेल, नवी मुंबई) याने मे-जून २०२४ पासून ते २ मार्च २०२६ पर्यंत पीडित तरुणीला लग्नाचे आमिष दाखवून विश्वासात घेतले.

त्यानंतर बार्शी येथील मायरा लॉजमध्ये तिच्या इच्छेविरुद्ध वारंवार शारीरिक संबंध प्रस्थापित केले. तसेच, पीडितेला ती दोन महिन्यांची गर्भवती असल्याचे समजल्यानंतर त्याने तिला पुणे येथे नेले. तेथे स्वतःच्या राहत्या ठिकाणी जबरदस्तीने एम.टी.पी. (गर्भपात) संदर्भातील औषधे देऊन तिचा गर्भपात केल्याचा आरोप फिर्यादीने केला आहे. याप्रकरणी पीडितेच्या तक्रारीवरुन बार्शी शहर पोलीस ठाण्यात गुन्हा नोंदविण्यात आला आहे. सदर गुन्ह्याचा पुढील तपास महिला पोलीस उपनिरीक्षक सोनम जगताप यांच्याकडे सोपविण्यात आला असून, याबाबत अधिक तपास सुरु आहे.



## महत्त्वाचे...

### पंढरपुरात रविवारी कडूबाई खरात यांचा भीमगीतांचा कार्यक्रम

**पंढरपूर, दि. १६ एप्रिल-**

डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांच्या १३५ व्या जयंतीनिमित्त भीमानं माय सोन्यानं भरली ओटी, तुम्ही खाता त्या भाकरीवर, कुंकू लाविलं रमानं आदी गीतांच्या बहारदार आणि सुश्राव्य गायनाने देशभरात धुमाकूळ महाराष्ट्राच्या प्रसिद्ध गायिका कडूबाई खरात यांच्या भीम गीतांचा बहारदार कार्यक्रमाचे आयोजन रविवार सायंकाळी ५ वाजता शहरातील छत्रपती शिवाजी महाराज चौक शिवतीर्थ येथे करण्यात आले आहे. विशेष म्हणजे या कार्यक्रमासाठी रिपब्लिकन सेनेचे राष्ट्रीय अध्यक्ष आनंदराज आंबेडकर, अमन आनंदराज आंबेडकर हे उपस्थित राहणार आहेत. या कार्यक्रमाचे आयोजन रिपब्लिकन सेना व भीमराव आंबेडकर बहुउद्देशीय सामाजिक संस्था पंढरपूर यांच्या संयुक्त विद्यमाने करण्यात आले असून डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या विचारांचा जागर करणाऱ्या या भीम गीतांच्या कार्यक्रमास नागरिकांनी मोठ्या संख्येने उपस्थित राहण्याचे आवाहन रिपब्लिकन सेनेचे पश्चिम महाराष्ट्र युवा अध्यक्ष सागर गायकवाड यांनी केले आहे.



### डॉ. बाबासाहेब आंबेडकर जयंतीनिमित्त चपातीवर साकारली अप्रतिम कलाकृती

**बार्शी, दि. १६ एप्रिल-**

जामगांव (पा) येथील चित्रकार महेश अशोक मस्के यांनी आपल्या अद्वितीय कलागुणांच्या जोरावर महाराष्ट्रासह देश-विदेशात वेगळी ओळख निर्माण केली आहे. डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या जयंतीनिमित्त त्यांनी गव्हाच्या चपातीवर साकारलेली सुंदर कलाकृती विशेष आकर्षण ठरली असून, ही कलाकृती पूर्ण करण्यासाठी त्यांना सुमारे तीन तासांचा कालावधी लागला.



चित्रकार मस्के यांनी यापूर्वीही केळी, वड, पिंपळ, नारळ अशा विविध झाडांच्या पानांवर तसेच फळांवर महापुरुष, चित्रपट क्षेत्र, क्रीडाक्षेत्र, सामाजिक कार्यकर्ते, राजकीय नेते, अधिकारी, उद्योजक आदी क्षेत्रातील मान्यवरांच्या आकर्षक कलाकृती साकारलेल्या आहेत. त्यांच्या या अनोख्या कलेमुळे त्यांनी आजपर्यंत सहा हजारांहून अधिक कलाकृती तयार करुन कलाक्षेत्रात एक वेगळा आदर्श निर्माण केला आहे. विशेष म्हणजे, मस्के हे एका डोळ्याने अंध असून सर्व कलाकृती त्यांना दिसत असलेल्या केवळ एकाच डोळ्याच्या सहाय्याने साकार करतात, ही बाब त्यांच्या जिद्दीची आणि कलेप्रती असलेल्या निष्ठेची साक्ष देते. त्यांच्या कलाकृतींनी महाराष्ट्राबरोबरच सौदी अरेबिया, मलेशिया, कुवेत आणि अमेरिका या देशांपर्यंत पोहोच मिळवली असून, विविध पुरस्कारांनी त्यांना सन्मानित करण्यात आले आहे.




### आदर्श शिक्षिका पुरस्काराने स्मिता गायकवाड सन्मानित

**सांगोला, दि. १६ एप्रिल-**

छत्रपती परिवार, मरवडे (ता.मंगळवेढा) यांच्या वतीने जि.प.प्रा. शाळा बुंजकरवस्ती, सांगोला येथील सहशिक्षिका स्मिता अमोल गायकवाड यांना शिक्षण क्षेत्रातील त्यांच्या उल्लेखनीय कार्याबद्दल कृतीनिष्ठ आदर्श शिक्षिका पुरस्काराने सन्मानित करण्यात आले. यावेळी व्यासपीठावर माजी मंत्री लक्ष्मणराव ढोबळे, माजी शिक्षक आ.दत्तात्रय सावंत, धनश्री परिवाराचे प्रा.शिवाजीराव काळुंगे, नगराध्यक्ष यू.टी.जाधव, शिक्षक समितीचे विजय कोंबे, अमोघसिद्ध कोळी, छत्रपती परिवारचे सुरेश पवार हे उपस्थित होते.





### एमटीएस ऑलंपियाड व मंथन परिक्षेत प्राथमिक विद्या मंदिरचे यश

**बार्शी, दि. १६ एप्रिल-**

नव महाराष्ट्र विद्या विकास मंडळ बार्शी संचलित प्राथमिक विद्या मंदिर येथे महाराष्ट्र शासनमान्य राज्यस्तरीय स्पर्धा परीक्षा एमटीएस ऑलंपियाड व मंथन परिक्षेत शरण्या राकेश शाहीर ३०० पैकी २८२ गुणासह राज्यात ४ था जिल्ह्यात २ रा केंद्रात १ ला क्रमांक मिळवला. रोहित दत्ता कवडे ३०० पैकी २७८ गुणासह राज्यात ७ वा जिल्ह्यात ३ रा व केंद्रात २ रा तर वेदांत सचिन परदेशी ३०० पैकी २४२ गुणासह राज्यात २५ वा जिल्ह्यात २० वा केंद्रात ३ रा याप्रमाणे यश मिळवले. मंथन परीक्षेत रोहित दत्ता कवडे याने ३०० पैकी २२८ व समृद्धी नितीन गोरे ३०० पैकी २२२ गुणासह यशस्वी झाले. संस्थेचे अध्यक्ष बाबासाहेब मनगिरे, सचिव महादेव बुचडे, खजिनदार मोहनभाई बुचडे व संस्थेचे संचालक रावसाहेब मनगिरे यांनी यशस्वी विद्यार्थ्यांचे कौतुक केले.

# माढ्यात नगरपंचायतीने काढले गाळेधारकांचे अतिक्रमण




- सकाळी आठ वाजता पोलीस बंदोबस्तात अतिक्रमणावर हातोडा
- अतिक्रमणावर कारवाईस आलेल्या जेसीबीवर आरटीओची कारवाई

**तभा वृत्तसेवा**
**माढा, दि. १६ एप्रिल-**

माढा नगरपंचायत प्रशासनाने बुधवारी सकाळी आठ वाजता नगरपंचायत जागेत असलेले गाळ्यांच्या समोर गाळेधारकांनी केलेले अतिक्रमण कडेकोट पोलीस बंदोबस्तात काढले या कालावधीत छत्रपती शिवाजी महाराज चौकात काही काळ तणावाचे वातावरण निर्माण झाले होते.

अतिक्रमण काढण्यास आलेल्या कर्मचारी व गाळेधारकांमध्ये काही ठिकाणी शाब्दिक बाचाबाची झाली. नगरपंचायत मुख्याधिकारी नेहा कंठे यांनी या अतिक्रमण संदर्भात गाळेधारकांना कायदेशीर नोटीसा देऊन अतिक्रमण काढून घेण्यास सूचना केल्या होत्या.

त्यानुसार गाळेधारकांनी अतिक्रमण काढण्यास सुरुवात केली होती परंतु काही गाळेधारक अतिक्रमण काढण्यास तयार नसल्याने ते अतिक्रमण नगरपंचायतने जीसीबी द्वारे काढून घेतले आहे. माढा नगरपंचायला व्यापारी गाळ्यांसाठी एक कोटीचा निधी मंजूर झाला असून या निधीतून शहरात व्यापारी संकुल उभारण्यात येणार आहे.यावेळी नगराध्यक्षा ड. मिनलताई साठे उपनगराध्यक्षा कल्पनाताई जगदाळे व नगरसेवकांनी माढा नगरपंचायतीस व्यापारी गाळ्यांसाठी निधी मंजूर झाला असून या ठिकाणी नवीन गाळे उभारण्यात येणार आहे नवीन गाळे उभारणीतून अनेकांना व्यवसायासाठी संधी मिळणार आहे. म्हणून या कामात सहकार्य करण्याचे आवाहन केले. या अतिक्रमण कारवाईत अनुचित प्रकार घडू नये यासाठी ४ पोलीस अधिकारी २२ अंमलदार व १०होमगार्ड यांचा बंदोबस्त ठेवण्यात आला होता.

प्रशासनाने अतिक्रमण होतानाच रोखले असते तर आज ही वेळ आलीच नसती गाळेधारकांनी अतिक्रमण केले असले तरी ज्या त्या वेळेस ग्रामपंचायत किंवा आत्ता नगरपंचायत प्रशासनाने अतिक्रमण होत असतानाच त्या ठिकाणी अटकाव केला असता तर आज अतिक्रमण काढण्याची वेळच प्रशासनावर आली नसती. येणाऱ्या काळात प्रशासनाने ही बाब गांभीर्याने घेऊन पुढील काळात कारवाई करण्यापेक्षा अतिक्रमणच होऊ देऊ नये याकडे लक्ष देणे अत्यंत गरजेचे आहे.

**अतिक्रमण काढण्यास आलेल्या दोन जीसीबी मशीनवर कारवाई**

माढा वैराग व माढा सोलापूर या रस्त्यालगत असलेल्या व्यापारी गाळ्यांन समोरील अतिक्रमण काढण्यास दोन जेसीबी बोलवण्यात आले होते. परंतु त्या जीसीबी मशीनने टॅक्स व इन्शुरन्स न भरलेले आढळल्याने आरटीओ अधिकाऱ्याने त्यांना दंड करून कारवाई केली आहे. त्याचवेळी नगरपंचायत प्रशासनाने कागदपत्राची पूर्तता असलेल्या जीसीबी कडून या ठिकाणी अतिक्रमणावर कारवाई केली.

**नवीन गाळ्यांचे बांधकाम सुरू, अनेक बेरोजगारांना मिळणार संधी**

नवीन व्यापारी गाळण्यासाठी एक कोटीचा निधी मंजूर झाला आहे. तेव्हापासून गाळ्यां समोर झालेले अतिक्रमण प्रकरण सामंजस्याने सोडवण्याचा प्रयत्न केला जात होता. पण काही गाळेधारकांच्या आडमुठेपणामुळे ही मोहीम राबवावी लागली. गाळेधारकांच्या व्यवसायाचा विचार करून केवळ मूळ गाळ्यांच्या समोरील व मागील अतिक्रमण काढले आहे. आता नवीन गाळ्यांचे काम सुरू होईल.

**- ॲड. मिनलताई साठे, माढा नगराध्यक्षा**

**गाळ्यांचा निधी परत जाऊ नये यासाठी कारवाई गरजेची**

अतिक्रमण काढण्याबाबत सर्व कायदेशीर प्रक्रिया पूर्ण केली आहे. स्ट्रक्चरल ऑडिटमध्ये जुने गाळे धोकादायक आढळले होते. नवीन गाळ्यांसाठी १ कोटीचा निधी प्राप्त झाला असून, तो मुदतीत खर्च व्हावा आणि निधी माघारी जाऊ नये म्हणून ही कारवाई करणे अनिवार्य होते.

**- नेहा कंठे, मुख्याधिकारी**



## दिव्यांग गायक फुलारी यांच्या गायनाने नवयुवकांना प्रेरणा

**▶▶नगराध्यक्ष कल्याणशेट्टी**

**तभा वृत्तसेवा**
**अक्कलकोट, दि १६ एप्रिल**

दिव्यांग कलाकार रेवणसिद्ध फुलारी यांच्या गायन ऐकणे म्हणजे नवयुवकांना प्रेरणा असून संगीता क्षेत्रात त्यांनी केलेली प्रगती नक्कीच अक्कलकोट तालुक्याला भूषण आहे असे प्रतिपादन नगराध्यक्ष मिलन कल्याणशेट्टी यांनी केले.

कडबगांव येथील ग्रामदैवत मल्लिकार्जुन यात्रा महोत्सव निमित्त संगीत व हास्य रसमंजरी कार्यक्रम ाच्या उदघाटनप्रसंगी ते बोलत होते. यावेळी महिबुब मुल्ला, गौरव अध्यक्ष रमेश पाटील, मंजुनाथ तेली सरपंच शिवलीला पाटील, हिप्परगी, मारुती सोनकार, चंद्रहास वाल्हेकर, बसवराज मंटगी, जाफर मुल्ला, उद्योजक निसार शेख, सूर्यकांत अंकलगी, शिवानंद बिराजदार, महांतेश्वर पाटील, सोमशेखर शटगार, महादेव बड्डुरे, रियाज मुल्ला, राजकुमार सोनकांबळे, श्रीकांत चव्हाण,श्रीनिवास राठोड, विरभद्र सलगरे, सिद्धारूढ हिरेमठ, खंडेराव व्हसुरे, शिवानंद बिराजदार,विशाल उडचाण आदींनी व्यासपीठावर उपस्थित होते. पहिल्यांदाच दोस्ती ग्रुप यांच्या वतीने श्री महालक्ष्मी इव्हेंट्स संगीत व हास्य रसमंजरी कार्यक्रम आयोजित करण्यात आले होते. दिव्यांग कलाकारासह साक्षी हिरेमठ, महान्या पाटील, श्रीसानिध्य, ज्युनियर विष्णुवर्धन, प्रसिद्ध नृत्यांगना विजयालक्ष्मी, छोटा डान्सर समर्थ मेटगार या बालकलाकार त्यांच्या संपूर्ण टीम कडून कन्नड, हिंदी गायन, हास्य, डॉयलॉगबाजी, नृत्यानी रात्रभर प्रेक्षकांना भुरळ घातली तितकाच त्यांना प्रतिसाद देखील दिल्याचे पहायला मिळाले. सूत्रसंचालन चिदानंद मठपती यांनी केले विशाल उडचण यांनी आभार मानले.

## ऐतिहासिक वारसा असलेल्या अष्टकोनी हत्ती तलावाला नवजीवन

**पानगावात ग्रामस्थांचे श्रमदानातून पुनरुज्जीवन**

**तभा वृत्तसेवा**
**बार्शी, दि. १६ एप्रिल-**

तालुक्यातील पानगांव येथील ऐतिहासिक वारसा असलेल्या अष्टकोनी हत्ती तलावाने अनेक दशकांनंतर पुन्हा एकदा मोकळा श्वास घेतला आहे. ग्रामस्थांच्या पुढाकारातून व विशेषतः तरुणांच्या श्रमदानातून राबविण्यात आलेल्या स्वच्छता मोहिमेमुळे तलावाचे मूळ रुप पुन्हा उजागर झाले असून परिसरात सम ाधानाचे वातावरण निर्माण झाले आहे.


इतिहासकालीन महत्त्व लाभलेल्या पानगाव गावाला स्वराज्याच्या परंपरेशी घट्ट नाते आहे. स्वराज्याचे पाचवे छत्रपती रामराजे महाराज हे इ.स. १७४५ ते १७५० या कालावधीत पानगाव येथे गुप्तपणे वास्तव्यास होते. येथूनच त्यांनी ४ जानेवारी १७५० रोजी सातारा येथे जाऊन छत्रपतीपदाची सूत्रे स्वीकारली होती. त्यामुळे पानगावला ऐतिहासिकदृष्ट्या विशेष महत्त्व प्राप्त झाले आहे.

तसेच छत्रपती राजाराम महाराज व महाराणी ताराराणी यांच्या नात असलेल्या दर्याबाई साहेब नाईक-निंबाळकर यांचे सासरही पानगाव येथेच आहे. त्यांचे पती निंबाजीराव नाईक निंबाळकर हे स्वराज्याचे सरसेनापती होते. तत्कालीन अस्थिर राजकीय परिस्थितीत रामराजे महाराज यांच्या सुरक्षेसाठी त्यांना पानगाव येथे गुप्तपणे ठेवण्यात आल्याचे ऐतिहासिक दाखले उपलब्ध आहेत. याशिवाय अनेक नामांकित सरदार घराण्यांचा वावरही या गावात होता.

पानगावमध्ये आजही भव्य वेस, अष्टकोनी तलाव, ऐतिहासिक समाधी स्थळे आणि प्राचीन बारव यासारखी वास्तू अस्तित्वात आहेत. त्यापैकी सुमारे तीन एकर परिसरात पसरलेला अष्टकोनी हत्ती तलाव हा काळ्या बेसाल्ट दगडातून घडविण्यात आलेला एक अद्वितीय वारसा आहे. पूर्वी हत्तींना जलविहारासाठी या तलावाचा उपयोग केला जात असल्याचे सांगितले जाते.

मात्र गेल्या अनेक वर्षांपासून दुर्लक्ष झाल्यामुळे तलाव परिसरात काटेरी झुडपे, वेली आणि गवत मोठ्या प्रमाणावर वाढले होते. त्यामुळे तलाव पूर्णतः झाकोळला गेला होता आणि त्याच्या दगडी बांधकामालाही धोका निर्माण झाला होता.

ही स्थिती लक्षात घेऊन गावातील २०० हून अधिक तरुणांनी एकत्र येत श्रमदानातून व्यापक स्वच्छता मोहीम राबवली. झाडे-झुडपे, वेली हटवून तलाव परिसर स्वच्छ करण्यात आला. या उपक्रमामुळे अनेक दशकांनंतर प्रथमच तलावाचे मूळ सौंदर्य सर्वांसमोर आले असून त्याचे ऐतिहासिक वैभव पुन्हा खुलून दिसत आहे.



## पंढरपुरातील कॉरिडॉरला प्राधान्य : जिल्हाधिकारी

**• आषाढी यात्रेच्या पार्श्वभूमीवर जिल्हाधिकाऱ्यांनी पत्रकारांकडून जाणून घेतल्या सूचना •**

**तभा वृत्तसेवा,**
**पंढरपूर, दि.१६ एप्रिल -**

श्री विठ्ठल-रुक्मिणी मंदिर परिसरातील प्रस्तावित कॉरिडॉरला प्रथम प्राधान्य देऊन सर्वांना विश्वासात घेऊन तो पूर्ण करण्यात येणार आहे. या संदर्भात येत्या शनिवारी (ता.१८) प्रशासकीय विभागाची बैठक घेण्यात येणार असल्याची माहिती जिल्हाधिकारी एस. कार्तिकेयन यांनी दिली. जिल्हाधिकारी कार्तिकेयन यांनी आषाढी यात्रेच्या पार्श्वभूमीवर वाखरी पालखी तळ, ६५ एकर परिसर, विठ्ठल मंदिर परिसर, दर्शन रांग आदी ठिकाणी जाऊन पाहणी केली. त्यानंतर पत्रकारांशी संवाद साधून त्यांच्याकडून काही सूचना व माहिती जाणून घेतली.

यावेळी बोलताना, कॉरिडॉरला माझे प्रथम प्राधान्य राहणार आहे. स्थानिक रहिवासी व दुकानदारांनी कॉरिडॉरला सहकार्य करावे, असे आवाहन त्यांनी केले. कार्तिकेयन म्हणाले, आषाढी यात्रा अवघ्या तीन महिन्यांवर येऊन ठेपली आहे. आतापासूनच यात्रेचे नियोजन हाती घेतले आहे. ऐनवेळी प्रशासनाची धावपळ होऊ नये, यासाठी नियोजन सुरू केले आहे. यात्रेच्या नियोजनाबाबत आज प्रशासकीय अधिकाऱ्यांशी, स्थानिक लोकांशी व वारकऱ्यांशी चर्चा केली. या चर्चेमधून रस्ते, स्वच्छ व शुद्ध पिण्याचे पाणी आणि शहरातील स्वच्छतेबाबत सूचना प्राप्त झाल्या आहेत. नागरिकांच्या या सूचनांवर काम सुरू करण्याच्या सूचना संबंधित विभागांना देण्यात आल्या आहेत. या प्रसंगी प्रांताधिकारी सचिन इथापे, संतोष देशमुख, मंदिर समितीचे कार्यकारी अधिकारी राजेंद्र शेळके, नगरपालिकेचे मुख्याधिकारी महेश रोकडे आदी उपस्थित होते.



**दहा प्रमुख पालखी मार्गाची करणार पाहणी**

पुढच्या आठवड्यामध्ये सोलापूर जिल्ह्यातील दहा प्रमुख पालखी मार्गाची पाहणी करून त्या ठिकाणच्या अडचणी व समस्या जाणून घेऊन त्या सोडवण्यासाठीही प्रयत्न केले जातील. माझी आषाढीची पहिली वारी असल्याने मी आतापासूनच कामाला सुरुवात केली आहे. कॉरिडॉरचे काम पुढे घेऊन जात असताना स्थानिक नागरिक व दुकानदारांना विश्वासात घेतले जाईल. स्थानिक रहिवाशांनी व दुकानदारांनी प्रशासनाला सहकार्य करावे. सर्वांना सोबत घेऊनच हे काम आपल्याला पुढे न्यायचे आहे, असेही यावेळी जिल्हाधिकाऱ्यांनी स्पष्ट केले.

**व्हीआयपी दर्शनावर बंधन घालावे**

वारी काळात व्हीआयपी दर्शन घेणाऱ्यांची संख्या वाढत आहे. व्हीआयपीच्या नावाखाली दर्शनाचा काळाबाजार सुरु असतो. तो बंद करावा, अशी मागणी करण्यात आली. या बरोबरच चंद्रभागेत अवैध वाळू उपश्यामुळे मोठमोठे खड्डे पडले आहेत. हे खड्डे भाविकांच्या जिवितास धोकादायक ठरतात. हे खड्डे कायमस्वरुपी बुजवावेत. तसेच वारी नियोजन करण्यासाठी शासन १० कोटी रुपये अनुदान देते ते अनुदान वारी अगोदर दोन महिने मिळावे. त्यामुळे यात्रेची कामे करण्यास मदत होईल. यात्रेसाठी दोन दिवस अगोदर पाणी न सोडता ते किमान वीस दिवस अगोदर पाणी नदीपात्रात सोडण्यात यावे या बरोबरच संभाव्य गॅस टंचाई, शहरातील खराब रस्ते, वाहतूक कोंडी, अतिक्रमण याबाबतच्या देखील सूचना पत्रकारांनी मांडल्या. या सर्व सूचना विचारात घेऊन त्यावर तातडीने उपाययोजना केली जाईल, असे आश्वासन यावेळी जिल्हाधिकाऱ्यांनी दिले.

## बेरोजगार युवकांसाठी आज मेळावा

**तभा वृत्तसेवा,**
**पंढरपूर, दि.१६ एप्रिल -**

कौशल्य विकास केंद्र पंढरपूर आणि युवाशक्ती फाउंडेशन यांच्या संयुक्त विद्यमानाने पंढरपूर आणि तालुक्यातील होतकरू बेरोजगार युवकांसाठी भव्य रोजगार मेळाव्याचे आयोजन शुक्रवारी (दि. १७) करण्यात आले आहे. हा मेळावा पंढरपूर एज्युकेशन सोसायटीच्या द.ह.कवठेकर प्रशाला (तालुका पोलीस स्टेशन मागे) येथे कौशल्य विकास केंद्र या ठिकाणी सकाळी १० ते दुपारी ३ या वेळेत आयोजित करण्यात आला आहे.

सुयोग्य निवड झालेल्या प्रतिनिधीस १५ ते ३० हजार रुपये वेतन देण्यात येणार आहे. वयोमर्यादा १८ते ३५ अशी असणार आहे. यासाठी सर्व शाखेतील पदवीधर, दहावी, बारावी पास/ नापास, आयटीआय (सर्व ट्रेड), डिप्लोमा इलेक्ट्रिकल,मेकॅनिकल, सीएनसी ऑपरेटर, सीआयपीईटी आदी शैक्षणिक पात्रता असलेले विद्यार्थी अर्ज दाखल करू शकतात. दरम्यान या मेळाव्या बाबतच्या अधिक माहितीसाठी ९३७१२२२२९०, ९६०७९६५७४२ या मोबाईल क्रमांकवर संपर्क साधावा